माणूस ११ ऑगस्ट १९७३ / पन्नास पैसे

# दोन दिवसांची चळवळ



श्री. ग. माजगावकर

११ ऑगस्ट १९७३

# माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : तेरावे । अंक : अकरावा

## सप्रेम नमस्कार....

२८ जुलै, ७३

¤ आपला दि. २८ जुलै ७३ चा माणूसचा अंक वाचला. त्यामधील जेव्हा चव्हाण रागावतात या मथळ्याखाली दिलेली वस्तुस्थिती आपल्या प्रतिनिधीने अतिशय हुबेहुब मांडली आहे. डॉ. वि. म. दांडेकर यांनी श्री. यशवंतराव चव्हाण यांचे सरकारवर जोरदार हल्ला चढविला व समाजातील ग्रामीण भागातील सत्य परिस्थितीचे दर्शन जनतेसमोर त्यांना घडवले. हेच खरे लोकशिक्षण असून नुसते थापा मारणारे सरकार आम्हाला नको आहे. डॉ. दांडेकरांचे अभिनंदन केले पाहिजे असे मला तरी वाटते.

जगन्नाथ काळे, राहुरी खु.

¤ आपल्या लोकप्रिय साप्ताहिकाच्या ताज्या अंकात ' चव्हाण रागावले ' हा वृत्तांत वाचला. त्या दिवशी बालगंधर्व रंगमंदिरात झालेल्या जुगलबंदीकडे प्रत्येकाने आपआपल्या नजरेने पाहिले. आपल्या प्रतिनिधींनी ' दांडेकरांचे दुष्काळनिवारक समितीवरील कार्य चव्हाणांना का आठवू नये ?' असा सवाल विचारला आहे. श्री. चव्हाण तर दूर दिल्लीला आहेत. पण महाराष्ट्रातल्या असंख्य लोकांना दांडेकर समितीचे दुष्काळनिवारण कार्य कोठे, किती झाले हे माहित नाही. त्या अज्ञानी लोकांच्या ज्ञानात भर घालण्याठी आपल्या प्रतिनिधीमार्फत ह्या महान कार्याचा आढावा घ्या व वाचकांना सादर करा ही विनंती.

नरुभाऊ लिमये, पुणे.

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# परभणी कृषीविद्यापीठ

पुन्हा एकदा श्री. निळू दामल्यांची कृषी विद्यापीठ वार्ता प्रसिद्ध झाली व जुन्या आरोपांची त्यांनी पुनरुक्ती केली.

महाराष्ट्रात एकूण नऊ कृषी महाविद्यालये आहेत व त्यांपैकी चार महाविद्यालयांतून पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू आहेत. त्यातून पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्यांची भरमसाठ संख्या बाहेर पडत आहे व बेकार कृषिपदवीधरांच्या संख्येत शेकडयांनी भर पडत आहे.

साधारणतः पाच वर्षांपूर्वी अशी परिस्थिती होती की, पदवी घेताच नोकरी बाहेर हजर असे व त्यामुळेच ह्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळणे फार कठीण होते. त्यासाठी मुलाखती घेतल्या जात व गुणवत्ता पद्धतीवर प्रवेश दिला जाई. कृषिपदवीधरांची गरज असल्याने डायरेक्ट कृषी अधिकारी (Agri. officer) म्हणून सुद्धा पदवीधरांची नेमणूक खात्यामध्ये होई. कालांतराने ह्या जागा भरणे बंद झाले व ह्याउलट पदवीधरांची संख्या वाढली. शिवाय कॉलेजमधील प्रवेशसंख्याही काही कॉलेजांमध्ये दुप्पट करण्यात आली. ह्यामुळे सहाजिकच त्याप्रमाणात पदव्युत्तर अभ्यासक्रम उघडण्यात आले व कृषी अधिकारी म्हणून हे M. Sc. तरुण उपलब्ध होऊ लागले. पण ह्या वेळपर्यंत खात्यामध्ये जागा निर्माण करणे बंद झाले होते. (Saturation) त्यामुळे जरी हे पदव्युत्तर शिक्षा घेतलेले तरुण सुपरवायझर्स म्हणून नोकरी करायला तयार झाले तरीसुद्धा नोकऱ्या मात्र तयार नव्हत्या. परिणामतः ह्या विद्यार्थ्यांना दुसऱ्या नोकऱ्यांकडे मोर्चा वळवावा लागला. कुणी पोस्टात, कुणी खाजगी कंपनीत, कुणी आणखी दुसरीकडे जाऊन आपल्या पोटाची खळगी भरू लागले.

हे सर्व लिहिण्याचे कारण म्हणजे दामले यांनी जो भारस्वाडकर किंवा कुलकर्णी यांच्यावद्दल कळवळा दाखविला आहे तो कसा चूक आहे हे मला दाखवायचे आहे. हे दोघेही सध्या सुपरवायझर्स म्हणून आहेत तरी बढती मिळताना त्यांची गुणवत्ता जरूर लक्षात घेतली जाईल. परवा सरकारने दुष्काळी कामांवर ओव्हरसियर्स म्हणून जी भरती केली त्यात किती कृषिपदवीधर व पदव्युत्तर शिक्षण घेतलेले आहेत याची दामल्यांनी जरूर पाहणी करावी. मुलाखती घेणाऱ्यांनी फक्त मार्कस बघावेत अशी दामले यांची अपेक्षा आहे काय ? इतर गुण विचारात घेऊ नयेत काय ?

प्रा. देशमुख व साळुंके यांच्या बाबतीतही त्यांनी उगीचच ओरड चालविली आहे. प्रा. देशमुख हे आमच्या काळात अत्यंत लोकप्रिय शिक्षक होते. त्यांना ह्या कॉलेजबद्दल खास आत्मीयता आहे

कारण ह्या कॉलेजचे ते माजी जनरल सेक्रेटरी आहेत. तसेच पहिल्या तुकडीचे विद्यार्थीही. आजही ते अत्यंत विद्यार्थीप्रिय आहेत. काही वर्षे त्यांनी उद्यान-विभाग प्रमुख म्हणून काम केले आहे व त्यांनी तो विभाग अत्यंत भरभराटीस आणला आहे ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी सत्य आहे. मध्यंतरीच्या विद्यार्थ्यांच्या भांडणातही त्यांनी ती मिटविण्याचा फार प्रयत्न केला. कारण ह्या कॉलेजबद्दल त्यांना वेगळ्या प्रकारची ओढ आहे. त्याचप्रमाणे श्री. साळुंके हेही विद्यार्थीप्रिय आहेत. सर्वांशी त्यांचे चांगल्या प्रकारचे संबंध आहेत. अत्यंत समंजस अधिकारी व खिलाडू वृत्तीचा गृहस्थ म्हणून ते सर्वपरिचित आहेत. स्वतःच्या खिशाला बऱ्याचवेळा झळ लावून विद्यार्थ्यांना त्यांनी मदत केली आहे त्यामुळेच सर्वजण त्यांना वडिलकीच्या नात्याने 'दादा' या नावाने संबोधीत असतात. ते केवळ B. Sc. आहेत व त्यांना कल्याण संचालक करायला नको होते ही ओरडही व्यर्थ आहे. हाच निकष जर लावायचा असेल तर परभणी येथे पूर्वी असलेले प्रा. बेडेकर हेही आज अकोला येथे कल्याण संचालक आहेत व तेही B. Sc. (Science) आहेत. ते तर Agri. Faculty चेही नाहीत म्हणून काय त्यांना त्या जागेसाठी अपात्र मानावयाचे ? या ठिकाणी श्री. साळुंके यांची विद्यार्थीप्रियता, कृषी विस्तार क्षेत्रातील त्यांचे कर्तृत्व लक्षात घेतलेले आहे. त्यांनी विद्यापीठ कोच म्हणून फक्त कॉलेजलाच नव्हे तर महाराष्ट्रालाही व्हॉली बॉल ह्या क्षेत्रात नाव मिळवून दिले आहे. यापूर्वीही निव्वळ B. Sc. (Agri.) लोक आमच्याकडे आमचे Lecturer, Assist. Professor म्हणून काम बघत होते. ते तर B. Sc. (final) च्याही विद्यार्थ्यांना शिकवीत होते म्हणून का त्यांना कमी मानायचे ? उलट त्यांचा अनुभव हा महत्त्वाचा आहे. कल्याण संचालक या जागेसाठीसुद्धा परदेशाहून आयात करावी अशी दामले यांची अपेक्षा आहे काय ?

Administration व इतर बाबतीत दोष आहेत ते टाळावेत, यासाठी उपाय योजना करण्यात, अशा प्रकारच्या तक्रारींची दखल घेतली जावी, ह्या तक्रारी ठीक आहेत, पूर्वीचा शैक्षणिक दर्जा यावा, विद्यापीठाला चांगले नाव मिळावे या बाबतीत जरूर सूचना कराव्यात. पण सरसकट सर्वांनाच बदनाम करून एका उदयोन्मुख विद्यापीठाची गळचेपी त्यांनी का करावी ?

**भय्यासाहेब कोठावळे**
चाळीसगाव

---

वसंतदादा पाटलांनी सांगितले : गेली छत्तीस वर्षे मी कॉंग्रेसमध्ये आहे.

जरा वेगळा आकडा सांगितला असता तर काय बिघडले असते ?

---

# सावरकर सुभाष ग्रंथ भेट

## १ : स्वातंत्र्यवीर सावरकर

लेखक : धनंजय कीर । पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
पृष्ठे : ६०० । निवडक छायाचित्रे । किंमत रुपये चाळीस

## २ : मी नेताजींना बघितलंय

लेखक : नारायण सान्याल । अनुवादक : अशोक शहाणे
पृष्ठे सुमारे ३५० । किंमत सुमारे वीस रुपये
'माणूस' मधून गाजलेली लेखमाला मार्च १९७४ मध्ये
पुस्तक रूपाने प्रसिद्ध होत आहे.

---

★ १०० रुपयाची ठेव पाच वर्षासाठी 'राजहंस प्रकाशन'कडे ठेवल्यास वरील दोन्ही पुस्तके व्याजाच्या मोबदल्यात विनामूल्य भेट.

---

★ सावरकर चरित्र नोंदणीच्या वेळींच दिले जाईल. या पुस्तकाच्या प्रती मर्यादित असल्याने ठराविक नोंदणी होताच ही ठेवयोजना स्थगित होईल.

★ ठेवीऐवजी शंभर रुपये पाच वर्षांची 'माणूस'ची वर्गणी म्हणून भरली तरी वरील दोन पुस्तके विनामूल्य दिली जातील.

★ पुस्तके पाठविण्याचा टपाल, पॅकिंग इत्यादी खर्च ठेवीदारांकडे आहे.

★ पाच वर्षे 'माणूस' वर्गणीचा पर्याय स्वीकारार्ह वाटला तर शंभर रुपये मनिऑर्डरने किंवा ड्राफ्टने 'साप्ताहिक माणूस' या नावे पाठवावेत.

★ ठेव पर्याय स्वीकारार्ह वाटला तर शंभर रुपये मनिऑर्डरने किंवा ड्राफ्टने 'राजहंस प्रकाशन' या नावे पाठवावे.

★ रक्कम चेकने पाठविणे सोयीचे असल्यास एक रुपया वटणावळ अधिक पाठवावी.

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०**

# दोन दिवस शिवसेनेचे....

शिवसेना गेल्या आठवड्यात एक-दोन दिवस महागाईच्या राक्षसावर वाघासारखी तुटून पडली हे मान्यच करावे लागते.

मुंबई-पुण्यातील किराणा दुकानांसमोर लागलेल्या हजारोंच्या रांगा ज्यांनी पाहिल्या आहेत त्यांनी हे श्रेय शिवसेनेला मोकळ्या मनाने देऊन टाकलेले आहे.

रांगेत कोण नव्हते ? गरीब, श्रीमंत, स्त्री-पुरुष, लहान मुले आणि म्हातारे–सर्वांना शिवसेनेच्या स्वस्त भाव विक्रीमुळे आनंद झालेला दिसत होता. या हजारोंचे चेहरे शिवसेनेविषयीच्या कौतुकाने फुललेले होते. दोन रुपये किलो भावाने साखर मिळेल या आशेवर सकाळपासून संध्याकाळपर्यंत रांगेत उभे राहण्याची या सर्वांची तयारी होती. दुकानावर झेंडा कोणताही असेना. वेळेवर कुणीतरी धावून आले होते. •लोक या वेळेवरच्या कृतीमुळे भारून गेले होते. शिवसेना दिवस, दोन दिवस या लोकादराच्या लाटेवर स्वार झाली होती. मागचे सगळे तात्पुरते विसरले गेले होते.

पण शिवसेनेने दाखविलेले हे वाघपण दिवस, दोन दिवसातच का लोपावे ? चळवळीला जरा कुठे उधाण येते न येते, तोच शिवसेनेने ती मागेही घेतली. रस्त्यावरून चळवळ पुन्हा सचिवालयात शिरली आणि तिथे शेवटी डोंगर पोखरून नेहमीप्रमाणे उंदीर बाहेर काढण्यात आला. समित्या बनल्या. घोळ सुरू झाला. टक्केवारीचे हिशेब मांडले गेले. लोकांनी चळवळीची सूत्रे आपल्या हाती घेतली होती. ती शिवसेनेने पुन्हा एकदा सरकारच्या स्वाधीन करून टाकली.

शिवसेनेचे वाघपण हे असे आहे. हा नाईकसाहेबांच्या पिंजऱ्यातला वाघ आहे हे शेवटी विसरता येत नाही.

तसा नाईकसाहेबांचा शिकारखाना मोठा आहे, प्रशस्त आहे. अनेक लाल वाघही त्यांनी पाळलेले आहेत. कागदी तर असंख्य. पण शिवसेनेचा वाघ हा त्यांच्या विशेष मर्जीतला, ताब्यातला. त्यामुळे त्याने कितीही डरकाळ्या फोडल्या, रिंगणाबाहेर पडून लोकात थोडी घबराट उत्पन्न केली तरी त्याची त्यांना विशेष काळजी वाटत नाही. थोडी भिवई वर चढवली की हा वाघ निमूटपणे पुन्हा पिंजऱ्यात येऊन बसतो हे अनुभवाने त्यांना पूर्ण माहित झालेले आहे.

लहान व्यापाऱ्यांविरुद्ध शिवसेनेने आघाडी उघडली हे उचित आणि योग्य नसले तरी नेत्रदीपक होते. तो बडा साठेबाज कुणाला कधीच दिसत नाही, दाखविता येत नाही. त्याच्या विरुद्ध ओरड करणे ही एक हवेतली बडबड ठरते. त्याची गुदामे फोडली पाहिजेत हे सभेतले टाळ्या घेणारे वाक्य म्हणून ठीक आहे. पण ही गुदामे आहेत कुठे, तिकडे जायचे म्हणजे नेमके कुठे जायचे, याचा कुणालाच काही पत्ता नसतो. याऐवजी शिवसेनेने आळीतला, कोपऱ्यावरचा व्यापारी दाखवला-ज्याच्याशी सामान्य माणसाचा रोजचा संबंध पोचतो. हा व्यापारी आपल्याला महाग वस्तू विकतो, याला ठोकला पाहिजे, याच्या दुकानातला माल बाहेर काढला पाहिजे हे लोकांना चटकन् समजले, आंवाक्यातले वाटले. त्यामुळे चळवळ एकदम बहुमुखी झाली, अनेक केंद्रे निर्माण झाली, लोकांच्या डोळ्यात भरली. सचिवालयार मोर्चे नेऊन नेऊन लोक कंटाळले होते. घेरावही अलिकडे सपक व भलतेच खेळीमेळीचे बनले होते. शिवसेनेने एकदम कडक व ताज्या धारेचा घोट अगदी मरगळ आलेल्या वेळी पुढे केला. लोकांनी तो आधाशासारखा घेतला. घोट तर घोट. पण अगदी कसा वेळेवर मिळाला म्हणून लोकांची डोकी दोन दिवस तरी अगदी तर्र झाली, हवेत तरंगायला लागली.

तिसरा दिवस उजाडल्यावर हा फक्त घोटच होता हे सर्वांच्या लक्षात आले. दुकानातून मालच गडप झाला होता. शिवसैनिकांनी काही ठिकाणी फक्त आपल्याच लोकांना माल वाटला अशा तक्रारी बाहेर आल्या. बड्या व्यापाऱ्यांविरुद्ध शिवसेनेने करंगळीही उचलू नये

याचा अनेक शिवसैनिकांनाही अचंबा वाटला. मुंबईत तर अफवांचे पीकही उठले म्हणतात, कुणाकडून कुणी किती लाख रुपये उकळले यासंबंधीचे. पण हे सगळे दोन दिवसांनंतर. पहिली प्रतिक्रिया शिवसेनेच्या कौतुकाची होती, हे अगदी विरोधकांनाही मान्य करावेच लागले.

शिवसेना जिथे थांबली, कचरली, तिथून चळवळ आता पुढे कोण काढतो आहे ते बघायचे. बहुसंख्य जनतेला पक्ष नाही, झेंडा नाही. तिला समजते कृती, नेमकी आणि निर्णायक. विरोधक नेहमीसारखे आपापसात भांडत बसतील, मानापानाची क्षुद्र राजकारणे खेळत बसतील तर निराश आणि वैतागलेले लोक वरचेवर अशाच क्षणिक चळवळींना भुलत राहतील, नाईकसाहेबांचा शिकारखाना आणखीनच वाढत राहील. काही न करणाऱ्यांपेक्षा लोक थोडे करणाऱ्यांच्या मागे जातात हा अनुभव आहे. मग हे थोडे करणाऱ्यांच्या खांद्यावर झेंडा कुठला आहे याला फारसे महत्व उरत नाही.

**श्री. ग. मा.**

---


नानांना पकडण्याकरिता दहा हजार रुपयांचे बक्षिस जाहीर झाले. नाना हाती न लागले तर 'शूट अॅट साईट' अशी लष्कराला व पोलिसांना आज्ञा मिळाली....

# क्रांतिवीर नानासाहेब पुरोहित

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर

हा विशेष लेख यापुढील स्वातंत्र्यदिन अंकात

वृत्तपत्र कागदाच्या टंचाईमुळे स्वातंत्र्यदिन अंक नेहमीच्या अंकासारखा निघेल व त्याची किंमतही नेहमीची पन्नास पैसे एवढीच राहील.


---

# जिथे शे. का. पक्षाचे तरुण नेतृत्व वावरते आहे

सोलापूर जिल्ह्यातील सर्वात मागासलेला आणि दरिद्री तालुका म्हणूनच सांगोला तालुक्याची ख्याती आहे.

सांगोला हे तालुक्याचे ठिकाण. १४–१५ हजार लोकवस्तीचे हे थोराड गाव, अवतीभवतीच्या ओसाड माळरानांनी व्यापले आहे. या तालुक्यातील एका नदीचे नाव आहे 'कोरडा.' इथे साऱ्या तालुक्यात एकही कॉलेज नाही, एखादे कीडांगण, वाचनालय वा सिनेमागृह नाही. एक वाचनालय आहे ते केव्हा उघडते ते फक्त तिथल्या ग्रंथपालालाच माहीत. गावात १–२ इमारती सोडल्या तर सारी घरे माळवदी. पाऊस जेमतेम. वर्षात दहा महिने पुरा दुष्काळ.

तर हे असे गाव. परवा इथे थोडा पाऊस पडला, तर कोणी पर्जन्यमोजक गृहस्थांनी पुणा–कुलाबा वेधशाळेला तारा ठोकल्या 'सांगोला पाऊस २ इंच! झाले, रेडिओवरून आणि वृत्तपत्रातून 'सांगोल्यातील (नसलेल्या) मुसळधार वृष्टीच्या बातम्या मोठ्या ठळकपणे प्रसिद्ध झाल्या. यांचा परिणाम एक झाला. परगावी नोकरी धंद्यासाठी असलेल्या लोकांनी घरी सांगोल्याला पत्रे पाठवून कळवले, 'यंदा भरपूर पाऊस' झाल्याचे कळते, पेरणी त्वरित करा, हयगय नको! सांगोल्याच्या त्या डोकेबाज पर्जन्यमोजकाचे डोके देखील ज्या पावसाने पुरते भिजले नाही त्याची केवढी जाहिरात! नाहीतरी आपण एक नंबरचे जाहिरातपटू आहोतच.

एकेकाळी माणसं म्हणायची 'सांगोला सोन्याचे, मंगळवेढ धान्याचे, पंढरपूर पाण्याचे.' आज काळ बदलला. धान्य नाही, पाणी नाही, सोन्याचे तर नाव नको अशी भयावह स्थिती.

इथल्या साऱ्या गंभीर वातावरणात विनोदी वाटणारी नगरपालिका मात्र १८५३ सालापासून एखाद्या पुराणवस्तू भांडारात शोभून दिसावी अशी आहे. शिक्षण, सुधारणा, स्वच्छता या साऱ्या किरकोळ गोष्टींना छेद देऊन इथे सहा-सहा महिन्याला अध्यक्षपदाची उलथापालथ घडवण्यात 'इंटरेस्ट' घेतला जातो.

विशेष म्हणजे या तालुक्याची पंचायत समिती शे. का. पक्षाकडे आहे. इथले राजकारण म्हणजे एक खदखदलेले डबके. सांगोल्याचे काँग्रेसचे आमदार कै. काकासाहेब साळुंखे मध्यंतरी निवर्तले. त्यामुळे नोव्हेंबरात होणाऱ्या आमदारकीसाठी त्यांचे प्रति-

स्पर्धी शे. का. पक्षाचे अॅड. भाई गणपतराव देशमुख लंगोट चढवून मैदानात उतरले आहेत.

भाई गणपतराव देशमुख हे या तालुक्याचे बडे प्रस्थ. भल्या भल्या काँग्रेसवाल्यांनी त्यांची धडकी घेतलेली. सध्या ते तर विशेष फॉर्मात आहेत. दुष्काळाशी एकनिष्ठ राहून त्यांनी शेतकरी, शेतमजुरांचे जबरदस्त संघटन वाढवले आहे.

तर या देशमुखांना पाडायचेच असे काँग्रेसवाल्यांचे मनसुबे. काँग्रेसवाल्यांच्या गोटात दररोज मनसुब्यांचे दरबार भरत असल्याचे कळते. तमाशात 'ढेकूणसिंग महाराज पधार रहे है' अशी सोंगाड्यांनी ललकार ठोकावी तशी ही निवडणूक लढवण्यासाठी अकलूजचे लक्षभोजन फेम 'शंकरराव मोहिते पाटील पधार रहे है' अशी एकच गहजब ऐकू येते.

हे शंकरदेव एक लाखाचा दौलतजादा सांगोलकरांच्यासाठी घेऊन येणार असल्याच्या वार्ता फुटत आहेत. तसे झाले तर फाईट मोठी नामी होईल. गेले आठ-दहा महिने दुष्काळाशी झुंजून मरणाच्या पंथाला लागलेल्या दुष्काळग्रस्तांना तेवढेच चार पैसे लाभतील.

सध्या या तालुक्यातील दुष्काळी कामातून बरेच 'फ्रॉड' घडल्याचे ऐकिवात आहे. यातही विरोधकच प्रामुख्याने पुढे, त्यामुळे येणारी राजवट कशी असेल याची खात्री पटावी. पंचायत समितीचे सभापती भाई शिवाजीराव पाटील हे २५ वर्षांचे कायद्याचे तरुण पदवीधर. उत्साही. सोलापूर जिल्ह्यात नामदेवराव जगताप आणि शंकरराव मोहिते पाटील या जोड गोळीचे बुढ्ढे नेतृत्व असताना इथे शे. का. पक्षाचे तरुण नेतृत्व वावरत आहे. मग हे फ्रॉडचे प्रकार का व्हावेत ?

कोणी म्हणतात, आमदारकीची जागा टिकवण्यासाठी काँग्रेसवाले जसा पैसा जमा करतात तसा यांनी उभा केला तर काय बिघडले ? तर कोणी म्हणतात काँग्रेसचेच छुपे लोक शे. का. पक्षाला बदनाम करण्याठी असे प्रकार करत आहेत.

दुष्काळी कामावर 'बोगस' हजेऱ्या लावून सरकारी पैसा लाटणारी एक बदमाश टोळी अॅडि. तहशिलदार श्री. डी. के. कुलकर्णी यांनी पकडली आहे. त्यात बरेच मोठे लोक आहेत, असे समजते.

या तालुक्यात 'बोगस' शब्द इतका रूढ झाला आहे की, एका प्राथमिक शाळेतील मास्तराने मुलांना वर्गात विचारले की, 'मुलांनो, आपल्या हजेरी पटावर ५२ विद्यार्थी आहेत आणि वर्गात दररोज ४० विद्यार्थी येतात, मग हे बाकी विद्यार्थी कोठे आहेत ? यावर मुलांनी मोठे मासलेवाईक उत्तर दिले. मुले म्हणाली, 'मास्तर, ती बाकी नावे 'बोगस' आहेत, त्यांना कमी करा.'

इथल्या चिंचोळी पाझर तलावावर तपासणी अधिकाऱ्यांनी २७ मे ला अचानक छापा घातला, मस्टर ताब्यात घेतले. त्यातील १०९ मजूर पगार घ्यायलाच आले नाहीत. तेव्हा गावात

दवंडी देऊन सभा बोलावली. तेव्हा लोकांनी सांगितले, 'यातले लोकच गावात नाहीत, जे आहेत ते मयत झालेत.' सांगोला गावतळ्यावर एका आठवड्याचा पगार तहशिलदारनी केला तर तीन हजार रुपये शिल्लक राहिले. या संबंधात वृत्तपत्रातून बरीच ओरड झाली परंतु अद्याप जाड कातडीच्या लोकांचे हे भ्रष्टाचार चालूच आहेत.

सांगोला गावतळ्याचे 'नमुनेदार' काम पाहिले तर याला 'गावतळे कोणी म्हणेल तर बेहत्तर! हे कसले तळे? म्हणजे असे की, याच्या तिन्ही बाजूंनी ढेकळांची उतरंड रचलेली, त्यावर खाली खांदलेली माती घमेलीतून पसरायची. काम फत्ते. याच्या पाणलोटाचे क्षेत्र ४०।५० एकराचे, परंतु आत्तापर्यंत ४।५ लाख रुपये गेले तरी त्याला गावतळ्याचा कसलाही कवडीचा आकार नाही.

या गावतळ्यावर मी पोहोचलो तेव्हा आतमध्ये एकाद्या जत्रेचे स्वरूप दिसले. एकीकडे काही बायका पातळे वाळत घालत होत्या, कोणी 'गोचडसंशोधनात' मग्न होत्या, कोणी भाकरीवर ताव मारत होते. पुरुषमंडळी सुस्तपणे पसरली होती. बाकी काही जण तमाखू चोळत काँग्रेसवाल्यांचा उद्धार करत होते. हे दररोजचे असल्याचे एका मजुराने सांगितले. मोर्चाच्या दिवशी हजेरी लाऊनच बाहेर पडायचे असा एकदर शिरस्ता.

बसून खायला सोकावलेल्या आणि उठसूठ मोर्चे काढून 'सरकार चोर है' अशा घोषणा ठोकणाऱ्या महाभागांना तीन रुपये रोजावर जगण्याची कला आत्मसात झाली आहे. एका घरातली ६।७ माणसे असली की बसून १८।२० रुपये मिळतात. मटक्यापेक्षा हे काही वाईट नाही.

सरकार तरी कसले? एवढा पैसा खर्च करायचाच तर चांगल्या कामाला प्राधान्य नाही. इथला चांडोलीवाडी पाझर तलाव मंजूर होऊ नये म्हणून पुढाऱ्यांचे प्रयत्न. काँग्रेसवाल्यांनी स्टे आणला. कारण काय, तर त्याखाली भिजणारी जमीन माळी समाजाची आहे. माळी समाज आणि काँग्रेसजनांचे हाडवैर. बरे, काम सुरू झाले तर १००–१२५ मजूर कामाला, त्यांनाही १–२ महिने पगार नाही, मग हे काम पुरे व्हायला पंचवार्षिक योजना पुरी व्हायची.

या गावाचे वैशिष्ट्य म्हणजे अभावानेच आढळणारा खादी डगला. सांगली, साताऱ्यात ज्या खादीधाऱ्यांचा सुळसुळाट झाला आहे त्यांना इथले वातावरण ओकाबोकी वाटते.

या गावची आणखी एक इरसाल गोष्ट म्हणजे इथली गावाला पाणीपुरवठा करणारी विहीर. २ वर्षे झाली. ४–५ लक्ष रुपयांचा चुराडा झाला. मात्र दुष्काळात ती कोरडी ठणठणीत राहिली.

त्याचे असे झाले. विहीर खोदली, पावसाळ्यात ३०–४० फुटांवर पाणी लागले. तिथल्या कंत्राटदाराने २–३ इंजिने विहिरीवर बसवून इंजिनिअर

पहाणी करायला आल्यावर एकदम सुरू केली. इंजिनिअरना वाटले, वाऽऽ काय पाणी ! झाले, घरोघरी नळ पोहोचले.

२–३ महिन्यात उन्हाळा आला. विहीर कोरडी राहिली. पुन्हा प्लॅन, एस्टिमेट झाली, बरेच पैसे खर्चून खाली खोदाई केली, पुन्हा पावसाळ्यात पाणी वाढले.

गेल्या वर्षी पुन्हा विहीर ठणठणीत. तेव्हा विहिरीभोवती ८५ हजार रुपये खर्चून ट्रेंच गॅलरी काढायचे ठरले. तेव्हा गावचे अज्ञजन त्या तज्ज्ञांना म्हणाले, 'ही ट्रेंच गॅलरी काढून ८५ हजार रुपये मातीत घालण्यापेक्षा एखादी दुसरी विहीर काढा.' परंतु ते लोकच तज्ज्ञ. त्यांनी गॅलरी खोलली.

परंतु खालचे पाषाण कोरडेच राहिले. पाणी नाहीच, उलट त्याचा परिणाम म्हणून यंदा तिथल्या ओढ्याला एक पूर आला, त्यातला गाळ ट्रेंच गॅलरीत खालीपर्यंत घुसला आणि त्यातून तो मूळ विहिरीत सप्लॉय झाला. म्हणजे विहिरीतले उरलेसुरले पाणी गावाला मिळणे कठीण गेले.

सांगोल्याला कॉलेज निघावे म्हणून बरेच प्रयत्न झाले. परंतु पक्षीय राजकारणात कॉलेजचे मुखत्यारपत्र कोणाकडे असावे यासाठी शे. का. पक्षात व काँग्रेसवाल्यात भांडण. उच्च शिक्षण प्रसारक मंडळ निघाले, एक लाख रुपये वर्गणी गोळा झाली. परंतु तोपर्यंत दुष्काळामुळे सरकारने या कॉलेजला मान्यताच दिली नाही.

या तालुक्यात बेकार तरुण मोठ्या प्रमाणात आहेत. त्यातही उच्च शिक्षण घेतलेले फार थोडे. सर्वत्र गरिबीची परिस्थिती. गावागावातून १–२ सावकार, व्यापारी व काँग्रेस पुढारी सोडले तर सारी जनता अज्ञ, दरिद्री आणि भुकेली. ¤

३० जुलै, सोमवार. आज. शे. का. पक्षाचा मामलेदार कचेरीवर मोर्चा.

दुपारी एकचा सुमार. मी वेशीत पोहचलो, सभोवार पाहिले आणि मन आनंदाने मोहरून गेले.

आसपासच्या खेड्यापाड्यातून हजारो शेतकरी शेतमजुरांच्या झुंडीच्या झुंडी वेशीत लोटत होत्या. त्या बेहोष, बेबंद होऊन मनसोक्त नाचणाऱ्या किसान कामगारांचे ते सळसळते चैतन्य पाहून मी चकितच झालो.

वेशीत लाल झेंड्यांचा सुळसुळाट होता. हिरवे, पिवळे, तांबडे, कोसे फेटे घालून मिरवणाऱ्या शेतकऱ्यांची आणि जरी काठीची पातळे नेसून आलेल्या किसानांच्या बायकांची ती अभेद्य एकजूट मोठी नवथर होती.

त्या हजारो किसानांचे ते जीवदायी विलक्षण तेज आणि चैतन्य पाहून वाटले 'तो क्रांतीचा लोळ आता दूर नाही'

लाल राजवटीला सलाम करणाऱ्या त्या मजुरांचे आणि किसानांचे शेकडो हात, पाय ढोल, हालगी, लेझीम आणि ताशाच्या तालावर नाचत होते. हजारो मुखातून 'लाल बावटेकी जय'चा गगनभेदी गजर घुमत होता आणि तो

पृष्ठ १५ वर

# सो ल क ढी

## मुं. म. ग्रंथसंग्रहालय : ७५

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय ही मुंबईतील एक लौकिकवती आणि कष्टाळू संस्था आहे. ही संस्था आपले काम फारसा गाजावाजा न करता करत असते. आता तिला पंचाहत्तर वर्षे पुरी झाली त्याला ती काय करणार; तिचा बिचारीचा नाईलाजच होता. तर, तिच्या कार्याची ओळख करून देणारे अर्धा-पाऊण डझन लेख वेगवेगळ्या वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाले. त्यामुळे सुरुवातीला तर, 'मॅजेस्टिक बुक स्टॉल'शी या संस्थेचा काही ऋणानुबंध आहे की काय, अशी जागरूक वाचकांचीही समजूत झाली होती. असो.

या निमित्ताने मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या अनेकविध कार्याचा यथोचित गुणगौरव करायचा म्हणजे फार लिहावे लागेल. तसे नको. जिज्ञासूंनी संस्थेच्या दादर येथील मध्यवर्ती शाखेला भेट द्यावी आणि एकवेळ खात्री करून घ्यावी. या ठिकाणी केवढी मोठी उलाढाल सतत चाललेली असते. त्यामुळे ग्रंथसंग्रहालयाचे अलिशान आणि प्रशस्त दालन चटकन लक्षात येत नाही. हाच तो महाराष्ट्राला अभिमान वाटावा असा संदर्भ-विभाग. ज्याला म्हणून मराठीसंबंधित संशोधन करणे आहे त्याला या संदर्भ-विभागात पायधूळ झाडावीच लागते. (तेथील धुळीवरून किती संशोधन चालले आहे, हे सांगणे सहज शक्य आहे, असे म्हणतात.)

या संदर्भ-विभागाबद्दल थोडे लिहावे म्हणतो. तेथील संदर्भ ग्रंथसंग्रह, संदर्भ-ग्रंथसूची, संदर्भ-विभागाची वेळ आणि कर्मचारी यांच्याबद्दल लिहिण्यासारखे काही नाही. लिहिण्यासारखे आहे ते तेथे असलेल्या बाकी अप्रतिम व्यवस्थेबद्दल. उदाहरणार्थ, तेथील अभ्यासू खुर्च्या. या जादूच्या आहेत असा मला संशय आहे. कारण तासभर म्हणून बसायला जावे आणि त्या खुर्चीच्या मोहिनीमुळे चार तास बसावे, असा अनुभव अनेकांना आला आहे. नुसत्या खुर्च्यांचे कौतुक करणे उचित होणार नाही; त्यांच्या बरोबरीने टेबलांचाही विचार झाला पाहिजे. टेबल-खुर्चीच्या परस्परसंबंधित उंचीचे असे काही विलक्षण सुखद प्रमाण येथे साधले आहे की वाचनाचा शीण म्हणून अभ्यासकाला होत नाही; तो आपला वाचतच राहतो. या टेबल-खुर्च्यांचा असा लौकिक दशदिशांना पसरला आहे की येथे येऊन वाचले असता स्लिप डिस्क, सर्वायकल स्पाँडिलिओसिस इत्यादी दुखणी कायमची नाहीशी होतात. त्यामुळे संदर्भ-विभागात खरे वाचणारे किती आणि असे दुखणेकरी किती, हे सांगता येणे

कठीण आहे.

खुर्च्या-टेबलांसारखीच येथील पंखे-दिव्याची व्यवस्था मोठी अव्वल आहे. त्यामुळे मुळात जागा तशी अंधारी आणि बिनहवेशीर असली तरी तसे कोणाला कधी जाणवतच नाही आणि हा परिणाम मोजक्या पंख्यांनी आणि दिव्यांनी साधला आहे हे लक्षात घेतले म्हणजे काटकसरीच्या सोयींवर अनिष्ट परिणाम होतो या म्हणण्यात काही अर्थ नाही, हे पटते. अहो, या संदर्भ-विभागातील प्रकाशव्यवस्था अशी आहे की पुस्तक उलटे ठेऊन सहज वाचावे ! पंख्यांमुळे मात्र कधी कधी पुस्तकांची पाने उडून ईषत गैरसोय होते.

संदर्भ-विभागाचे अधिकाधिक साहाय्य अभ्यासकांनी घ्यावे या हेतूने पालकांनी अभ्यासकांच्या खाण्यापिण्याचीसुद्धा नामी सोय केली आहे. मुख्य म्हणजे आपण खातो हे कोणाला दिसत नाही. मी इतकी वर्षे तेथे जातो आहे; पण खाणारा अभ्यासक अजून मला दिसलेला नाही. पिणारा दिसतो; आणि समाधानी दिसतो; प्रत्येकवेळी पाणी पिताना संस्थेला तोंड (पाण्याने) भरून दुवा देतो.

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाला आता पंचाहत्तर वर्षे पुरी झाली. त्या निमित्ताने महाराष्ट्राचे भूषण वगैरे असलेल्या संदर्भ-विभागात आणखी काही सोयी करायचा संस्थाचालकांचा विचार असल्याचे माझ्या कानावर आले आहे. त्यामुळे काही दिवस मी फार अस्वस्थ आहे. आधीच सर्व सोयींनी परिपूर्ण असलेल्या त्या ठिकाणी आणखी सोयी, कोणी झाले तरी काय करणार ? या प्रश्नाचे उत्तर मला मिळत नाही. पण जनहितदक्ष संस्थाचालकांचे काही सांगता येत नाही; मनात आले तर ते वाटेल ते करू शकतात, अशी महाराष्ट्राच्या सांस्थिक इतिहासाची साक्ष आहे ! ◻

## मुस्कटदाबी

प्रो. आन्द्राय साखारॉव्ह या रशियन अणुशास्त्रज्ञाने नुकतीच स्वीडिश नभोवाणीला जी मुलाखत दिली तिच्यात सोव्हिएत शासनयंत्रणेवर त्यांनी कडक टीका केली. सोव्हिएत शासन प्रोफेसरसाहेबांची संभावना कशी करते तें आता पाहायचे आहे... गेली काही वर्षे, साखारॉव्ह, प्रचलित राज्ययंत्रणेचे वाभाडे काढत आहेत तरी रशियन राज्ययंत्रणा त्यांच्याकडे दुर्लक्ष करते याचे एक कारण म्हणजे रशियन हायड्रोजन बाँबचे निर्माते अशी साखारॉव्ह यांची आंतरराष्ट्रीय ख्याती; आणि दुसरे कारण म्हणजे रशियन विज्ञानव्यवहारातील त्यांची उपयुक्तता.

रशियन इतिहासकार आन्द्राय अमलरिकना असे अभय लाभलेले नाही. रशियन शासनावर टीका केल्याबद्दल नुकतीच त्यांना तीन वर्षे सक्तीच्या श्रमशिबिराची हवा खावी लागली होती. पुन्हा त्यांच्यावर तोच आरोप ठेवण्यात आला आहे.

## प्रति-पक्षाची प्रति-दासी

जनसंघ हा एक नामी पक्ष आहे. राजकीयदृष्ट्या इतका प्रगल्भ, सांस्कृतिक सामाजिकदृष्ट्या इतका उदारमतवादी आणि संघटनेच्या दृष्टीने इतका मजबूत पक्ष भारतातच काय, पण लॅटिन अमेरिकेसकट साऱ्या जगात नसेल. अलीकडच्या काळात जनसंघाची थोडीशी धांदल झाली होती. मध्यवर्ती काँग्रेस सत्तेचे आसन डळमळीत झाले होते तेव्हा स्वतंत्र, संघटना काँग्रेस, संसोपा आदी समानशील पक्षांच्या सहकार्याने ते मुळापासून उखडण्याचा कौतुकास्पद प्रयत्न जनसंघाने करून पाहिला. तो फसला असला तरी त्यातील रजपुती आततायीपणाचा रास्त गौरव करायला हवा. असो. जनसंघाच्या केंद्रीय कार्यकारिणीने हल्लीच बलराज मधोकना पक्षामधून काढून टाकले. (मधोकवाद्यांच्या मते, मधोकनीच जनसंघाला काढून टाकले आहे.) बरे झाले. नाहीतरी राजकारण करणारे प्राध्यापक, हे, मेंदी लावून सार्वजनिक नळावर पाणी भरू पाहणाऱ्या चाळकरणींइतकेच हास्यास्पद दिसतात.

तसा काही राज्यात, मध्यंतरी, सरकारचा घटकपक्ष होण्याचा दुर्मिळ मान जनसंघाला मिळाला होता. पण ते कोणीच फारसे स्मरणात ठेवलेले नाही. त्यावेळी जनसंघीय मंत्र्यांनी, निष्काम बुद्धीने, काँग्रेसी मंत्र्यांचे हुबेहूब अनुकरण करायचा प्रयोग केला. प्रयोग कल्पनेबाहेर यशस्वी ठरला. जनसंघीय मंत्री आणि काँग्रेसी मंत्री यांच्यात लोक घोटाळा करू लागले. निवडणुकीतसुद्धा त्यांनी हा घोटाळा करावा म्हणजे काय? त्यामुळे, संगीत खुर्चीच्या खेळाप्रमाणे, पुन्हा काँग्रेसला खुर्च्या मिळाल्या.

आता मात्र जनसंघ, काँग्रेसला पर्यायी पक्ष असा 'मेकअप' करून भारतीय राजकारणाच्या रंगमंचावर उभा राहू पाहतो आहे. त्याचे प्रतीक त्यांच्या नव्या आव्हानात्मक घोषणेत पाहायला मिळते. हुबळी येथे नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत, प्रति-नभोवाणी निर्माण करायची गर्जना जनसंघाने केली आहे. या गर्जनेची गंभीर दखल लोकांनी, निदान इंदिरा-नभोवाणीच्या श्रोत्यांनी घेऊ नये; इतर निरुद्योगी पक्षांनीही तिचा विचार करू नये; वर्तमानपत्रांनी तर तिची कुचेष्टाच करावी, याचे माझ्यासारख्या सहृदय माणसाला अतीव दुःख होते. व्यक्तीच्या तशाच संस्थांच्या सहजसाध्या उक्तीकृतीतून त्यांचा स्वभाव जसा आणि जितका स्पष्ट होतो तसा आणि तितकाच त्यांच्या निष्ठा, ध्येयधोरण इत्यादींतून होत नाही, असे एक मानसशास्त्रीय तत्त्व आहे. उदाहरणार्थ, इंदिरा गांधींना स्फगेत्ती फार आवडते किंवा त्या चॉपस्टिक्स वापरून चिनी भोजन व्यवस्थित करू शकतात किंवा त्या भावड्या मुलीच्या उत्साहाने 'जय हिंद'चा नारा लगावतात, यांच्यावरून त्या. स्वतः आणि काँग्रेस पक्ष याबद्दल आपल्याला कितीतरी मौलिक निष्कर्ष काढता येणार

नाहीत काय? (येतील.) त्याप्रमाणे आपण प्रतिनभोवाणी निर्माण करू, ही जनसंघोक्ती मला फार अर्थपूर्ण वाटते. त्यामुळे जनसंघाच्या स्वभावावर उद्बोधक प्रकाशझोत पडतो, असे मला म्हणायचे आहे.

माझे म्हणणे एका सूत्रात सांगायचे तर असे की, जनसंघ हा पक्ष नाही; प्रति-पक्ष आहे. सुरुवातीला मी त्याला पर्यायी पक्ष म्हटले ते माझ्या प्रिय वाचकांना समजावे म्हणून. वास्तविक पर्यायी पक्ष आणि प्रति-पक्ष यात मूलभूत फरक आहे. पर्यायी पक्ष सत्ताकांक्षी असतो; प्रतिपक्षाच्या मनात सत्तेबद्दल एक गंड असतो. प्रति-पक्षाला सत्ताधाऱ्यांना विरोध करण्यातच कायिक-वाचिक-आत्मिक समाधान लाभते.

जनसंघ आजवर हेच करत आला. पुढेही बहुधा हेच करत राहील असे प्रति-नभोवाणी निर्माण करण्याच्या त्यांच्या योजनेवरून दिसते.

ही योजना जनसंघ कार्यवाहीत कशी आणणार, असा प्रश्न तुमच्या-माझ्यासारख्याने विचारू नये. कारण व्यवहाराबद्दल तुच्छता असणे हे प्रति-पक्षाचे आणखी एक व्यवच्छेदक लक्षण आहे.

भारतीय नभोवाणी इंदिरा गांधींची दासी आहे. हा जनसंघाचा आरोप खरा मानला तरी ही दासी कुरूप, फोफशी, वेंधळी आणि तोतरी आहे. जनसंघाची प्रति-दासी • गोरीगोमटी, अटकर बांध्याची, चुणचुणीत आणि फटाकडी असेल, अशी आपण आशा करू या.

• • •

## शे. का. पक्षाचे तरुण नेतृत्व : पृष्ठ ११ वरून

बेटा, विळा कोयतेवाला लाल बावटा मोठ्या आनंदाने लहरत होता.

ही माणसे किती? हजारो!! मोजणार कसे? परंतु या एकेका स्फुल्लिगातून भावी क्रांतीचे हजारो स्फुल्लिंग प्रज्वलीत होणार आहेत!

मोर्चा आगेकुच करत होता. सभापती भाई शिवाजीराव पाटील आणि भाई गणपतराव देशमूख अग्रभागी दिमाखाने मिरवत होते.

त्या अथांग जनसागरातून 'लाल बावटेवाला' नारा घुमला आणि मी त्या महासागराचा एक क्षणबिंदू बनून राहिलो.

माझे अस्तित्व लुप्त झाले.

—कृष्णा शाळीग्राम

• • •

गेल्या वर्षभरात महाराष्ट्रात ठिकठिकाणी धान्यासाठी दंगली झाल्या. उपाशी जनतेने गुदामे लुटली. मोर्चे निघाले, लुटालूट झाली. या अस्वस्थतेची, अशांततेची पहिली ठिणगी पाटीलवाडी येथे २ मे १९७१ या दिवशी पडली. गेली दोन वर्षे हा पाटीलवाडीचा विषय व त्यातून सुरू झालेले शहादे येथील भिल्ल व इतर गोरगरीब जनतेचे आंदोलन यासंबंधी माणूसमधून वरचेवर लिखाण प्रसिद्ध होत आलेले आहे. माणूसने एक मोहीमच उघडली, ज्याचे सादपडसाद साऱ्या महाराष्ट्रभर उठत राहिले. या मूळ पाटीलवाडी प्रकरणाचा निकाल आता लागलेला असून त्याचा सारांश थोडक्यात येथे आंदोलनाचाच एक भाग म्हणून वाचकांसमोर ठेवला आहे. न्यायमूर्तींच्या निकालपत्राचा अभ्यास करून सुनील दिघे यांनी हा सारांश तयार केला आहे.

पुढचे पाऊल म्हणून शिक्षा झालेल्या सतरा भिल्लांच्या वतीने मुंबई येथील वरिष्ठ न्यायालयात आता अपील दाखल केलेले आहे. या अपीलालाही आता बराच खर्च करावा लागणार आहे. आजवर पाटीलवाडी प्रकरण व त्यातून सुरू झालेल्या शहादे आंदोलनासाठी पुण्या-मुंबईच्या व इतर बाहेरगावच्या जनतेने, सर्वोदय मंडळांसारख्या संस्थेने गेल्या दोन वर्षात सुमारे पंचवीस–तीस हजार रुपये तरी मदत म्हणून पाठविले. न बोलता, न गाजावाजा करता ही मदत येत राहिली व त्यातून खटल्याचे कामकाज, कार्यकर्त्यांचे जेवणखाण, प्रवास, मेळावे, प्रचारसाहित्य इत्यादी खर्च भागले. आंदोलनाचा फैलाव आता खूपच झाला आहे. शहाद्याला लागून असलेल्या तळोद्यालाही एक नवीन केंद्र निघाले आहे. जवळजवळ ७।८ कार्यकर्ते पूर्ण वेळ आज या आघाडीवर काम करीत आहेत. या आघाडीची एक बाजू म्हणून पाटीलवाडी प्रकरणाकडे 'माणूस'ने पाहिले. ही बाजू आता धुळ्याहून मुंबईकडे सरकलेली आहे. अपीलाचा निर्णय लवकरच लागावा अशी अपेक्षा आहे. लोकांची पूर्वीप्रमाणेच सहानुभूती व मदत तोवर माणूसने गृहीत धरलेली आहे.

— संपादक

# धान्यलुटीच्या वेळी भिल्लांनी मौल्यवान वस्तूंना, माणसांना बोटही लावले नाही तरी शिक्षा सतरा जणांना !

# पाटीलवाडी : २ मे १९७१

शंभर भिल्ल ओळीने उभे. आरोपपत्रक वाचले जाते. सर्व भिल्ल आरोप नाकारतात आणि मग अत्यंत किचकट परंतु अपरिहार्य अशी केस सुरू होते.

### सरकार पक्षाची बाजू


आयोवा (अमेरिका) शेतकी महाविद्यालयाचे पदवीधर असलेले श्री. विश्राम हरी पाटील १९३० मध्ये भारतात आल्यानंतर ब्रिटीश सरकारने त्यांना ५०० एकर जमीन शहादा तालुक्यातील फत्तेपूर या ठिकाणी दिली. या मागील उद्देश सुधारित बियाणांच्या साह्याने उत्पादन वाढविणे व वळू पैदा करण्यासाठी 'स्टड' बांधणे हा होता. कालांतराने पाटलांची शेती पाटीलवाडी या नावाने ओळखली जाऊ लागली. त्यांच्या भव्य बंगल्याच्या तळमजल्याला प्रचंड धान्य गुदामे देखील आहेत. ही जमीन पाटील, त्यांचे दोन मुलगे (विश्वनाथ व जगन्नाथ) आणि त्यांच्या पत्नी यांच्यात विभागली आहे. त्यांच्या गुदामात मात्र तिघांच्या शेतात मिळून झालेले धान्य एकत्र ठेवण्यात येते. पाटीलवाडीचा कारभार जगन्नाथ पाहतो तर श्री. पाटील, पत्नी व मुलगा विश्वनाथ १२ मैल दूर शहाद्यात राहतात. एवढ्या मोठ्या शेतीवाडीचा कारभार हाकण्यास पाटील कुटुंब दरवर्षी सुमारे ४५ सालदार (शेतमजूर) व इतर गडी कामाला लावतात, यातील बहुसंख्य भिल्ल जमातीतील आहेत. सालदारांचे वर्ष अक्षय्यतृतीयेपासून सुरू होते.

१९७०-७१ साली पाटील कुटुंबाने दादर (ज्वारी) व गहू यांचे प्रत्येकी पीक सुमारे १५० क्विंटल घेतले. हे सर्व धान्य त्यांच्या पाटीलवाडी येथील बंगल्यातील गोदामात साठविले होते. त्यावर्षीची अक्षय्यतृतीया २ मे १९७१ च्या दोन किंवा तीन दिवस आधी असावी. ठरल्याप्रमाणे सालदार गड्यांची वार्षिक मुदत संपत होती व त्या दिवशी त्यांचा हिशेब चुकता होणार होता.

१।५।७१ रोजी जवळच असलेल्या पिंपलोद गावच्या उत्तमसिंगला 'विश्राम पाटील धान्य वाटणार असून भिल्लांनी तेथे जमावे' असा मजकूर असलेली 'गणपत' या नावाने सही केलेली चिठ्ठी मिळाली. परंतु उत्तमसिंग व त्याच्या ओळखीचे भिल्ल पाटीलवाडीस गेले नाहीत.

२।५।७१ रोजी सकाळी ८-८॥ च्या सुमारास २५०-३०० भिल्लांचा जमाव पाटीलवाडीच्या बंगल्याच्या आवारात शिरला. त्यांच्याजवळ धारिया, बंदुका, भाले, धनुष्यबाण आदि शस्त्रे होती. गणपत पोलाद भिल्लाच्या नेतृत्वाखाली ते आले व त्याने जगन्नाथ पाटलाच्या जवळ जाऊन अशी धमकी दिली, की बऱ्या बोलाने गोदामे उघड नाहीतर प्राणाशी गाठ आहे! भयाने बोबडी वळलेल्या जगन्नाथाने मुकाटयाने सर्व गुदामे उघडली! भिल्लांनी गुदामातले धान्य घेतले व ते निघून जाऊ लागले. काही भिल्लांजवळ धान्य बांधून नेण्यास पिशवी अथवा फडके नव्हते. म्हणून बंगल्याच्याच आवारात असलेल्या महाराष्ट्र इलेक्ट्रिसिटी बोर्डाच्या शेडमधील सिमेंटची पोती घेतली. काही गोण्या सिमेंटनी भरलेल्या होत्या. त्या रिकाम्या करून त्यात धान्य भरले. हा सर्व प्रकार बोर्डाचे सात नोकर घाबरून पाहत होते. 'धान्य लुटीचा प्रकार' दिवसाढवळ्या ११ ते ११-३० पर्यंत चालला होता.


घाबरलेल्या जगन्नाथाने मुकादम बुलाला बोलावले व सायकलवरून



सातपुड्यातील आदिवासी

शहाद्याला पिटाळले !

विश्वनाथ पाटील त्यावेळी शहाद्याला होते. बुलाने त्यांना सांगितले, की ५०० ते ७०० सशस्त्र भिल्ल पाटीलवाडीस जमले असून त्यांनी आपले गुदाम लुटले आहे. ताबडतोब विश्वनाथ १२-३० वाजता शहादा पोलीस स्टेशनला तक्रार नोंदविण्यास गेला. ड्यूटीवर असलेल्या सबइन्स्पेक्टर भवसारनी पोलीस डायरीत अशी नोंद केली की सुमारे १५०-२०० भिल्ल पाटीलवाडी येथील जगन्नाथाच्या बंगल्यासमोर गर्दी करून राहिले आहेत. भवसार यांनी शहादा तालुका पंचायत समितीच्या अध्यक्षांच्या (फकिरा जयराम यांच्या) जीपमध्ये सात पोलिसांना कोंबले व स्वतः विश्वनाथच्या मोटारीत बसून जाण्यास निघाले. मोटारीतून जात असता रस्त्यातून काही भिल्ल धान्याची बोचकी घेऊन जाताना त्यांनी पाहिले. भवसारना संशय आला व पाठलाग करून त्यांच्यापैकी एकाला पकडले. इतर भिल्ल धान्याची गाठोडी तशीच टाकून पळाले. त्यांची गाठोडी उचलून मोटारीत टाकली. पुढे जाताना आणखी काही भिल्ल म्हसावदच्या रोखाने जाताना (डोक्यावर गाठोडी घेऊन) दिसले म्हणून मोटर म्हसावदच्या रोखाने वळवली. म्हसावदला कुबेर हायस्कूलच्या जवळच असलेल्या भिल्लांच्या झोपडीच्या रोखाने काही भिल्ल धान्याची गाठोडी घेऊन जाताना दिसले म्हणून पोलिसांनी पाठलाग करून एक किंवा दोन भिल्लांना पकडले. पुढे आणकवाडयाच्या रोखाने



एक आदिवासी मेळावा

आणखी भिल्ल असेच जाताना दिसल्याने स. इ. भवसार यांनी म्हसावदच्या 'ग्रामस्थांची' त्या भिल्लांना 'पकडण्यास मदत घेतली.' ग्रामस्थांनी एकूण १३ भिल्लांना पकडून ठेवले. तितक्यात काही जणांनी अशी खबर दिली की इतर भिल्लांनी धान्याची गाठोडी शेतातच टाकून दिली आहेत. भवसारनी ट्रॅक्टर आणायला सांगून लवकर ती गाठोडी घेऊन येण्यास फर्मावले. हे काम म्हसावदच्या 'ग्रामस्थांनीच' केले. मधल्या काळात स. इ. भवसार पाटीलवाडीस गेले व सुमारे ३ वाजता ते आणकवाड्याला परत आले. नंतर डांबून ठेवलेल्या १३ भिल्लांना पोलीस पहाऱ्यात म्हसावदच्या ग्रामपंचायतीच्या ऑफिसमध्ये पाठविले.

३–३० वाजता भवसारना अशी खबर मिळाली की काही सशस्त्र भिल्ल म्हसावदच्या रोखाने येत आहेत. त्यांना पाहण्यास म्हणून भवसार व म्हसावदचे काही गुजर ग्रामस्थ कान्हेरी नाल्याजवळ गेले. समोरच्या भिल्लांच्या जमावाला आणखी दुसरा भिल्लांचा जमाव येऊन मिळाला. हे सर्व भिल्ल कुबेर हायस्कूलजवळ असलेल्या छगन मुरारच्या शेतात उभे होते. या भिल्लांचा पुढारी गणपत पोलाद होता. 'पकडलेल्या भिल्लांना सोडा नाहीतर दंगल करू, खून पाडू' अशा घोषणा देत जमाव पुढे सरकू लागला, असे सरकारी पक्षाचे म्हणणे, इ. भवसार पुढे गेले व गणपतला दुरून ओरडून सांगितले की, 'जागच्या जागी थांब व निघून जा.' परंतु भिल्ल काही ऐकेनात. एवढ्यात कान्हेरी नाल्याजवळून पन्नालाल करसन चालवत असलेला ट्रॅक्टर जाऊ लागला. भिल्लांच्या जमावातील काही जणांनी त्या ट्रॅक्टरवर दगड भिरकावले. त्यातला एक दगड पन्नालालला लागल्याने त्याने ट्रॅक्टर माघारी फिरवून म्हसावदला नेला. त्या ट्रॅक्टरवरून जात असलेला दुसरा प्रवासी म्हणजे नरोत्तम हरी. तो जवळच्या एस्. टी. स्टँडवर उतरला असता गणपतने किंवा जमावतील इतर कोणी तीर मारला तो नेमका नरोत्तमच्या बेचक्यात (आंगठा व तर्जनीमधील भाग) लागला.

यावेळी समोरच्या बाजूने गुजर लोकांचा जमाव येऊ लागला. इ. भवसारनी भिल्लांना निघून जाण्यास पुन्हा पुन्हा सांगितले. परंतु कोणीही हटेना, भिल्लांच्या जमावातील दोघेजण बंदुकींनी सज्ज होते, सरकारी वकिलाच्या मते गणपतने रिव्हॉल्व्हरमधून दोन फैरी झाडल्या. त्यापैकी एक गोळी मंगलू माखनच्या डाव्या खांद्याला लागली व दुसरी गोळी पंढरीनाथ गिरधच्या डाव्या कपाळास लागली. दोघेही जखमी झाले. त्यानंतर पोलिसांनी भिल्लांवर गोळीबार करावा असा आग्रह गुजरांनी धरला. परंतु स. इ. भवसारनी ते करण्याचे नाकारले. मग गुजरांनी 'हवेत' गोळीबार करण्यास सुरुवात केली. परिणामत: भिल्लांच्या जमावातील सूरत्याला गोळी लागून तो जागच्या जागी ठार झाला आणि दुसरा एक जण जखमी झाला.

नंतर दोन्ही जमाव पांगले. गुजरांचे जखमी लोक हॉस्पिटलात उपचारासाठी गेले. भवसार पाटीलवाडी येथे तक्रार नोंदविण्यास गेले ! त्यावेळेस भवसारनी जगन्नाथाची तक्रार डायरीत नोंदवून घेतली. वेळ होती संध्याकाळची सहाची ! जगन्नाथाने गणपतसकट सात भिल्लांची नावे आरोपी म्हणून घेतली. त्यानंतर भवसार शहाद्याला आले व नरोत्तम हरीची तक्रार नोंदून घेतली. (नरोत्तम हरीला बाण लागला होता). या संदर्भात त्यानेसुद्धा गणपतचे नाव घेतले.

त्यानंतर अचानक महत्त्वाच्या घटना घडल्या. भवसारांच्या ऐवजी इ. देशमुख यांनी केसच्या चौकशीचे काम ४-५-७१ रोजी हाती घेतले. ५–५–७१ रोजी देशमुखांऐवजी इ. एम. डी. पाटीलांनी केसच्या तपासाचे काम हाती घेतले. नंतर स. इ. भवसार एक महिन्याच्या आत सस्पेंड झाले होते !

परंतु १३ भिल्लांना धान्य नेताना 'पकडले होते' त्यांचे काय झाले ? २–५–७१ रोजी (म्हसावदचा प्रकार घडल्यानंतर) संध्याकाळी ७–४५ वा. भवसारांनी त्यांना अधिकृतरीत्या अटक केली !

त्यानंतर ३–५–७१ रोजी भवसारनी जगन्नाथच्या गुदामाचा पंचनामा केला. तेथे त्यांना 'धान्याच्या राशीत उमटलेले पावलांचे ठसे दिसले !' बंगल्याच्या आवारात धान्याचे कण विखुरलेले दिसले. पंचनामा करतेवेळी भाईदास यांनी गुदामातल्या धान्याचा अंदाज घेऊन आपले एक्स्पर्ट मत दिले की २३० ते २४० क्विंटल ज्वारी व ८०–८५ क्विंटल गहू एवढे धान्य गुदामात होते. भवसारनी त्या धान्याचे वजन करण्याची तसदी घेतली नव्हती.

म्हसावद, पाटीलवाडीचा 'गंभीर प्रसंग' घडल्यानंतर धुळ्याचे सुपरिटेंडेंट ऑफ पोलीस शहाद्याला ठाण मांडून बसले. ३–५–७१ रोजी इ. भवसारयांनी आरोपी क्र. १३ ते ६८ (गणपत पोलाद, आरोपी क्र. ६८) यांना घरातून बाहेर बोलावले, नंतर त्यांना अटक केली. इतर आरोपींना नवीन बदलून आलेल्या इन्स्पेक्टर्सनी पकडले. ओळख परेड वगैरे झाल्यानंतर मॅजिस्ट्रेटच्या कोर्टात आरोपपत्रक सादर केले, सर्व आरोपींनी गुन्हा नाकारला. काही आरोपींनी कोर्टात सांगितले की, गुजरांनी आम्हाला घराघरातून काढून मारले आणि मग पोलिसांकडे नेले. फक्त गणपत पोलादने असे सांगितले की, म्हसावदला तो भिल्लांच्या जमावात होता परंतु कोणतेही हत्यार त्याच्यापाशी नव्हते किंवा त्यांनी दगडफेक केली नाही. याउलट गुजरांनीच आमच्यावर गोळीबार केला व आमच्यातल्या एकाला ठार केले.

## बचाव पक्षाचा युक्तिवाद

म्हसावदच्या काही गुजरांनी तीन भिल्ल युवतींना पळवून नेले होते. त्यामुळे दोन्ही जमातीतील संबंध तणावले होते. जगन्नाथ पाटलाचे तर एका भिल्ल मुलीबरोबर अनैतिक संबंध होते. मग गावची पंचायत बसून जगन्नाथाला रु. ५५१/– दंड ठोठावला

होता. हे कारण लक्षात घेण्यासारखे आहे. दुसरा मुद्दा असा की, भिल्ल जमातीपैकी बहुसंख्य शेतमजूर असून ते गुजरांच्या शेतावर वार्षिक कराराने कामाला जातात. मध्यंतरी भिल्लांनी एकजुटीने संघटना उभारून मजुरीचे दर वाढविण्यास व इतर सोयींबद्दल जोरदार आंदोलन उभारले होते. गुजरांना हे सर्व नापसंत होते, कारण त्यांच्या हितसंबंधाला घातक असे आंदोलन होते. सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे म्हसावदच्या श्रीमंत गुजरांनी आपल्या हातून झालेल्या भिल्लाचा खून दडपण्यासाठी सर्व भिल्लांना खटल्यात गुंतविले.

सरकारी वकील व बचाव पक्षाचे वकील यांचे युक्तिवाद संपल्यानंतर धुळे कोर्टाचे सेशन्स जज्ज श्री. डोंगरे यांनी निकालपत्र वाचण्यास सुरुवात केली.

पहिला आरोप, कट–कारस्थान करून दरोडा घातला हा. हा आरोप सिद्ध झाला नाही. कारस्थान केले हे सिद्ध करण्यास उत्तमसिंगला मिळालेल्या चिठ्ठीचा उपयोग झाला असता. परंतु ती चिठ्ठी 'गणपत 'ने लिहिली हे सिद्ध झाले नाही व त्यातला मजकूर दरोडा घालण्यासंबंधी बिलकूल नव्हता.

बेकायदेशीर जमाव करून धान्य लुटण्याचा आरोप जगन्नाथ व इतर काही साक्षीदारांच्या पुराव्यावरून सिद्ध झाला. बचाव पक्षाचे म्हणणे होते, की जगन्नाथाच्या कोठारात एवढे धान्य होते याला काही पुरावा नाही. न्यायाधीश म्हणतात, की कोठारात धान्य नेमके किती होते हे ७/१२ इत्यादी लेखी पुराव्यानिशी सिद्ध केले नसले तरी पाटील कुटुंबियांकडे एवढी मोठी जमीन असल्याने त्यांच्याकडे धान्याचा एवढा साठा असू शकेल ! यामुळे जगन्नाथाच्या साक्षीवर विश्वास ठेवण्यास हरकत नाही. पुढच्या परिच्छेदात ते म्हणतात : 'बचाव पक्षाने असे सांगितले की, जगन्नाथाच्या साक्षीवरून पाटील-कुटुंबाने आपापसात जमिनीचे विभक्तीकरण (Partition) केले होते आणि म्हणूनच एवढा मोठा धान्यसाठा जगन्नाथाच्या बंगल्याच्या गुदामात असणे शक्य नाही. पुराव्यावरून असे दिसते, की जमिनीचे विभक्तीकरण केवळ कमाल-जमीन धारणा कायद्यातील पळवाटीचा फायदा घेण्यासाठी होते......जगन्नाथाच्या गुदामात एवढा धान्य साठा नव्हता हा बचाव पक्षाचा युक्तिवाद मला मान्य नाही... कारण साक्षीदार जगन्नाथ पाटील तसेच पंच भाईदास व इ. भवसार गुदामात २३० ते २४० क्विंटल ज्वारी व ८०–८५ क्विंटल गहू होते.'

पाटीलवाडी प्रकाराच्या आदल्या दिवशी एक छोटासा प्रसंग घडला होता. गणपतच्या नेतृत्वाखाली २५–३० भिल्ल चालले असता तळवडे गावचे दोन बकरे म्हणे यांनी पळविले ! साक्षीदार कोण? तळवडे गावचा सरपंच दाजला, भारमल व एक ग्रामस्थ. दुसऱ्या दिवशी या 'साक्षीदारां'नी गणपत व इतर भिल्लांना पाटीलवाडीच्या रोखाने जाताना पाहिले. गणपतविरुद्ध दाजला सूडबुद्धीने साक्ष देत आहे असे बचाव

पक्षाचे म्हणणे, कारण दाजल्याच्या भावाचा ७।८ वर्षांपूर्वी खून झाला होता व त्या खुनाचा आरोप गणपत व त्याचा भाऊ रामसिंग यांच्यावर होता. या आरोपातून गणपत व रामसिंग निर्दोष सुटले होते. तरीसुद्धा दाजल्याने गणपत, रामसिंगावर दात धरून असणे स्वाभाविक आहे असे बचाव पक्षाचे म्हणणे. परंतु न्यायाधीश निकालपत्रकात म्हणतात : 'जरी दाजल्याला गणपत व रामसिंग यांच्याबद्दल सूडबुद्धी वाटत असण्याची शक्यता असली तरी हा खुनाचा प्रसंग ७।८ वर्षापूर्वी घडला असल्याकारणाने दाजला पूर्वीचे वैर विसरून गेला असावा. पांडुरंगाच्या साक्षीवरून, (त्यावेळी) झालेल्या दंगलीच्या प्रसंगानंतर, अधिक म्हणजे दाजला व रामसिंग यांच्यात झालेल्या भांडणानंतर तळवडे खेडे रामसिंगला सोडावे लागले तरीसुद्धा दाजला या साक्षीदारावर विश्वास ठेवण्यास हरकत नाही.'

वादग्रस्त मुद्दा म्हणजे प्रथम दर्शनी पुरावा. [F. I. R.] याबावत बचाव पक्षाने असा पुरावा मांडला, की जगन्नाथाचा मुकादम बुला याने विश्वनाथला बातमी दिली, नंतर विश्वनाथने जाऊन शहादा पोलीस स्टेशनवर दुपारी १२–१२॥ वाजता इ. भवसारना सांगितलेली माहिती व इ. भवसारनी डायरीत लिहून ठेवलेली माहिती हाच खरा F. I. R. त्यावेळी भवसारनी डायरीत अशी नोंद केली, की 'जगन्नाथाच्या बंगल्यावर २००–२५० भिल्ल गर्दी करून राहिले आहेत..' निकालपत्रात न्यायमूर्ती म्हणतात : इं भवसार जगन्नाथाला पाटीलवाडी येथे दुपारी २ वाजता भेटले ही माहिती सत्य असली तरी भवसारना जगन्नाथाची तक्रार लिहून घेण्यास वेळच मिळाला नाही, कारण भवसारनी स्पष्टीकरण केल्याप्रमाणे धान्याची गाठोडी नेत असलेल्या भिल्लांना पकडणे हे अधिक महत्त्वाचे काम होते म्हणून भवसारनी जगन्नाथाची तक्रार लिहिण्यात वेळ घालविला नाही. आपल्या साक्षीपुराव्यात, जगन्नाथाने दरोडा पडल्याची माहिती २ वाजता सांगितली नाही हे जरी भवसार सांगत असले तरी इन्स्पेक्टरांच्या नंतरच्या हालचालीवरून जगन्नाथाने त्यांना २ वाजता दरोडा पडल्याचे सांगितले असावे. याला पुष्टी मिळते.' म्हणून कोर्टाचा निष्कर्ष असा, की सध्याकाळी म्हसावदचा प्रसंग घडल्यानंतर भवसारनी जगन्नाथाची लिहून घेतलेली तक्रार खरी! पुढे न्यायमूर्ती महाशय म्हणतात की, सरकारी पक्षाने 'बुला' साक्षीदाराची साक्ष काढावयास पाहिजे होती व शहादा पोलीस स्टेशनमध्ये दुपारी १२॥ वाजता केलेल्या नोंदीसंबंधी अधिक स्पष्टीकरण द्यावयास पाहिजे होते. 'गर्दी करून राहिले होते' या वाक्याचा अर्थ न्यायमूर्तींनी असा लावला, की भिल्ल दंगल करण्याच्या स्थितीत होते!

**आता म्हसावद प्रसंगासंबंधी**

साक्षीपुराव्यावरून भिल्लांचा व

पृष्ठ ४९ वर

# सिंहांच्या सहवासात



जॉर्ज ॲडमसन आणि त्यांची पत्नी जॉय् यांनी आपल्या जीवनातील बराचसा काळ आफ्रिकेतल्या सिंहांच्या सहवासात घालविला आहे. त्यांचे अनुभव त्यांच्याच शब्दात ऐकणे वाचकास अधिक रुचेल-म्हणून त्यांचे अनुभव त्यांच्याच शब्दात देत आहे...

एप्रिल १९६४ सालातील गोष्ट. ओपन रोड फिल्म कंपनीने त्यांच्या 'बॉर्न फ्री' या चित्रपट निर्मितीसाठी टेक्निकल सल्लागार म्हणून माझी नियुक्ति केली होती. हा चित्रपट माझ्या पत्नीने लिहिलेल्या 'बॉर्न फ्री, लिव्हिंग फ्री' या ग्रंथावर आधारलेला आहे. यात एलसा नामक सिंहीण पकडली गेल्यापासून तिच्या छाव्यांच्या जन्मापर्यंतच हकीगत चित्रित करण्यात आली आहे.

दिग्दर्शकाला पशुवर चित्रण करण्याचा बराचसा अनुभव होता. त्यांचा विचार चित्रपटात काम करण्यासाठी सर्कशीतील सिंहच घ्यावेत असा होता. चित्रपटातील सिंहाच्या निवडीसाठी डायरेक्टरांनी सारा युरोप पायाखाली घातला. शेकडो सिंहांची पाहणी केली आणि त्या सर्वांतून त्यांनी एका सर्कशीतील दोघा वयस्करांची निवड केली. त्यांची नावे होती जूबा आणि एस्ट्रा. त्यांचा मालक जर्मनीतील एक व्यापारी होता.

जूनच्या सुरुवातीलाच दोन कलाकार, व्हर्जिनिया मॅकेन्ना आणि तिचे

'बॉर्न फ्री' चित्रपटात जंगली जनावरांच्या अद्भुतरम्य जीवनाचे यथार्थ दर्शन घडविण्यात आलं आहे.....त्या काळात सिंहांच्या कळपात जाऊन राहणाऱ्यां एका धाडसी माणसाने जे विविध प्रसंग पाहिले त्यांची हकिकत खुद्द त्यानेच कथन केली आहे....

**वसंत डोळस**

पती बिल ट्रॅव्हर्स आफ्रिकेत पोहोचले. दोघांनी काही दिवसानंतर सिंहिणीच्या बरोबर रहावयास सुरवात केली. मात्र या अगोदर त्यांनी फिल्म कंपनीपुढे स्पष्ट अशी अट घातली होती की, चित्रपटाचे चित्रीकरण करण्याचे वेळी आमच्या ऐवजी दुसऱ्या कलाकारांना घेऊन चित्रण उरकू नये. तर ते आम्हाला घेऊनच उरकावे.

काही आठवड्यानंतर एक गोष्ट स्पष्ट झाली की, जूबा आणि एस्ट्रा या फारच वृद्ध झाल्या आहेत. व त्यापैकी कुणीही एलसाची भूमिका यशस्वीपणे पार पाडू शकणार नाही. सर्कसमधील प्रशिक्षण व कायमचा बंदिवास या गोष्टींनी त्यांच्यातील सहज प्रवृत्ती आणि आत्मीयता यांना कायमचेच नष्ट करून टाकले होते. आणि त्यामुळेच व्हर्जिनिया आणि बिल यांना त्यांच्या सहवासात मनमोकळेपणाने राहणे शक्य वाटत नव्हते.

एलसाबरोबर माझा व माझी पत्नी जॉय हिचा जो आत्मीयतापूर्वक संबंध होता तशी आत्मीयता, निर्धोकपणा या सिंहिणीच्या बाबतीत वाटत नव्हता. आणि म्हणूनच आमच्या खऱ्याखुऱ्या जीवनातील प्रसंग नटनटयांवर अशा प्रकारे चितारणे शक्य दिसत नव्हते.

योगायोगाची गोष्ट अशी की, याच वेळी स्कॉटस् गार्डच्या दुसऱ्या बटालियनकडून फिल्म कंपनीला एक महिन्याचे दोन छावे—नर आणि मादी मिळाले. बटालियन अल्पावधीतच इंग्लंडला जाणार होती. त्या छाव्यांना 'बॉय्' आणि 'गर्ल' या नावांनी संबोधण्यात येत असे. आणि सैनिकांच्या छावणीतच त्यांना ठेवलेले असल्यामुळे ती दोघ बिनदिक्कतपणे माणसाबरोबर बाहेर फिरत असत. व्हर्जिनिया आणि बिल लवकरच त्या दोन छाव्यांच्या सहवासात स्वतःला विसरून गेली.

त्याच सुमारास एक दुर्भाग्यपूर्ण अशी घटना घडली. एके दिवशी सकाळी व्हर्जिनिया आणि 'बिल' बॉय आणि गर्ल यांना बरोबर घेऊन फिरावयास निघाली. एका मैदानावर बॉय् खेळण्याच्या मूडमध्ये होता. त्याने व्हर्जिनियावर झेप घेतली आणि तिचा एक

पाय तोंडात पकडून खेळण्याचा प्रयत्न करू लागला. व्हर्जिनिया घाबरली. तोल जाऊन ती जमिनीवर धाडकन् कोसळली. बॉय आणि गर्ल या जोडीला वाटलं व्हर्जिनियाने गंमत म्हणूनच जमिनीवर शरीर झोकून दिले आहे. ती तिच्याबरोबर खेळण्यासाठी तिच्याकडे धावली--आणि तिच्या अंगावर वाटेल तशा आडव्या तिडव्या उड्या मारल्या. बिल जरा दूर होता. त्याने तिला उचलून मोटारपर्यंत आणले. बॉय् आणि गर्ल या सिंहाच्या छाव्यांनी त्याला खूप सतावले. पण अखेर बिलने त्यांना मोटारच्या मागील पिंजऱ्यात कोंडलेच. या घटनेनंतर देखील व्हर्जिनियाने आपले धैर्य खचू दिले नाही. काही आठवड्यानंतर प्लॅस्टर काढून टाकल्यावर ती परत आपल्या कामावर हजर झाली आणि सिंहाबरोबर राहू लागली.

जुलैमध्ये केनियाच्या नॅशनल पार्ककडून आम्हाला सोळा महिन्यांची सिंहीण 'मारा' काही दिवसांसाठी मिळाली. ती पोरकी होती. दक्षिण केनियात मारा नदीच्याकाठी एका शेतकरी पतिपत्नीला ती एकटीच सापडली होती. त्या उभयतांनी तिचे ती नऊ महिन्यांची होईपर्यंत पालनपोषण केले आणि नऊ महिन्यांची झाल्यावर त्यांनी तिला नैरोबीच्या 'पशुअनाथालयाच्या' हवाली केले. नॅशनल पार्कच्या अधिकाऱ्यांनी तिला त्या अनाथालयातून आमच्याकडे पाठविले होते. अनाथालयात ती बंदीवासात होती. त्यामुळे तिच्या स्वभावातील सहज प्रवृत्ती लोप पावली होती. आता ती एका नव्याच वातावरणात प्रविष्ट झाली होती. आणि त्यामुळे तिच्यातील निखारपणा अधिकच तीव्रतेने जागृत झाला होता.

एकदा तर आम्ही या विचाराप्रत येऊन पोहचलो की, माराला आता परत तिच्या अनाथालयाकडे पाठवावे. परंतु ती दिसायला फारच सुंदर होती. मला तर असे वाटू लागले होते की, आपण तिला मवाळ करू शकू आणि ती कामगिरी मी माझ्या शिरावर घेतली. मी माझा तंबू तिच्या पिंजऱ्याजवळच ठोकला होता. तेथूनच मी तिच्या बरोबर गप्पा गोष्टी करीत होतो. मधून मधून तिला कुरवाळीत होतो. रात्रीच्या वेळी तिला चांगली भारी बिस्किटे खाऊ घालीत होतो.

सुमारे आठवड्यानंतर ती माझा आवाज आणि गंध (वास) ओळखू लागली. एके दिवशी मी सहजपणे तिच्या पिंजऱ्यात शिरलो. मला पाहताच ती मला बिलगली. तिची खूप समजूत घातल्यावर देखील ती मला सोडण्यास तयार नव्हती. काय करावे ते सुचेना. इतक्यात एक माणूस दृष्टीस पडला. त्याला मांसाचा तुकडा पिंजऱ्यापुढे धरण्यास सांगितले. अर्थातच तिचे लक्ष मांसाच्या त्या तुकड्याकडे गेले आणि तिने मला सोडून दिले.

त्यानंतर पंधरा सोळा दिवस माझा कार्यक्रम जणु ठरूनच गेलेला होता. रोज तासभर मी माराच्या पिंजऱ्यात जात असे, ती हळुहळू शांत होऊ लागली. मी तिच्याजवळच रहावे असे

ती दर्शवू लागली. माझा तिच्यावर पूर्ण विश्वास आहे, हे तिला दाखविण्यासाठीच मी माझा तंबू अगदी तिच्या पिंजऱ्याशेजारीच ठोकला होता. दोन-तीन महिनेपर्यंत.

'मारा' नंतर 'हेनरिटा' मिळाली. ती बॉय आणि 'गर्ल' यांच्याच वयाची होती. तिला पाहून मला तिची दया आली. ती फारच अशक्त होती.

एकदा तिची आई आपल्या छाव्यांना घेऊन नॅशनल पार्कमधील रस्त्यावरून चालली होती. त्याचवेळी तिथून चाललेल्या ट्रॅक्टरखाली हेनरिटाचे सर्व भाऊ सापडून मृत्युमुखी पडले. हेनरिटा मात्र वाचली. हेनरिटा घाबरली. पण ती आईच्या मागे धावली नाही. सिंहिणीचा असा स्वभावच असतो की, ती मागे-वळून कधी आपल्या छाव्यांना पहात नाही. आणि मागे राहणाऱ्या छाव्यांना आपल्याबरोबर ठेवीत नाहीत.

नंतर नॅशनल पार्कच्या अधिकाऱ्यांनी हेनरिटाला एटेबेच्या 'पशु-अनाथालयात' घातलं. आमच्या कंपनीला त्याच अनाथालयाकडून ती मिळाली होती. डायरेक्टरांनी तिला पाहताक्षणीच उद्‌गार काढले होते की, या सिंहिणीला आपल्या चित्रपटात काय काम द्यायचं? परंतु तिच्या अंगच्या सुप्त गुणांची मला कल्पना आली होती. काही आठवडे चांगले खाऊपिऊ घातल्यावर ती आता चांगली दिसू लागली. आणि जिला छोटंसं काम देणं डायरेक्टरांना उचित वाटत नव्हतं तीच सिंहीण अखेर आमच्या चित्रपटाची नायिका बनली.

चित्रपटातील एका दृश्यात नायिका एलसाला एका तरुण हत्तीबरोबर काम करावयाचे होते. दृश्यासाठी तीन वर्षांच्या 'एलिनर' या हत्तिणीची आणि 'गर्ल' या सिंहिणीची निवड करण्यात आली. दोघींना जंगलाच्या एका बंदिस्त भागात एकमेकींशी परिचित होण्यासाठी सोडण्यात आले. त्या भागात सोडताच हत्तिणीने पेरु खायचा सपाटा लावला. तिच्याकडे 'गर्ल'नामक सिंहीणीने अजिबात लक्ष दिले नाही. भरपेट पेरू खाल्ल्यावर एलिनर आमच्याबरोबर फिरावयास निघाली. तिच्याबरोबर 'गर्ल'नामक सिंहिणीने फिरावयास यावे यासाठी आम्हाला तिची खूप मनधरणी करावी लागली.

चित्रिकरणाच्या वेळी तारांची एक मोठी जाळी बनविण्यात आली होती. पाण झाडाझुडपांच्या फांद्यांनी ती जाळी पूर्णपणे झाकून टाकलेली असल्यामुळे दिसत नव्हती. जाळीच्या दुसऱ्या बाजूला कॅमेरा होता. आणि त्याच्या दुसऱ्या टोकाला जाळीत सिंहिणीचा पिंजरा होता. एलिनर हत्तिणीने सिंहिणीच्या पिंजऱ्याच्या पुढून जावून केळे दाखविताच कॅमेऱ्याच्या दिशेने पळावे अशी योजना होती. त्याचवेळी 'गर्ल'नामक सिंहिणीला पिंजऱ्यातून बाहेर काढले जाईल आणि तीही हत्तिणीच्या मागे झेप घेईल अशी योजना होती. या प्रसंगातील पहिला प्रसंग अगदी योजल्याप्रमाणे चितारला गेला. मात्र दुसऱ्या टप्प्यात गोंधळ झाला. ज्यावेळी गर्लला पिंजऱ्यातून बाहेर सोडून देण्यात आले त्यावेळी

योजल्याप्रमाणे ती हत्तिणीच्या मागे धावली नाही. चित्रपटाचे डायरेक्टर आणि निर्माते वैतागून गेले. वैतागून जाणे हे स्वाभाविकच होते. कारण प्रतिदिवशी कंपनीला पन्नास हजार रुपयांहून अधिक खर्च येत होता.

गर्लच्या जागी तिची भूमिका 'मारा' या दुसऱ्या सिंहिणीला द्यावी असा माझा विचार होता. मात्र त्यामागे एक धोका होता की, माराने एलिनर या हत्तिणीला ठारच केले तर ? आता राहता राहिली हेनरिटा. परंतु तिचा एलिनरशी आतापर्यंत काडीमात्र सहवास घडला नव्हता. तरीदेखील हेनरिटाला पिंजऱ्यात बंद केले. बंद पिंजऱ्यातून ती एलिनरकडे एकटक पहात होती. केळी पाहून एलिनर हत्तीण पळू लागताच हेनरिटाला पिंजऱ्यातून सोडून देण्यात आले. लगेच एक मोठी झेप घेऊन ती एलिनरवर तुटून पडली. तिने एलिनरचा मागचा एक पाय इतका घट्टपणे तोंडात धरला की, तोल जाऊन ती हत्तीण जमिनीवर धाडकन कोसळली. या दृश्याला सहा वेळा चित्रित करण्यात आले.

माझ्या ताब्यात बॉय, गर्ल, मारा आणि हेनरिटा यांच्या व्यतिरिक्त तीन वर्षाचा दिसायला सुंदर असा 'उगास' नामक सिंह होता. तो लहान असताना वाजिर जंगलात एका पोलिसाला सापडला होता. काही दिवस त्याने उगासला जवळच ठेवला. आणि नंतर त्याने त्याला नैरोबीच्या अनाथालयाच्या स्वाधीन केले. तेथूनच त्याला आमच्या कंपनीने काही दिवसांच्या बोलीने आणले होते. उगासची प्रकृती दांडगी होती. तसाच तो खिलाडू वृत्तीचा होता. आमच्या कंपनीत सिंहाची देखभाल करण्यासाठी एक स्वीडिश मुलगी पण होती. तिचं नाव मिरील.

## उगासची दंगामस्ती

एके दिवशी मी आणि मिरील त्याला शिकवीत होतो. उगास पिंजऱ्यात होता. आणि मिरील मटणाचा तुकडा हातात धरून दुसऱ्या पिंजऱ्याजवळ उभी होती. उगासचे सारे लक्ष तिच्या हातातील मटणाच्या तुकड्यावर होते. मी उगासच्या पिंजऱ्याचा दरवाजा उघडला त्यासरशी उगासने मटणाच्या तुकड्यासाठी झेप घेतली. उगास मिरीलच्या जवळ पोहचताच मिरीलने हातातला मटणाचा तुकडा पिंजऱ्यात फेकला. उगास जोरातच पिंजऱ्यात शिरला. मी ताबडतोब पिंजऱ्याचा दरवाजा बंद केला. काही दिवस हे असेच चालले.

एके दिवशी उगास एकदम पिंजऱ्यात घुसण्याऐवजी आजूबाजूला फिरू लागला. आणि अचानक त्याने मिरीलवर झेप घेतली. मिरीलच्या मदतीला मी धावून गेलो तर माझ्यावरही त्याने झेप घेतली.

निर्मात्याचा चेहरा हे दृश्य पाहून पांढरा फटफटीत पडला. यानंतर आम्ही उगासकडे सावधपणे पाहू लागलो. आम्ही रोज त्याला मैदानात बाहेर काढीतच होतो–पण ज्यावेळी तो थकलेला वाटेल त्याच वेळी काम थांबवून त्याला पिंजऱ्यात घालीत होतो.

चित्रपटात चोवीस 'सिंह' आणि

'सिंहिणी' आणि व त्यांच्या छाव्यांनी भाग घेतला. माझ्या ताब्यातील जूबा आणि एस्ट्रा यांना सोडून बाकीच्यांना उघडयावर ठेवता येत नव्हते.

एलसा आणि चित्रपटातील सारे कथानक सिंहिणीला जंगलात सोडण्याच्या घटनेवर आधारलेले होते आणि म्हणूनच ज्यांनी चित्रपटात चांगले काम केले त्यांना कंपनी खरोखरच जंगलात स्वतंत्र जीवन जगण्यासाठी सोडून देईल, असे आम्हाला वाटत होते. परंतु तसे मात्र घडले नाही. कंपनीने आपल्या सोळा सिंह आणि सिंहणींना प्राणी संग्रहालया-मार्फत विकले—बाकी राहिली आठ पिले. त्यातील काही काही दिवसांच्या बोलीने तर काही उधारीने आणली होती. उगास, मारा आणि हेनरिटा ही त्या-पैकीच होत. आता राहिली बॉय आणि गर्ल ही नर-मादीची जोडी. स्कॉटस् गार्डच्या दुसऱ्या बटालियन्सचे सार्जंट व्हॉन रिब्ज आणि ग्रॅहम यांनी त्यांना कंपनीच्या हवाली करताना स्पष्टपणे बजावून सांगितले होते की, त्यांना चित्रिकरण संपल्यावर इंग्लंडमधील सर्वोत्तम अशा प्राणी संग्रहालयाकडे खास विमानाने पाठविण्यात यावे आणि त्यांची ती अट कंपनीने मान्य केली होती. मी, रिब्ज आणि ग्रॅहमला पत्र लिहून कळविले की, 'बॉय आणि गर्ल' या जोडीला प्राणी संग्रहालयाकडे पाठ-विण्याऐवजी जंगलात सोडून देऊ का?

त्यांनी माझ्या पत्राला उत्तर दिलं आणि माझ्या विचारांशी सहमती पण दर्शविली.

काही दिवसांनंतर केनियाच्या वन खात्याच्या मंत्र्यांच्या सहकार्यामुळे मला 'उगास'चा ताबा मिळाला. मात्र मारा आणि हेनरिटाला प्राणी संग्रहालयातील बंदी जीवन जगणे नशिबी आले. मी त्यांचा विश्वासघात केला, असे माझे मलाच वाटले आणि म्हणूनच जेव्हा त्यांना निरोप देण्याचा समारंभ आयो-जित करण्यात आला, त्यावेळी मी मुद्दामच हजर राहिलो नाही.

वास्तविक मारा या सिंहिणीला चित्रीकरण संपल्यावर जंगलात सोडून द्यावे व तिला पण स्वातंत्र्यातल्या जीवनाचा आस्वाद घेऊ द्यावा असा माझा विचार होता. पण तिच्या माल-किणीच्या कानावर जेव्हा माझा विचार गेला, तेव्हा तिने वर्तमानपत्रातून कडक टीका केली. मारा जंगलातल्या स्वतंत्र जीवनापेक्षा प्राणीसंग्रहालयातच अधिक सुखाने राहू शकेल, अशी तिची धारणा होती.

मी आणि माझी पत्नी जॉय आपल्या सिंह-सिंहिणींना घेऊन नारोमारूहून सिबाला गेलो आणि तिथेच तंबू ठोकले. ट्रेव्हर्स पतिपत्नी नारो-मारुहून इंग्लंडला जाताना सिबाहूच गेली. त्यांनी बॉय, गर्ल यांना राहण्यासाठी आपली 'डू-डू' गाडी आम्हाला दिली. 'बॉर्न फ्री' या चित्रपटाच्या जागतिक यशात ट्रेव्हर्स दांपत्याचा सिंहाचा वाटा होता, यात काडीमात्र शंका नव्हती.

२५ एप्रिल १९६५. त्यावेळी बॉय आणि गर्ल ही उणीपुरी एकोणीस महिन्यांची होती. मी माझी 'लँड

रोव्हर' गाडी बाहेर काढली. मागे ती दोघे होती. त्यांना वाटले असावे की, हे आपल्याला नारो-मारुच्या जंगलातच फिरावयास घेऊन चालले आहेत. इथपासूनच आपल्या नव्या जीवनाला सुरुवात होणार आहे. याची त्यांना पुसटशी कल्पनादेखील नसावी—आम्ही सर्वजण सिबापासून ९४० मैल अंतरावर येऊन पोहोचलो होतो.

नवीन शिबीर मुगोवोंग पर्वतावर समुद्रसपाटीपासून २००० फूट उंचीवर होते. या ठिकाणी तीन बाजूंना सपाट मैदान व चौथ्या बाजूला दलदल आणि झाडी होती. चारी बाजूंना सहा फूट उंचीपर्यंत तारेचे कुंपण घालण्यात आले. या ठिकाणी एका बाजूला सिंहाचे पिंजरे होते तर दुसऱ्या बाजूला आमचे तंबू होते. पहिले दोन आठवडेपर्यंत सिंहांना रात्री पिंजऱ्यातच ठेवावे असा माझा विचार होता. ते या भागाशी चांगले परिचित झाल्यावर त्यांना दिवसभर मोकळेच ठेवण्याचा माझा विचार होता. पहिल्या दिवशी बॉय आणि गर्ल ही दोघे थकल्यामुळे लवकरच झोपी गेली. पण रात्री जेव्हा त्या दोघांना जाग आली, तेव्हा काटेरी कुंपणावरून झेप घेऊन ती माझ्या तंबूत आली आणि माझ्या बिछान्याजवळ उभी राहून गुरगुरु लागली. बॉय तर माझ्या डोक्याजवळ येऊन बसला होता. त्यामुळे मला उठून बसावेच लागले आणि त्या दोघांना बरोबर घेऊन फिरण्यासाठी मी बाहेर पडलो.

दुसऱ्या दिवशी आम्ही आमच्या तंबूभोवती काटेरी कुंपणाबरोबरच काटेरी फांद्या पण लावल्या होत्या. पण लवकरच आम्हाला हा बेतही सोडून द्यावा लागला.

साधारणतः अंधार पडल्यावर ती दोघे बाहेर जंगलात जात नसत. अधूनमधून ती दोघे वन्यश्वापदांची शिकार करण्यासाठी बाहेर पडत आणि त्यामुळे रात्रीच्या वेळी त्यांना पिंजऱ्यात ठेवण्याचा माझा विचार मी रहीत केला. ती दोघे रात्रीची आमच्या तंबूच्या आसपासच असत. कधी कधी मोटारीच्या टपावरच चढून झोपी जात.

सकाळच्या वेळी मी सिंहांना घेऊन फिरावयास जात असे. चांगले तीन-चार तासपर्यंत. अशा रीतीने आजूबाजूच्या सर्व प्रदेशाशी मी त्यांना चांगलेच परिचित केले होते. बॉय आणि गर्ल या दोघांनी आतापर्यंत हत्ती, हरीण, गेंडा, रानम्हैस, जिराफ, झेब्रा इत्यादींची शिकार केली होती.

एके दिवशी बॉयला शहामृगांचा कळप दिसला. लगेच बॉयने झेप घेतली. गर्ल पण त्याच्या मागोमाग होतीच. शहामृगाची जात मोठी चलाख. त्यांनी बॉयला पाहताच पळायला सुरुवात केली. बॉय आणि गर्ल पण जीव खाऊन त्यांच्या मागोमाग पळू लागली आणि पळून पळून दमून गेली. आलेल्या अनुभवाने त्यांनी पुढे शहामृगासारख्या व हत्ती-गेंड्यासारख्या प्राण्यांची शिकार करणेच बंद केले. त्याचप्रमाणे तावडीत सापडलेल्या प्राण्यांना प्रथम घाबरवून सोडावे आणि ते बेसावध असताना अचानक हल्ला करावा, या गोष्टीही ती



**शिकारीसाठी लागलेली नजर**

तिथेच शिकली.

इथे आल्यानंतर काही दिवसांनी त्यांना एक हत्ती दिसला. दोघांनी मिळून आपले कौशल्य पणाला लावून त्याला घेरले. पण त्यांच्या अगोदर जेव्हा हत्तीच त्यांच्यावर तुटून पडला तेव्हा ती दोघे घाबरली आणि बाजूला झाली. ती दोन्ने थकून गेली होती. थोडासा दम खाऊन ती दोघे परत पुढे सरसावली. पण काहीच हाती लागले नाही.

असाच एके दिवशी एक गेंडा अगदी आमच्या तंबूजवळ आला. बॉय आणि गर्लने त्याचा पाठलाग केला. गेंडा बराच दूर निघून गेल्यावर ती दोघे परतली.

बॉय आणि गर्लला आपल्या जन्मजात गुणांचा विसर पडला नव्हता हे पाहून मी मनातल्या मनात आनंदलो. लवकरच त्यांची शरीरे मजबूत आणि तकतकीत दिसू लागली. त्यांची नजर, श्रवणशक्ती व घ्राणेंद्रिये दिवसेंदिवस तीव्र होऊ लागली. या प्रदेशातील जनावरे सिंहांच्या स्वभावाशी चांगलीच परिचित होती आणि म्हणूनच इतर जनावरे नेहमी सावध रहात असत. त्यामुळे या जोडीपुढे पोटापाण्याचा चांगलाच यक्ष प्रश्न उभा होता आणि दुसरी अडचण म्हणजे त्या भागात लहानसहान प्राण्यांची वस्ती अगदी कमी होती.

मी स्वतःच बॉय आणि गर्लसाठी

शिकार करीत होतो आणि सावज त्यांच्यापुढे आणून टाकीत होतो. पुढे पुढे मी त्यांच्या खाण्याचेच प्रमाण कमी केले. आठ-दहा दिवसातून एखाद्या जनावराची त्यांच्यासाठी शिकार करू लागलो. मात्र शिकारीत मारलेले जनावर आमच्या छावणीपासून बरेच दूर अंतरावर सोडून येत असे. त्यांनी त्यांच्यासाठी आणलेल्या भक्ष्यांचे इतर जंगली श्वापदांपासून संरक्षण करण्यास शिकावे असा माझा या मागील उद्देश होता. ज्यावेळी त्या दोघांना तहान लागलेली असे त्यावेळी त्यांच्यापैकी एकजण पाणी पिण्यासाठी जवळच्या तळ्यावर निघून जात असे व दुसऱ्याकडे आणून टाकलेल्या भक्ष्यावर पहारा देण्याचे काम असे. नंतर मी त्या दोघांसाठी शिकार करून आणलेला प्राणी खालच्या दरीत टाकीत असे. त्यावर गिधाडे तुटून पडत. बॉय आणि गर्ल या नरमादीला प्रशिक्षण देण्यासाठी मी हा उपाय अंमलात आणला होता.

सुमारे तीन महिन्यानंतर गर्ल या सिंहिणीने प्रथमच एक शिकार केली. तिने एक लांडग्याची शिकार केली होती. सुरुवात तर झाली. मी आनंदलो. त्यानंतर गर्ल या सिंहीणीनेच एक छोटे हरीण आणले. त्यानंतर तिने केलेली झेब्राची शिकार मी स्वतः पाहिली. झेब्राचा एक कळप चरत होता. जेव्हा चरण्यासाठी झेब्रांच्या माना खाली झुलत त्याचवेळी ती हळूहळू पुढे सरकत होती. जेव्हा झेब्रे मान ताठ करून वर सभोवार पाहू लागत. तेव्हा ती एखाद्या पुतळ्याप्रमाणे जागीच उभी राही. झेब्राच्या कळपापासून सुमारे चाळीस फूट अंतरावर एका झाडाच्या आडोशाला ती बसली. चरत चरत कळप तिच्याच रोखाने पुढे सरकत होता. सुमारे पंधरावीस फुटांच्या अंतरावर असताना तिने विजेप्रमाणे त्या कळपावर झेप घतली आणि कळपातल्या एका नर झेब्राची मान जबड्यात धरून त्याला जमिनीवर लोळवला. झेब्रा दोन तीन मिनिटातच गतप्राण झाला. गर्ल या सिंहीणीच्या शौर्याची कथा प्रत्यक्ष पाहिल्यामुळे मी पुरता भारावून गेलो.

## गर्लची धाडसी शिकार

रात्री दहाची वेळ. बॉय माझ्या मोटारीच्या टपावर झोपला होता. गर्ल त्याला एकट्याला सोडून अंधारात कुठे तरी निघून गेली. बॉयला जेव्हा जाग आली तेव्हा तो गर्ल जवळपास नाही हे पाहून मोठमोठ्याने ओरडू लागला. तासाभराने आमच्याकडे कामाला आलेल्या मजुराने येऊन सांगितले की, थोड्याच वेळापूर्वी मी गर्लला एका मृत हरणाजवळ पाहिली आहे. मी लगेच त्या मजुराबरोबर गर्लकडे निघालो. गर्लने स्वतःपेक्षा वजनाने चौपट असलेल्या हरणाची शिकार केली होती. जवळच उन्मळून पडलेल्या झाडाजवळ गर्लची आणि हरणाची गाठ पडली होती आणि तिथेच झटापट झाली होती. गर्ल दमून गेली होती. पण तिच्या अंगावर जखमा मात्र दिसत नव्हत्या. हरणाच्या मासावर भरपेट ताव मारल्यामुळे नेहमीपेक्षा बरेच जास्त असे तिचे पोट फुगलेले होते. मी तिच्या शौर्यावर खूष होतो.

आमच्या छावणीचा सुगावा तेथल्या सिंहाना पण लवकरच लागला आणि मग बारा नरमाद्या व त्यांचे लहान लहान छावे यांचा कळपच्या कळप आपल्या छावणीकडे नियमितपणे येऊ लागला आणि त्यामुळे कित्येक रात्री मला जागूनच काढाव्या लागल्या. त्या कळपांचा म्होरक्या एक आयाळवाला सिंह होता.

एके रात्री माझ्या कानावर सिंहाची कर्कश डरकाळी येऊन आदळली. बाहेर येऊन पाहिले. बॉय खाली पडला होता. आणि तो काळी आयाळवाला सिंह त्याच्या उरावर उभा होता. सिंहात-देखील जेव्हा एखाद्या बलिष्ठ सिंहाशी एखाद्या छोटया सिंहाची गाठ पडते. तेव्हा तो त्याच्यापुढे माघार घेतो व शरणागती पत्करून निपचिप पडून राहतो. मग साहजिकच बलिष्ठ सिंह-देखील त्याला सोडून देतो.

त्यानंतर काही दिवसांनी त्या बारा सिंहांच्या कळपाने पुन्हा एका रात्री आमच्या छावणीला घेरले. यावेळी मी अगदी सावध होतो. मी चटकन् गर्ल आणि बॉयला जवळ बोलावून घेतले.

परत काही दिवसानंतर छावणीच्या जवळ सिंहांच्या गुरगुरण्याचा आवाज आला. गर्ल तो कळप पाहून घाबरली आणि दूर एका टेकडीवर जाऊन बसली. बॉय तिच्याकडे गेला आणि त्याने तिला पुढे घालून आणले.

बॉय आणि गर्ल यांचे जंगली जीवन जगण्याचे प्रशिक्षण चालू असताना मला नॅशनल पार्कच्या अधिकाऱ्यांचे 'उगास' या सिंहाच्या संदर्भात पत्र आले. त्यांनी उगास या सिंहाला घेऊन जाण्याची परवानगी दिली होती. नारोमारू सोडल्यानंतर 'उगासने' चार महिन्यात सर्वानाच सतावून सोडले होते. मला पहाताच त्याने मला ओळखले आणि तो आनंदला. त्याच्याच पिंजऱ्यात 'मारा' ही सिंहिणदेखील होती. तिने देखील मला ओळखले.

नैरोबीला परत येण्यास आम्हाला अकरा तास लागले. या प्रवासात उगासला बराच त्रास सहन करावा लागला. त्याच्या चेहऱ्यावरचे काही ठिकाणचे चट्टे उडाले. तो बराच थकला पण होता. छावणीत पोहचल्यानंतर मी त्याला एका पिंजऱ्यात बंद केले. त्यात तो दिवसभर आणि रात्रभर झोपूनच होता. थोडीदेखील त्याने हालचाल केली नाही.

दुसऱ्या दिवशी मी त्याला बाहेर काढताच त्याने लगेच बॉयवर झेप घेतली. आणि त्याच्या निदर्शनास आणून दिले की, मी तुझा सरदार आहे. गर्ल-बॉयच्या मदतीसाठी धावून आली. नंतर ती दोघेही झाडाच्या सावलीत जाऊन बसली.

उगास आता बराच मोठा झाला होता. पण नारोमारूमध्ये ज्याप्रमाणे आपुलकीने तो माझ्याबरोबर वागत होता. तसाच आतादेखील वागत होता.

त्या रात्री अकराच्या सुमारास मी तंबूत लिहीत बसलो होतो. उगास जवळच्याच दरवाज्याजवळ झोपी गेला होता. त्याचवेळी सिंहांची डरकाळी

माझ्या कानावर पडली. रायफल घेऊन मी बाहेर पडलो. पण मला पहाताच त्या आयाळवाल्या सिंहानं धूम ठोकली होती. उगासही त्याच्या मागोमाग गेला. थोडयाच वेळाने उगास माझ्या-जवळ आला. त्याच्या तोंडातून रक्ताचे थेंब ठिबकत होते. त्या सिंहाने उगासच्या वरच्या भुवईवर व खालच्या जबडया-जवळ जखमा केल्या होत्या. चेहऱ्यावर झालेल्या जखमांनी उगासच्या चेहऱ्यावर सूज आली आणि जखमा ठणकू लागल्या. मी त्याला रोज एक पेनि-सिलीनचे इंजेक्शन देत होतो. आठवडया-भरात त्याच्या चेहऱ्यावरील जखमा सुकल्या.

आठवडयानंतर जंगलातील सिंह परत उगासबरोबर लढण्यासाठी आमच्या छावणीजवळ आला. वेळीच मी येऊन पोहोचलो आणि त्याला पळवून लावले. मात्र यावेळी उगास बदला घेण्याच्या पवित्र्यात उभा होता. उगास त्याच्या मागे पळत सुटला. उगासला सुखरूप आणण्यासाठी मी रायफल घेऊन त्याच्या मागोमाग निघालो. उगासचा शत्रू आक्राळविक्राळ डरकाळया फोडीत दूर चालला होता. नंतर मी उगासला खुणावले की, तू तुझ्या शत्रूला दूरवर पिटाळून लावण्यात यशस्वी झाला आहेस. आता मागे फिर.

बॉय आणि गर्लबरोबर त्यांचे चांगलेच सूत जमले होते. परंतु त्यांच्या-बरोबर राहण्यापेक्षा तो माझ्याबरोबरच राहणे अधिक पसंत करीत असे. मी त्या तिघांना बरोबर घेऊन फिरावयास जात असे. वाटेतच बॉय आणि गर्ल मला सोडून एखाद्या झाडाखाली बसत आणि तीन-तीन चार-चार दिवस छावणीकडे परतत नसत.

रात्री ती तिघे झोपी गेल्यावर मी जेव्हा एकटाच बाहेर पडत असे तेव्हा उगासही माझ्या मागोमाग येत असे. त्याचा माझ्यावर फार जीव होता. पण मला वाटायचे त्यानेदेखील जंगलातले स्वतंत्र जीवन जगायला हवे. बॉय आणि गर्लची चांगलीच जोडी जमली होती. उगास मात्र एकटाच होता. त्यालादेखील एखादी जोडीदारीण असावी. असं मला वाटत असे. अशावेळी 'मारा'ची अनु-पस्थिती मला चांगलीच जाणवत होती. तिच्यासारख्या चपळ जोडीदारणीचीच उगासला अत्यंत आवश्यकता होती.

एकदा बॉय आणि गर्ल तीन दिवस बेपत्ता होती. मी सकाळीच उठून त्यांच्या शोधासाठी बाहेर पडलो. उगासही माझ्याबरोबर होता. पाण्याच्या धारेतून पलिकडे आम्ही जात असताना आम्हाला गर्ल आणि बॉय जंगली म्हशीचा पाठलाग करीत असताना दिसली. उगासनेही समोरून त्यांच्याबर झेप घेऊन त्यांचा मार्ग रोखण्याचा प्रयत्न केला. पण त्या जंगली म्हशींनी उगासची आपल्या शिंगांच्या सहाय्याने चांगलीच हजेरी घेतली. त्यानंतर त्याने माझ्यावरच सरळ झेप घेतली. मला वाटले, मला त्याने पाहिले नसावे. म्हणून मी हातवारे करीत, मोठमोठयाने ओरडू लागलो आणि जवळच्याच एका झाडाआड झालो. जंगली म्हैस, क्रोधाने

पेटून निघाली होती. तिने मला या तीन सिंहांचा जोडीदार समजून जोरात माझ्यावरच झेप घेतली. यातून वाचण्याचा एकच मार्ग होता. आणि तो म्हणजे तिला गोळी घालणे.

दहा फुटाच्या अंतरावरून मी तिच्या माथ्यावर गोळी झाडली. ती तेथेच धाडकन कोसळली. आणि ती जंगली म्हैस खाली कोसळताच ही तिघे लगेच तिच्यावर तुटून पडली.

त्या तिघात उगासची घ्राणेंद्रिये अधिक तेज होती. नेहमी तोच माझ्या मागे येत असे. त्या दिवशी मीच त्याच्या पाठीमागे चाललो होतो. मला वाटले, त्याला आपल्या भक्ष्यांचा सुगावा लागला असावा आणि म्हणूनच आज तो माझ्यापुढे चालला होता. आमच्या पुढे थोड्याच वेळापूर्वी मरून पडलेले हरिण होते. उगास त्याच्यावर तुटून पडला. पोट भरेपर्यंत मांस खाल्ल्यावर तो तेथून निघाला. तिथून थोड्याच अंतरावर आम्हाला बॉय आणि गर्ल भेटली. त्यांची पोटं भरलेली दिसत होती. त्यांनीही एक हरिण मारून फस्त केलेले होते.

आमच्या छावणीभोवती भक्कम असे तारेचे कुंपण होते. कुंपणातून आत यायचे तर उगासला खालच्या तारेवर जोर देवून ती वाकवून मग उडी टाकून आत यावे लागत असे. रात्री कुंपणाचे दार लागल्यावर उगास या मार्गाचा अवलंब करीत असे. एकदा तर याच मार्गाचा अवलंब करून उगासच्या मागोमाग बॉय व गर्ल आत आली. आणि माझ्या तंबूत येऊन माझ्या अवतीभवती झोपी गेली. मी सारे पाहिले. पण उठलो नाही. तसाच झोपी गेलो. माझ्या आसपास त्यांच्या झोपण्यामुळे एकच त्रास व्हायचा आणि तो म्हणजे ती जेव्हा माझ्या जवळपास झोपत तेव्हा लघवी तेथेच करीत. आणि त्यांच्या त्या लघवीच्या उग्र वासाने माझे डोके भणाणून जात असे.

## इष्काचा फासा

गर्ल आता सत्तावीस महिन्यांची झाली होती. तिच्या चालण्या वागण्यातून आता कामुकता प्रकट होऊ लागली होती. ती आता बरीच अवखळ झाली होती. अवखळपणा पाहून उगास या सिंहाने तिच्यावर इष्काचा फासा फेकला. पण तिने त्याला दाद दिली नाही. एकदा गर्लने उगासवर एवढ्या जोरात हल्ला चढविला की, तो खड्ड्यातच जाऊन पडला. गर्लचा जोडीदार बॉय त्याच्याबरोरही तिचे वरचेवर खटके उडत असत. कधी कधी गर्ल आपण होऊन एखाद्या गोगलगाईप्रमाणे वागत असे. उगासने मात्र तिच्यावर इष्काचे फासे टाकणे जवळ जवळ सोडून दिले होते. तो अलिकडे एकटे राहणच अधिक पसंत करीत असे.

१९६५ च्या शेवटी बॉय आणि गर्ल सव्वादोन वर्षाची झाली होती. उगासही तीन वर्षांचा झाला होता. मला साठ वर्षे व्हायला फक्त एकच महिना कमी होता. सर्वसाधारणतः सिंहिणी भरदार असतात. पण गर्ल त्या मानाने हलकी फुलकी वाटत होती. बॉय उंचीने उगास

इतका होता—पण वजनाने त्याच्यापेक्षा कमी होता. उगास हा मात्र चांगला भरलेला सिंह दिसत होता. बॉय आणि गर्ल ही सिंह नरमादीची जोडी आता जंगली जीवन जगायला पूर्ण समर्थ झाली होती. त्यामुळे त्यांना आता कायमचेच जंगलात सोडून देण्यास कोणतीच हरकत नव्हती. उगास पण जंगली जीवन जगण्यास पूर्ण समर्थ झाला होता. पण त्याच्याबाबतीत माझ्यासमोर एक अडचण उभी होती. तो एकटाच होता. त्याला जोडीला मादी नव्हती. म्हणून तो माझ्याचबरोबर कायम असायचा. गर्ल माझ्याकडे नेहमी उगास व बॉय या सिंहांबद्दल तक्रारी घेऊन येत असे. माझ्याजवळ नेहमी सायकल असायची. कधी कधी हे सिंह आपापसातल्याप्रमाणे माझ्याबरोबरही खेळ सुरू करीत आणि मला पण जमिनीवर लोळवीत. पण त्यांनी कधी माझ्या अंगावर जखमा केल्या नाहीत. मलाही माझ्या सिंहांबद्दल पूर्ण विश्वास होता की, ते मला मारणार नाहीत. त्यामुळे जवळच्या रायफलचा उपयोग फक्त जंगली श्वापदांच्या शिकारीसाठीच मी करीत असे. जेव्हा बॉय किंवा उगास मला जास्त त्रास देण्याचा प्रयत्न करीत तेव्हा मी त्यांना रायफलच्या बुंध्याच्या ढुसण्या देऊन पिटाळून लावीत असे.

त्या तिघांबरोबर मी बाहेर फिरायचयास जात असे तेव्हा कधी कधी जवळ काहीच न घेता जात असे. कारण, माझा त्यांच्यावर पूर्ण विश्वास होता. माझ्या वृद्धत्वाची त्यांना कल्पना होती. म्हणूनच ती माझ्याशी जास्त दंगामस्ती करीत नव्हती.

## सुसुआ, सुकी, सेलो, सैतानी

जानेवारी १९६६ मध्ये सुरुवातीला नेवासा सरोवराजवळ राहणाऱ्या आमच्या काही मित्रांनी मला सिंहाचे चार छावे दिले होते. त्यात एक नर होता व तीन माद्या होत्या. चारीही पाच पाच महिन्यांची होती. आतापर्यंत मला उगाससाठी मादी मिळाली नव्हती म्हणून मी त्या चारी छाव्यांना ठेवून घेतले. त्या लोकांना मात्र आनंद झाला. त्यांना वाटले की मिटली आमच्या मागची कटकट ! त्या चार छाव्यांची नावे 'सुसुआ', 'सुकी', 'सेलो', आणि 'सैतानी' अशी होती. ज्यावेळी ती चौघे आमच्या छावणीत आली, तेव्हा ती गुबगुबीत होती. सुसुआ नर होता. चौघात 'सैतानी' ही फारच चंचल स्वभावाची होती. पहिले चार दिवस मी त्यांना निरनिराळ्या पिंजऱ्यातून बंद करून ठेवले होते. त्यांच्या आणि इतर सिंहाच्या मार्गात जाळी टाकली होती. त्यांचा आपसात परिचय व्हावा हा यामागे माझा उद्देश होता. एकीकडे सिंहाचे चार छावे तर दुसऱ्याबाजूला बाकीचे सिंह होते. सिंह दुरूनच टुकूटुकू पहात. पण ही चार पिले काटेरी जाळीजवळ येत व मोठ्या सिंहांना पाहून नाके खाजवित. उगास बारीक आवाजात त्यांच्याबरोबर बोलत बसत असे. गर्ल तासन्तास त्यांच्याकडे टक लावून पहात बसत असे. जेव्हा ते

चार बछडे तिच्याजवळ येऊ लागत तेव्हा ती गुरकावून त्यांना भिववून सोडीत असे. उगास मात्र त्यांच्याशी घरच्याप्रमाणें वागत असे. पाचव्या दिवशी मी त्यांच्यामधील काटेरी कुंपण काढून टाकले आणि ते चारही बछडे लगेच उगासजवळ गेले. उगास गोंधळला आणि उडी टाकून निघून गेला.

त्या दिवसानंतर दर दिवशी मी त्यांना तीन चार तास मोकळेच सोडीत असे. ती चौघे आजूबाजूला खेळत. आणि खेळून दमल्यावर मी परत त्यांना पिंजऱ्यात बंद करीत असे. दुपारी उन्हापासून त्यांचा बचाव पिंजऱ्यातच होत असे. संध्याकाळी त्यांना एक एक बाटली दूध निपल लावून देत असे. आठवड्यातून दोनदा त्यांच्यापुढे एक बकरी मारून टाकीत असे. ती चारही पिले त्या बकरीवर तुटून पडत आणि मांसाचे लचके तोडण्याचा प्रयत्न करीत हे पाहून मला फार गंमत वाटायची.

पहिले काही दिवस हे असेच चालले होते. एके दिवशी दरवाजा उघडताच 'सैतानी' पळत बाहेर निघाली आणि तिच्यामागे इतर तिघे—ती चौघे मुवोवोंगो पर्वताच्या दिशेने धावली. आणि थोड्याच वेळात दिसेनाशी झाली. थोड्या वेळाने ती चौघे शिखरावर दृष्टीस पडली. त्यांच्यामागे निळे आकाश तेवढे दिसत होते. तिथे ती चौघे फारच सुंदर दिसत होती. मी जेव्हा माझ्या नोकराला घेऊन तिथे जाऊन पोहचलो तेव्हा ती चौघे परत गायब झाली होती.

ती रात्र त्यांच्या शोधाशोधीतच गेली. दुसऱ्या दिवशी मी परत नोकराला घेऊन निघालो. ती चौघेही एकदम समोर येऊन उभी राहिली. त्यांनी चांगलीच दंगामस्ती केलेली दिसत होती.

पुढे ती सर्वजण एकदम गायब झाली होती. आम्ही त्यांना शोधावयास जेव्हा बाहेर पडलो. तेव्हा ती सर्वजण एका लहानशा गुहेत बसलेली आढळली. त्यांना खूप हाका मारल्या. पण ती काही केल्या बाहेर निघेनात. याच वेळी मला खालच्या मैदानात उगास दिसला. मी त्याला हाक मारली. माझी हाक ऐकताच तो वर आला. त्याला पहाताच ते चारही छावे पटकन बाहेर आले. आणि मग सर्वजण आमच्या मागे लुटूलुटू चालत आमच्या छावणीजवळ आले.

सप्टेंबरच्या सुरूवातीपासून उगासचे डोळे दुखू लागले. दिवसेंदिवस त्याचे डोळ्यांचे दुखणे वाढू लागले. मी त्याला इंजेक्शन दिले. मलम लावले. कधी आराम पडत असे. तर कधी कधी फिरून दुखणे वाढत असे. त्याच्या डोळ्यात रक्ताप्रमाणे लाली उतरली होती. एकदा तर त्याच्या डोळ्यांना आलेली सूज ओसरली, त्याला आराम पडला. पण लगेचच परत सूज चढू लागली. आणि पहिल्यापेक्षा दुप्पट सूज चढली.

तो त्या चार पिलांबरोबर काटेरी कुंपणाबाहेर बसला होता. इतक्यात कर्कश आवाज कानावर पडला. वाटलं जंगली सिंहांचा कळपच आला. चार पिले व उगास त्या आवाजाच्या रोखाने

पळत सुटली. मी त्यांच्यामागे त्यांच्या रक्षणासाठी रायफल घेऊन पळत सुटलो. थोड्या अंतरावर मला चार सिंहाची पिले एका खडकावर बसलेली आढळली. पण उगास कुठे दिसला नाही. थोड्या वेळाने त्या पिलांना घेऊन मी छावणीकडे परतलो.

सुमारे वीस पंचवीस मिनिटांनी आक्राळ विक्राळ आवाज काढीत उगास छावणीकडे परतला. त्याचे आधीच सूज आलेले डोळे रक्तासारखे लाल दिसत होते. आजाराने तो वैतागून गेला होता. हवेत पंजे उडवित तो उंच उड्या मारीत होता. थोडासा शांत झाल्यावर मी त्याला इंजेक्शन दिले आणि थोड्याच वेळात तो झोपी गेला.

नंतर मी डॉ. हार्थून व त्यांच्या पत्नीशी बिनतारी संदेशाद्वारे बातचीत केली व उगासला ताबडतोब समक्ष येऊन पाहून जाण्याची विनंती केली. ते नैरोबीतील विख्यात पशु-चिकित्सक होते. व या अगोदर बरेच वेळा त्यांनी उगासला पाहिले होते.

दुसऱ्या दिवशी विमानाने ते नैरोबीहून आले. त्यांनी उगासच्या डोळ्यांची बारीक तपासणी केली. त्यात त्यांना आढळून आले की, एका विषारी झाडाच्या पानाचे तुकडे त्याच्या डोळ्यात गेले आहेत. डोळ्यांना आराम पडेल याची आशा नव्हती. म्हणून आम्ही त्याचा डोळा काढण्यास परवानगी दिली. बिचारा उगास !

जखमा भरून येण्यास तीन आठवड्यांपेक्षा जरा कमी वेळ लागला. टाके काढण्याची वेळ आली. डोळा खराब झाल्यामुळे उगासचा एक डोळा काढावा लागला होता. एक डोळा गमवावा लागल्यामुळे त्याला दुःख तर झालेच. पण मग परत नेहमीच्या दैनंदिन जीवनाला सुरुवात झाली.

सिंहाची चार पिले छावणीत आल्यापासून त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न माझ्यापुढे उभा राहिला होताच. त्यांचे वाढते वय व वाढता आहार पुरविणे तर निकडीचेच होते. सुमारे अठरा महिन्यांची होईपर्यंत तरी ती आपल्यासाठी शिकार करतील याची आशा नव्हती. अठरा महिन्यांची झाल्यावर देखील एखाद्या मोठ्या सिंहाच्या सहाय्याखेरीज त्यांना लगेच शिकार करता येणार नव्हती. मोठे सिंह शिकार करताना या पिलांबरोबर कसे काय वागतात हे पाहणेही अगत्याचे होते.

यासाठी मी शिकारीत मारलेला एक झेब्रा बाहेर टाकला व लहान पिलांना व मोठ्या सिंहांना सोडले. या पिलांना मासाचे लचके तोडता येतील की नाही याबद्दल मी स्वतः सांशक होतो. प्रथम उगासने झेब्र्यावर भरपेट ताव मारला. नंतर बॉय आणि गर्लने व त्यांच्याबरोबरच त्या पिलांनी. सिंह जेव्हा आपल्या भक्ष्यावर तुटून पडतात तेव्हाचे दृश्य पाहण्यासारखे असते. मोठे सिंह कान पकडून पिलांना वाजूला काढतात. त्यांचे त्यावेळी चाललेले आरडणे ओरडणे तर विचारू नका. सगळा भाग दणाणून उठतो त्या आवाजाने. कधी कधी मांसाचा तुकडा दोन

सिंह दोन बाजूंनी तोंडीत असल्याचे दृश्य दिसते. दोघेही दोन बाजूंना ओढीत असतात. वाटते जुंपणार भांडण त्या दोघात. पण लवकरच एकजण तुकडा सोडतो व बाजूला होतो.

शिकारीसाठी मोठ्या सिंहांबरोबर मी छोट्या पिलांनाही बाहेर सोडीत असे. वेळप्रसंग आलाच तर मोठे सिंह त्यांचे रक्षण करतील, असा मला विश्वास वाटत होता. मोठ्या सिंहांना लहान पिलांना बरोबर ठेवणे उचित वाटत होते. जेव्हा मारलेल्या प्राण्यावर घारी आणि गिधाडे तुटून पडत तेव्हा त्यांना पिटाळून लावण्याचे काम ही पिले पार पाडीत असत. त्यामुळे मोठ्या सिंहांना भरपूर मांस खाता येत असे.

ती पिले साडेसात महिन्यांची झाल्यावर माझी खात्री पटली की, स्वतःचे संरक्षण करण्याचे कामी ती आता समर्थ झाली आहेत. म्हणून त्यांना पिंजऱ्यात ठेवण्याचे मी बंद केले.

एका रात्री वादळ सुटले. छावणी-समोर मोठा आवाज झाला. मी रायफल घेऊन बाहेर पडलो. पण बाहेर पाऊस पडत असल्याने व डोळ्यात बोट घातले तरी दिसेना. म्हणून काहीच करता येईना. ती चार पिले घाबरून पळत येऊन तंबूजवळ लपली. सिंहांच्या ओरड-ण्याचे आवाज कानावर पडले. मी गाडी घेऊन व रायफल खांद्यावर टाकून निघालो. मी जेव्हा तीव्र प्रकाशाचा झोत आवाजाच्या रोखाने टाकला. तेव्हा प्रकाशात अकरा डोळे चमकत असलेले दिसले. इतर पाच सिंह व उगास हे माझ्या लक्षात आले. बॉय आणि गर्लला मी ताबडतोब ओळखले. बऱ्याच हाका मारल्यावर उगास जवळ आला. त्याला गाडीच्या मागच्या पिंजऱ्यात बंद केले. आणि छावणीकडे त्याला एकट्यालाच घेऊन आलो. छावणीजवळ आल्यावर पिंजरा उघडला. तेव्हा त्याने खाली उडी मारली आणि परत जंगलाच्या रोखाने निघून गला. दुसऱ्या दिवशी मला कळले की, आपल्या सिंहांनी एका सिंहिणीला व तिच्या दोन पिलांना त्या भागातून पिटाळून लावले होते.

हळू हळू आमचे सिंह व पिले जंगली जीवन जगण्यास समर्थ होऊ लागली होती. आता आपला बहुतेक सर्व वेळ ते जंगलातच घालवित असत. पिले सर्वसाधारणपणे बॉय व गर्ल बरोबरच असायची. एकदा उगास, बॉय व त्यांच्या समवेत चार पिले छावणीकडे परतली. गर्ल ही बॉय या नराबरोबरच कायम असायची. आता ती बॉयच्या मागे होती. बऱ्याच अंतरावर. बॉयने ओरडून तिला हाक मारली आणि माझ्याकडे दीनवाण्या दृष्टीने पाहिले. मी रायफल घेऊन त्यांच्या समोरून निघून गेलो.

मी सुमारे अर्ध्या मैलावर येऊन पोहोचलो होतो. मी गर्लला हाक मारली. झाडीतून गुरगुरण्याचा आवाज कानावर येऊन पडला. तिथून सुमारे पन्नास फुटांवर मला एक सिंह दिसला. मला पाहून तो गुरगुरु लागला. पण मी मात्र तेथून हललो नाही. नंतर तोच तेथून निघून गेला. नंतर गर्ल दिसली. मला पाहून ती माझ्याजवळ आली. ती

लाजून चूर झालेली दिसत होती. तिच्या खांद्यावर तिच्या प्रियकराच्या दातांचे ठसे उमटलेले दिसत होते. ती माझ्या मागोमाग छावणीकडे परतली. बॉय मात्र तिच्याकडे रागाने पाहत होता.

त्यानंतर काही आठवडे उलटले. त्यानंतर असेच एकदा बॉय आणि गर्ल दोघेही गायब झाली होती. चवथ्या दिवशी जेव्हा जेव्हा ती दोघे छावणीकडे परतली. तेव्हा त्यांची पोटे चांगलीच गुबगुबीत दिसत होती. बॉयच्या खांद्यावर एखाद्या जंगली जनावराच्या शिंगाने जखम केल्यासारखी दिसली.

## उगासची जोडीदारीण

जूनच्या सुरवातीलाच एके दिवशी मला छावणीपासून जवळ आवाज ऐकू आला. तो प्रणयी सिंहाचाच असावा याविषयी माझी पूर्ण खात्री पटली होती. मला वाटले उगास आणि गर्ल प्रणयक्रीडा करीत असावीत. मी गाडी आणि रायफल घेऊन निघालो. उंच गवतात दहा मिनिटेपर्यंत गप्प उभा राहिलो. जवळ परत तसाच आवाज ऐकायला मिळाला. थोड्या वेळाने एका नरमादीची सिंहाची जोडी समोरून चाललेली दिसली. त्यातला एक उगासच होता. आता मी गाडीवर चढून पाहू लागलो. त्याच्यामागून चाललेली मादी गर्लसारखीच दिसत होती. परंतु ती फारच लाजाळू दिसत होती. त्यांना त्रास देणे उचित वाटले नाही. म्हणून मी परत तंबूकडे परतलो. तेथे बॉय आणि गर्ल दिसली. आणि साहजिकच उगासने एक जंगली सिंहीण जोडीदारीण मिळविली आहे याविषयी माझी पुरेपूर खात्री झाली.

त्यानंतर बॉय आणि गर्ल तीन दिवसपर्यंत गायब झाली होती. त्यांना शोधण्यासाठी मला दोन मैलांची पायपीट करावी लागली. दोघेही प्रणयक्रीडेत दंग असल्याचे पाहून मला मात्र आश्चर्य वाटल्याशिवाय राहिले नाही. मला पाहताच ती माझ्याकडे आली आणि गाडीच्या टपावर चढली व परत प्रणयक्रिया करू लागली. मी त्यांना घेऊन छावणीकडे निघालो. पण वाटेतच गर्लने वरून खाली उडी टाकली आणि तिच्या मागोमाग बॉयने. पण बॉय तर गाडीपुढे येऊन आडवाच पसरला. थोडा वेळ थांबून मी परत गाडी सुरू केली. परत बॉय पुढे येऊन आडवा पसरला. स्पष्ट दिसत होते की, त्यांचा छावणीकडे येण्याचा विचार दिसत नव्हता. शेवटी मी त्यांना तिथेच सोडले. ती दोघे एका झाडाच्या सावलीत जाऊन बसली, हा रोमान्स चार दिवस चालला होता. या अवधीत बॉय इतका रागीट बनला होता की, उगासला देखील त्याच्यापुढे जाण्याची हिंमत होईना.

पाचव्या दिवशी बॉय आणि गर्ल परत छावणीकडे परतली. त्यांना पाहताच उगासने गर्लवर झेप घेतली. पण गर्लवर अधिकार प्रस्थापित करणे ही गोष्ट सोपी नव्हती. बॉय लगेच पुढे सरसावला, आणि त्या दोघातच जोरदार लढाई सुरू झाली. मी अगदी वैतागून गेलो व त्यांच्यामधून निसटण्याचा प्रयत्न केला. मला त्यात यश आले.

उगासने बॉयच्या पायाला चावा घेतला होता. त्या प्रसंगानंतर उगासने गर्लचा कायमचाच नाद सोडून दिला. गर्ल गर्भवती दिसत होती.

ऑगस्टमध्ये आमची चार पिले वर्षाची झाली. ती नेहमी बॉय आणि गर्लबरोबर असत. काही महिन्यातच यांचीही एक हुशार टीम तयार होईल, असा मला त्यांच्याबाबतीत विश्वास वाटत होता.

एके दिवशी तिथून चार मैल दूर असणाऱ्या नदीच्या रोखाने आमच्या सिंहांची पावले दृष्टीस पडली. मी त्या दिशेने पुढे निघालो. मैलभर अंतरावरच ते चार छावे परत येत असताना दिसले. ते माझ्याजवळ न थांबता छावणीच्या रोखाने निघाले. तेथून जरा पुढे गेल्यावर बॉय आणि गर्ल दिसली. वैतागलेल्या अवस्थेत. मला पाहून माझ्याकडेच आली. माझ्याकडे येत असताना ती अधूनमधून पाठीमागे दृष्टिक्षेप टाकीत होती. त्याचवेळी नदीजवळ दोन सिंह दिसले. मला वाटले, त्यातला एक उगासच असावा. परंतु त्यातील एक काळी आयाळवाला सिंह होता आणि दुसरा, ज्याच्याबरोबर गर्लला मी एकदा पाहिले होते–तो होता. त्या दोघांनी मला फार सतावले होते. मला पाहून बॉय आणि गर्लला धीर आला. मात्र मला वाटत होते की, या दोघांचा त्या जंगली सिंहापुढे टिकाव लागू शकणार नाही. थोड्या वेळपर्यंत दोन्ही बाजूंकडे गुरगुरण्याचे प्रकार चालले होते. नंतर ते दोघे जंगली सिंह नदीच्या रोखाने निघून गेले. सिंह सर्वसाधारणपणे दुसऱ्याच्या हद्दीत येत नाहीत.

त्यानंतर आठवडा उलटला आणि असाच एके दिवशी उगास छावणीतून निघून गेला आणि दोन दिवसपर्यंत छावणीत आलाच नाही. मी त्याच्या शोधार्थ निघालो. एका पाण्याच्या ओहळापलीकडील झाडीतून दोन सिंहिणी येत असलेल्या दृष्टीस पडल्या. त्यांच्या मागोमाग उगास होता आणि त्यांच्यामागे बॉय आणि चार पिले. थोड्या वेळानंतर उगासने त्यातील एका सिंहिणीबरोबर प्रणयक्रीडा उरकली. बॉय निराश होऊन सारे काही पहात बसला होता. चार दिवस हा असाच कार्यक्रम चालला होता. या अवधीत उगासला आणि बॉयला काहीच खायला मिळाले नाही. उगास छावणीकडे परतला पण बॉय मात्र परतला नाही. उगास परतल्यावर बॉयनेदेखील सिंहिणीबरोबर संधान साधले असावे असे वाटू लागले. दुसऱ्या दिवशी जंगली सिंह परत आमच्या छावणीजवळ आले. पण आमच्या सिंहांनी त्यांना पिटाळून लावले.

पिलेदेखील स्वत: शिकार करू लागली आहेत, असे मला वाटू लागले. रात्रीची ती सर्व बाहेरच असत. एके दिवशी गर्लसमवेत मारलेल्या हरणाचे मांस ती पिले खात असताना दृष्टीस पडली. तेथे गेल्यावर माझ्या लक्षात आले की, पिल्लांनीच हरणाची शिकार केली होती.

गर्भ धारणेपासून १०८ दिवसांनी

सिहीण प्रसूत होते. या हिशेबानुसार गर्ल २६ ऑक्टोबरला प्रसूत होईल असा माझा अंदाज होता. आणि म्हणूनच त्या दिवसाची मी उत्कंठेने वाट पहात होतो.

गर्लसाठी मी झेब्रचाच्या शोधात असतानाच माझ्या गाडीला रानम्हशींनी वेढा दिला. मी एका म्हशीवर गोळी झाडली. गोळीच्या आवाजाने म्हशी सैरावैरा पळू लागल्या. जखमी झालेली म्हैस पुढे सरसावली. आणि तिने माझ्या पोटात जोराची धडक दिली. मी धाडकन खाली कोसळलो. मी परत उठून तिच्यावर गोळी झाडण्याच्या आतच ती पळून गेली.

पुढे हॉस्पिटलमध्ये माझ्या छातीची व पायांची एक्स-रे तपासणी झाली. त्यात माझ्या छातीच्या काही फासळचा व पायाचे हाड मोडल्याचे निदर्शनास आले.

मला मात्र गर्लचीच अधिक काळजी वाटत होती. कारण तिचे बाळंतपण अगदी जवळ येऊन ठेपले होते. पण सुदैवाने एक भारतीय तरुण अरुण शर्मा माझ्या मदतीसाठी आला. माझ्या अनुपस्थितीत माझ्यावर असलेला छावणीचा सर्व भार त्याने स्वतःवर घेतला.

अरुण शर्माने गर्ल छावणीकडे २४ तारखेला आल्याचे सांगितले. तिचा प्रसूतकाल अगदी जवळ आल्याचे तिच्या चर्येवरून जाणवले. तिने थोडेसे मटण खाल्ले. आणि ती मुगोवोंगो पर्वताकडे निघून गेली. दुसऱ्या दिवशी दिसली नाही. त्यानंतर २६ तारखेला आली. ती प्रसूत झाल्याचे स्पष्ट दिसत होते. छावणीत त्या दिवशी तिने बरेच मांस खाल्ले नि परत निघून गेली. दुसऱ्या दिवशी अरुण शर्मा नोकराला घेऊन तिच्या मागोमाग निघाले. त्यांनी गर्लला हाक मारल्यावर ती त्यांच्या जवळ आली. त्यांनी बरोबर आणलेले मटण तिच्यापुढे टाकले. तिने ते खाल्ले. पाणी प्याली – मग जरा दूर जाऊन बाजूला ठेवलेले आपले नवजात छावे दाखवले. दोघेही नरच होते. त्यांना पाहून शर्मा परत छावणीकडे परतले.

हॉस्पिटलमधून मी २ नोव्हेंबरला बाहेर पडलो. छावणीत पोहचल्यावर मी लगेच बाहेर पडलो. छातीच्या बरगडचा अजून दुखत होत्या. तसाच मी पुढे निघालो. गर्लने आपल्या पिलांना एका गुहेत ठेवले होते. त्यांनी डोळे उघडले होते. मला पाहून नाकात ती गुरगुरु लागली. एका महिन्यात तिने आपल्या पिलांच्या ठेवण्याच्या जागा पाच वेळा बदलल्या. संध्याकाळी जेव्हा ती आपल्या गुहेत उशिरा पोहचे त्यावेळी मला पिलांची काळजी वाटायची. आणि म्हणूनच मी तिला दोनदा चांगले खडसावले. तिने ते मानले आणि गप्प बसली.

आमच्या मोठया पिलांनी जेव्हा गर्लला अन् तिच्या पिलांना पाहिले तेव्हा तिला नवल वाटले. ती मोठी पिले जेव्हा गर्लच्या इवल्याशा पिलांबरोबर खेळण्यासाठी पुढे सरकू लागली. तेव्हा तिने त्यांना हाकलून लावले – मला आणि बॉयला मात्र तिने

जणु त्यांच्याजवळ जाण्याची परवानगीच दिलेली होती.

दुसऱ्या दिवशी मी गर्लच्या गुहेजवळ वळलो. पण तिथे ती व तिची पिले नव्हती. निराश होऊन मी छावणीकडे परतलो तेव्हा तेथे आपल्या एका पिलाला घेऊन पर्वताकडे पहात बसलेली गर्ल दिसली. आम्ही तीन दिवसपर्यंत सारा परिसर पायाखाली घातला. पण गर्लचे दुसरे पिलू सापडले नाही. गर्ल जवळ राहिलेल्या पिलाचे नाव मी 'सेम' ठेवले होते. मला वाईट एका गोष्टीचे वाटत होते की, त्या पिलाला आता आपल्या भावाबरोबर खेळता बागडता येणार नव्हते.

पुढच्याच आठवड्यात गर्लने 'सेमला' एका गुहेत नेऊन ठेवले आणि त्याच्या वारंवार जागा बदलल्या. दोनदा तर परत तिने त्याला छावणीत देखील आणून ठेवले होते. आता सेमला ती मोठ्या पिलांबरोबर खेळण्यास परवानगी देऊ लागली. सेम उगासबरोबर खेळू लागला.

एके दिवशी मी जॉयला भेटावयास गेलो. जातेवेळी 'सेम' व 'गर्ल' एका झाडाखाली झोपल्याचे मी पाहिले होते. परंतु मी जेव्हा संध्याकाळी परतलो — तेव्हा 'सेम' दिसत नव्हता. गर्ल आणि सर्व सिंह तेथेच होते. गर्लने सेमला कोठे ठेवले ते दाखविण्यासाठी मी नाना प्रयत्न केले. पण तिने त्यात रुची दाखविली नाही. तिला 'सेमचे' देखील आकर्षण एक माता असूनही अलीकडे वाटेनासे झाले होते. ती परत माजावर येऊ लागली होती.

त्यानंतर परत तीन दिवस ती गायब झाली आणि चवथ्या दिवशी परतली. त्यावेळी तिने 'सेमला' तर बरोबर आणले नव्हतेच. पण त्याला दूध पाजल्याचेदेखील दिसत नव्हते. तिच्या खांद्यावर सिंहाच्या दातांचे ठसे उमटलेले दिसत होते. यावरून ती कुणी तरी सिंहाच्या सहवासात राहिल्याचे स्पष्ट होत होते. रात्री ती परत निघून गेली. पावसामुळे तिच्या पावलांचे ठसे देखील दिसू शकले नाहीत. पण माझे मन राहीना. दुसऱ्या दिवशी मी परत तिच्या शोधासाठी निघालो. खूप भटकलो पण ती कोठेच सापडली नाही. तेव्हा मी निराश होऊन छावणीकडे परतलो आणि नाश्ता करू लागलो. तेव्हा नोकराने येऊन सांगितले की, छावणीच्या मागे त्याने 'सेम'चा आवाज ऐकला आहे. मी बाहेर जाऊन पाहिले. तेथे बॉय आणि गर्लच्या पाठीमागे 'सेम' उभा होता. बॉयने आणि गर्लने माझे स्वागत केले. बिचारा 'सेम' अगदी 'अस्थिपंजर.' दिसत होता.

तेथे उगास आला आणि गर्लच्या रोखाने निघाला. परत बॉय आणि उगास यांच्यामध्ये जोरात धुमश्चक्री सुरू झाली. त्यांच्या भयंकर आवाजाला घाबरून 'सेम' पळून गेला व वर बाजूला लपून बसला. मी त्याला शोधण्यासाठी निघालो. मी व अरुण बॉय आणि गर्ल जवळून जाऊ लागताच बॉयने अरुणवर झेप घेतली आणि त्याने त्याला आपल्या पंज्यांनी घायाळ केले.

हातातल्या छडीने मी बॉयला बाजूला हटवले आणि अरुण शर्माला गाडीत जाऊन बसण्यास सांगितले. इतक्यात बॉयने माझ्यावरदेखील झेप घेतली. मी हातातल्या छडीचा फटका त्याच्या कानशिलात लगावला. तेव्हा तो शुद्धीवर आला आणि गर्लजवळ जाऊन बसला.

अरुणला गंभीर अशा ज़खमा झालेल्या नव्हत्या.

आता सेमच्या आयुष्याचा प्रश्न पुढे उभा होता. बाटलीने दूध पाजून त्याला लहानाचा मोठा करावयाचे मी ठरविले. माझ्या पत्नीचा विचार होता की, मी त्याला एकट्याला घेऊन, सहा महिनेपर्यंत तिच्याजवळ रहावे. पण सहा महिन्यानंतर ओळख बुजल्यावर सेमपुढे इतर सिंहाबरोबर कसे रहावयाचे हा प्रश्न निर्माण झाला असता. म्हणून मी सेमला घेऊन सिंहांच्या सान्निध्यातच राहिलो.

एके दिवशी सेम एका उघड्या पेटीत झोपला असताना एक सिंह आला आणि तो सेमची मान तोंडात धरून चालू लागला. मला पहाताच तो सिंह थांबला आणि सेमला तोंडातून खाली टाकून निघून गेला. मी धावतच सेमजवळ गेलो. पण सेमचा प्राण निघून गेला होता. या घटनेचा माझ्या मनावर फार परिणाम झाला आणि काही आठवडे छावणी सोडून मी परगावी निघून गेलो.

मी तिकडून परतलो तेव्हा गर्लचे दुसरे बाळंतपण अगदी जवळ येऊन ठेपल्याचे दृष्टीस पडले. ९ मे रोजी तिने दोन माद्यांना जन्म दिला. दोन्ही दिसायला फारच सुंदर होत्या.

आता मात्र माझ्या मनाची पूर्ण खात्री पटली होती की, माझे सर्व सिंह जंगली जीवन जगावयास पूर्णपणे समर्थ झालेले आहेत आणि म्हणूनच मी आता परत निघण्याचा विचार केला.

आणि मग एके दिवशी सर्व सामान आवरून मी माझ्या सर्व सिंहांचा निरोप घेऊन परत निघालो. त्यावेळी बॉय, गर्ल, तिची दोन पिले, उगास माझ्या गाडीभोवती मला निरोप देण्यासाठी जमले होते. त्यांना काय ठाऊक की, मी आता कायमचाच निरोप घेणार आहे.

गाडी सुरू झाल्यावर पोरासोराप्रमाणे ती सर्व माझ्या गाडीमागे पळत होती. गाडीने वेग घेतल्यावर ती थबकली आणि आजूबाजूच्या झाडीतून गडप झाली.

गाडीने घराच्या रोखाने प्रवास सुरू केला होता. पण माझे मन त्या जंगलात सोडलेल्या माझ्या सिंहांभोवती घोटाळत होते.

● ● ●

पुस्तके

एकाकीपणाची तुटक कहाणी

# बखर : एका राजाची

**अरुणा जोगळेकर**

एखादं पुस्तक वाचण्यासाठी हातात घेताना आपण कितपत कोऱ्या मनाचे असतो ? लेखकाचं नाव कळल्यावर त्या लेखकाच्या गुणावगुणांबद्दलचे आपले ग्रह त्या पुस्तक वाचनात अडथळा आणतात का ? आणि पुस्तकाचं मूल्यमापन करताना भोवती किती पुस्तकं उभी राहतात ? या प्रश्नांची चर्चा नवीन राहिली नाही, पण तरीही पुस्तक वाचण्यासाठी हातात घेताना हे प्रश्न अपरिहार्य असतातच.

'बखर : एका राजाची' पाहिली की अंधारयात्रा टिपणारा सरदेशमुखांचा मूड आठवणारच. तसं जगात कोणत्याही गोष्टीचं समर्थन करता येतं आणि कोणतंही विधान हाणून पाडता येतं. त्यामुळे ज्याला त्याला आयुष्याकडे पाहण्याचा एक दृष्टिकोन नक्की धरावा लागतो. मग त्याच्या अनुषंगाने कितीही स्वच्छंदीपणा केला तरी एक दृष्टिकोन ठेवावाच लागतो किंवा अटळपणे तो ठेवला जातो. म्हणूनच विशेषत: कादंबरी वाचताना, लेखकाने अनेकरंगी व्यक्तिरेखा रंगविल्या असल्या तरी त्या भिन्नत्वामागेही कोणत्यातरी एका भाववृत्तीची सलग पार्श्वभूमी असते हे जाणवल्याशिवाय राहात नाही.

'बखर :...'ची कहाणी काय आहे ? अगदी प्रास्ताविकात दिलेल्या अवतरणापासून असं ध्यानात येतं की स्वत:च हळूवार, ताठपणे करुण आणि भावविवश, जमिनीपासून दूरच स्वतंत्र विश्व निर्माण करणं, हा लेखकाचा पिंड आहे; पण वास्तववादी असावं ही भूमिका आहे; आणि या कात्रीत, एकाकीपणाचा जो अतिशय सुरेख अनेक पदरी सूर लेखकाला सापडत होता तो एकसुरी आणि भडक झाला आहे.

'माणसाला एकटयानं चांगल्या रितीनं जगता येतं का ? मी आहे तरी

कोण ? मी आहे तरी का ? आहे ?

मी स्वतःला धिक्कारतो तेव्हा आतून एका सूक्ष्म गौरवानं उतून का येतो ? आत्मनिंदा ही भुयारवाटेसारखी जळत्या आगीतून दूर कोठे जंगलातल्या तलावाकाठीं स्वतःला पळवून नेल्याचा आभास रचते की काय ?

...यातलं गौडबंगाल जसंजसं उमगत चाललं तशी जगण्यातली दलदल अधिक जाणवू लागली. आपला ज्ञानाचा दिमाख नुसती भणभण निर्माण करणारा.

एकटाच, एकटा मी घाटात पावसाच्या माऱ्याखाली, इतक्यात पळसाचं एक झाड वरून कडाडत खाली आलं... डोळे फाडफाडून पाहतो तो मोडून पडलेल्या झाडांच्या पानांच्या जागी पंख चासून पडलेल्या पोपटांचे थवेच्या थवे दिसू लागले.

हे नको आणि ते नको. नको नकोच्या कोनाकोपऱ्यात कोणाला नकळत नाहीसं होऊन जावं एकदाचं.

कोणीतरी माझं पोट फाडलं पाहिजे आणि आतली आतडी वेशीवर टांगली पाहिजेत. जग कसं साळसूद...त्याची वेसही साळसूद.

माझ्या त्या त्या वेळच्या वेदना त्यानं कुठं बरं पुरून ठेवल्या असतील ? सगळा प्रलय पोटात घेऊन पाणी कसं सुस्त आणि अस्ताव्यस्त पसरतं—तसं माझं जागेपण—तसा माझा दिवस. बावचळलेला, जीभ तुटलेला ?

### इथेच लेखक फसला

यासारखा हा एकलेपणाचा भेदक आणि परखड टाहो वाचकाच्या मनात सतत भिनत राहिला असता. पण इथेच सरदेशमुख फसले आहेत. अनुभवबीजाचं नेमकं सामर्थ्य न जोखता नाजुकनाजुक स्वप्निल शैलीनं, सोसापोसानं त्यांनी त्याला भलतंच वळण दिलं आहे. उदाहरणार्थ अगदी शेवटी शेवटी येणारा 'चार हजार बहात्तर साली कोणी संशोधक येईल ..' हा परिच्छेद किंवा किल्ली न दिलेलं भिंतीवरचं घड्याळ आज सकाळी बंद पडलं. अतिरेकी उपहासगर्भता आणण्याचा प्रयत्न केलेली व्याकुळता कादंबरीचा सारा गहिरेपणा उथळ करून टाकते.

राजा आणि प्रजा यांचं नातं चित्रित करण्याचा सरदेशमुखांचा प्रयत्नही फसला आहे. सरदेशमुखांनी राजा रंगवला आहे तो राजस आणि रघुराजा यांच्या संबंधानी येणाऱ्या चिठ्ठ्यातूनच विशेषतः ! संभाजीराजे किंवा मुंबईच्या भेटीगाठी या सर्व उपऱ्या—की ज्यात लेखकाला फारसा रस नाही अशा वाटतात. राजेपण, स्वातंत्र्य आणि स्वतःचं राजेपणाव्यतिरिक्तचं अस्तित्व याबद्दलचे विचारही पोजशी संगती राखण्यासाठी आणलेले वाटतात. सगळाच अनुभव कुठेतरी सरदेशमुखांना भिडून संपला आहे. तो अनुभव वाचताना त्याचा जिवंतपणा सरसरून जाणवत नाही. कदाचित त्या अनुभवाची जातच अशी आहे की त्या एकाकीपणाचा पूर्ण छेद घेता घेता संपून जाणं अपरिहार्य आहे. आणि शब्दांची शैली सरदेशमुखांना उभी करावी लागली त्यामागे हे कारण असण्याची शक्यता आहे. त्यामुळे असा अवघड अनुभव कादंबरीतून वाचताना

जो भयाण थांबलेपणा जाणवायला हवा त्या ऐवजी एक उसना भळभळतेपणा जाणवत राहतो.

व्यक्तिरेखांची उभारणी : केवळ राजाच्या सोयीसाठी उभारलेली कळसूत्री आणि अपेक्षित, आणि गटवार आहे. वलीसाहेब देसाई, सुलेमान, बळीराम तर एकीकडे दमयंती, केशव भटजी, दौलत वगैरे आणि या सर्वांचं केंद्र रघुराजा आणि राजस अशी ढोबळ रचनाही सरदेशमुखांच्या अविष्काराला मारक ठरली आहे.

व्याकुळता आणि हळवेपणा निर्माण करण्याच्या अट्टाहासातून सरदेशमुख बाहेर पडले तर अतिशय खरा, प्रत्यक्ष ताजा आणि समर्थ अनुभवांनाला खच्ची करणारे शैलीचे तेच तेच वर्तुळ मोडणारा अविष्कार ते देऊ शकतील. ◻

बखर : एका राजाची

लेखक : त्र्यं. वि. सरदेशमुख

मौज प्रकाशन गृह, मुंबई ४

मूल्य ११ रुपये

# गुंतता हृदय हे

## विस्कळीतपणे केलेले कथन

विश्वकर्मा साहित्यालय, पुणे या प्रकाशनातर्फे श्री. प्रभाकर अत्रे यांची 'गुंतता हृदय हे' ही एक कादंबरी प्रकाशित झाली आहे. संगीत क्षेत्रातील एका अलौकिक गायिकेच्या प्रीतीची गहिरी कहाणी तिच्याच शब्दात सांगणे, असे या कादंबरीचे स्वरूप आहे. या प्रकट जीवन कथनाचे स्वरूप अतिशय रोमँटिक आहे. माधव – या कादंबरीची नायिका – पहिली, एकुलती मुलगी, सुंदर, दैवी गळा घेऊन आलेली येथपासून सारेच वातावरण पूर्णतेने भरलेले. त्यामुळे व्यक्तिचित्रण अगदीच ढोबळ राहिले आहे. त्यात कसदारपणा जाणवत नाही. इतका की, खाँसाहेबांच्या वागणुकीतील विक्षिप्तपणा नाटकी वाटावा. तो अस्सल वाटत नाही. व्यक्तिचित्रण एकांगी असल्याने कादंबरीची परिणामकारकता काहीच नाही.

भाषाशैली काव्यात्म, नाटकी ढंगाला जवळ जाणारी आहे. तिचा पोत एकूण भरडच. शब्दांच्या अनुभवदर्शक अचूक छटा या भाषाशैलीत नाहीत. 'मुरलीधराच्या मूर्तीपाशी निरांजनं लावली... लालभडक फूलं मूर्तीला वाहून...' इ. मधील 'लालभडक' हा शब्द चांगलाच खटकतो. किंवा, "मी अतिशय हार्ड-मास्तर" आहे असे खाँसाहेबांनी म्हणणे. किंवा, 'गळ्याला ज्ञान पाहिजे, ज्ञानाला गळा, गळ्याशिवाय ज्ञानाला ज्ञानाशिवाय गळ्याला किंमत नाही.' अशी रुक्ष, तार्किक क्रमाचा आभास दाखवणारी भाषा कंटाळवाणी होत जाते.

संगीत क्षेत्रातील व्यक्तींचे जीवन, त्यांच्या उत्कृष्ट मैफिली यातून शास्त्रीय संगिताच्या कोणत्याच अंगाची झलक लेखक दाखवीत नाही. त्यामुळे माधवीचे किंवा खाँसाहेबांचे अलौकिकत्व अभिव्यक्त होतच नाही. शास्त्रीय संगीताच्या अंत-

रंगाची पुसट ओळखदेखील येथे होत नाही. मैफिलीच्या वाद्यांगाची शाब्दिक कोरडी वर्णने उसनीच व अलग वाटतात. शास्त्रीयरागाच्या चिजा म्हणून भावगीतसदृश कवितेच्या ओळी देणे हा प्रकार हास्यास्पद वाटतो. वातावरणनिर्मिती ऐवजी, त्यामुळे, वातावरणाचा पोत आणखीच बिघडतो.

कादंबरीतील व्यक्तींच्या कृतीही अशाच अतिनाटचात्म, फार भाबड्या. उदा. माधवीला मिळालेल्या पहिल्या बक्षिसाची नोट फ्रेम करून ठेवणे. इ.

अलौकिकाच्या ध्यास लागलेल्या गायिकेला – माधवीला 'देश-भूषण' ही लौकिक पदवी मिळाल्याचे कळताच 'परमभाग्य' वगैरे वाटणे ही या कथानकाच्या मूळ केंद्रातीलच विसंगती आहे. खाँसाहेबांच्या आयुष्यात येऊन गेलेल्या 'अनामिके'ची निष्ठा माधवीला बळ देते, एवढाच त्या कथानकाचा उपयोग. स्वतःच्या आयुष्यातील खाजगी गोष्ट खाँसाहेबांनी माधवीला सांगावी, इतकी माधवी त्यांच्याजवळ गेली होती ही दुसरी सूचना.

माधवीला अमिताभ आचार्यबद्दल प्रेम वाटते ते देखील अलौकिक. लौकिक बंधनात ते अडकत नाहीत. माधवीच्या निष्ठेची दुरून पूजा करणे यासारखा भाबडेपणा अमिताभकडे आहे. माधवीची संगीत निष्ठा व संयम स्पष्ट करणे एवढाच या कथानकाचा अर्थ. जर ही अमिताभ माधवीच्या अमरप्रीतीची कहाणी असेल तर तीत कोणताच आर्त पीळ नाही, कोणतेच खोल गुंतलेपण व्यक्त होत नाही. त्यामुळे 'मनातल्या व्यथा मी दाबून ठेवल्या होत्या,' किंवा 'कढ नुसते उसळून येत होते' अशी वाक्ये वरपांगी, कोरडी वाटतात. आर्तता शाब्दिक ठरते; आंतरिक वाटत नाही.

एकूण, माधवीचे कथन असे स्वरूप असलेली ही 'कादंबरी' म्हणून छापली म्हणून कादंबरी म्हणायचे; एरव्ही सामान्य शब्दात विस्कळितपणे केलेले कथन एवढेच तिचे स्वरुप. बाकी वैशिष्टचे काहीच नाहीत. ती एका दुय्यम स्तरावरच राहाते. ◘

—ज्योती पागनीस

**गुंतता हृदय हे**

लेखक : प्रभाकर अत्रे.
विश्वकर्मा साहित्यालय; पुणे ३०.
मूल्य रु. पाच.

● ● ●

---

महाराष्ट्र बँकेचे कस्टोडियन चि. वि. जोग यांच्या षष्टयब्दपूर्तीनिमित्त बोलताना यशवंतराव चव्हाणांनी सांगितले : माझ्या मनात आमच्या काही विद्वानांची परीक्षा करणारा लेख लिहायचा आहे.

हा लेख फार छोटा होईल की काय, अशी भीती आम्हाला वाटते.

---

# पाटीलवाडी

पृष्ठ २३ वरून

गुजरांचा जमाव जमला होता असे दिसते. भिल्ल छगन मुरारच्या शेतात असलेल्या झोपडयानजीक उभे होते. भिल्लांजवळ लाठया, तीरकमठा, भाले व धारिया होते असे इ. भवसार व पो. कॉ. काशिराम हे साक्षीदार म्हणतात. भवसारनी भिल्लांना निघून जाण्यास सांगितले. परंतु ते निघून गेले नाहीत. गणपतच्या नेतृत्वाखालील जमाव इतर १३ भिल्लांना सोडावे नाहीतर दंगल करू अशा प्रक्षोभक घोषणा देत होता असे सरकारी पक्षाचे म्हणणे आहे. त्यानंतर नरोत्तम हरी असे म्हणतो की, गणपतने तीर सोडून त्याला जखमी केले. मंगलू माखनला गणपत किंवा भिल्लांपैकी कोणीतरी रिव्हॉल्व्हरच्या गोळीने जखमी केले. त्याच दिवशी रात्री मंगलूची मृत्युपूर्व जबानी मॅजिस्ट्रेटनी घेतली. (कारण मंगलूच्या जीविताविषयी खात्री वाटत नव्हती.) त्यावेळेस मंगलू चांगला शुद्धीवर होता. मंगलू माखन नंतर बरा होऊन वाचला व भिल्लांविरुद्ध साक्ष देण्यास उभा राहिला या जबानीत खुद्द मंगलू माखनने पाटीलवाडी प्रसंगाविषयी जे सांगितले त्याला 'ऐकीव' माहिती म्हणून त्याच्या साक्षीमधल्या 'एवढ्याच' भागाची कोर्टाने संभावना केली. मंगलू माखन कोर्टात जेव्हा साक्ष देण्यास उभा राहिला तेव्हा मॅजिस्ट्रेटसमोर मृत्युपूर्व जबानीत दिलेली विधाने त्याने नाकारली! कोर्टात त्याने सांगितले की मी त्या वेळेस 'शुद्धीवर' नव्हतो! (निकालपत्रात मंगलू पाटीलवाडी या प्रसंगाविषयी काय म्हणतो हे दिलेले नाही. फक्त तेवढ्या विधानावर न्यायाधीशांनी विश्वास ठेवला नाही) न्यायमूर्ती म्हणतात, मृत्युपूर्व जबानीत मंगलू म्हणतो की म्हसावदच्या सरपंचानी गावकऱ्यांना बोलावून घेतले व (भिल्लांबद्दल) काहीतरी करावयास सांगितले. मग जिथे भिल्ल हल्ला करत होते त्या ठिकाणी सर्व गावकरी लाठ्या काठ्या घेऊन व ज्यांच्यापाशी परवाना होता असे बंदुका घेऊन निघाले. परंतु कोर्टात मंगलूने असे विधान केल्याचे नाकारले. म्हणून न्यायाधिशांनी मंगलूला भिल्लांच्या जमावातून गोळी लागली या साक्षीवर विश्वास ठेवला! ते पुढे म्हणतात: एका भिल्लाचा खून केल्याचा आरोप मंगलूवर आहे याची मला पूर्ण कल्पना आहे. परंतु भिल्ल घोषणा देत होते, दगडफेक करत होते व भिल्लांच्या जमावातून आलेल्या गोळीने मंगलू जखमी झाला यावर विश्वास ठेवायला हरकत नाही.

गुजरांपैकी पंढरीनाथच्या कपाळावर जखम झाली होती, परंतु ती नेमक्या कोणत्या शस्त्रामुळे झाली हे सिद्ध झाले नाही. इ. भवसार व कॉन्स्टेबल काशिराम यांनी फैरीचा आवाज भिल्ल जमावातून ऐकला असे म्हणतात व नंतर गुजरांनी गोळीबार केला. याच्चप्रमाणे गणपतनेच गोळी झाडली असे दोघेही म्हणत नाहीत.

सर्व आरोपींना पकडल्यानंतर जी ओळखपरेड झाली त्या सर्व प्रकारावर न्या. डोंगरे यांनी कडक ताशेरे ओढले आहेत. बहुतेक आरोपींची ओळखपरेड तुरुंगातच घेतली गेली व यासाठी जेल अधिकाऱ्यांची मदत घेण्यात तुरुंगातील इतर कैद्यांना आरोपींबरोबर मिसळून नेमके आरोपी ओळखण्यास साक्षीदारांना बोलविण्यात आले होते. परंतु महत्त्वाचा मुद्दा असा आहे की भिल्ल आदिवासीत प्रत्येकाच्या कपाळावर गोंदविण्याची खूण असते आणि या मधील सर्व आरोपी भिल्ल असल्याने साक्षीदार नेमक्या आरोपीला कसे ओळखणार ?

आरोपी तर्फे काम करणाऱ्या कुलकर्णी वकीलांनी ओळखपरेडमधील दर्शविलेले गंभीर दोष मान्य करून, ओळखपरेडचा ' फार्स ' म्हणून संभावना केली. त्याचा फायदा इतरांना मिळून बरेच आरोपी सुटले. आरोपी क्र. १ ते १२ निरनिराळ्या कारणांनी सुटले.

शेवटी शिक्षा देताना न्या. डोंगरेंनी, बेकायदेशीर जमाव करणे, धान्यलुटीसाठी दरवडा घालणे, गंभीरपणे जखमी करणे, विनापरवाना शस्त्र बाळगणे इ. गुन्ह्यांसाठी १७ आरोपींना विविध मुदतीच्या शिक्षा ठोठाविल्या.

**निकाल पत्रकातील शेवटचे परिच्छेद अत्यंत बोलके आहेत !**

' शिक्षा देताना हे लक्षात ठेवले पाहिजे की आरोपी गरीब शेतमजूर आहेत. ज्या महिन्यात धान्यासाठी दरोडा टाकला तो मे महिना होता. त्यावेळेस त्यांना मजुरी मिळणे शक्य नसते. जगन्नाथाचे कुटुंबीय, बायकामुले बंगल्यातच राहतात. धान्य लुटीच्यावेळी भिल्लांनी जगन्नाथाच्या घरातील कोणाही व्यक्तीस बोटसुद्धा लावले नाही किंवा घरातील रोकड, दागिने यांना हात लावला नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. ह्यावरून दरोडा घालायला आलेले भिल्ल आत्यंतिक गरिबीने आणि – किंवा आत्यंतिक भुकेने हे कृत्य करण्यास उद्युक्त झाले होते.

' शेवटी हे सांगितले पाहिजे, की कालौघात शेतमजुरांचा वर्ग जागा झालेला आहे आणि श्रीमंत शेतकऱ्यांची कोठारे धान्याने तुडुंब भरलेली असता शेतमजूर रिकाम्यापोटी स्वस्थ बसतील असे होणार नाही. ते दिवस फार लांब नाहीत. ह्यावरून श्रीमंत शेतकऱ्यांनी धडा शिकावा आणि शेतमजुरांना पुरेसे वेतन द्यावे आणि–किंवा जमिनदारांनी शेतमजुरांच्या कष्टाने पिकविलेल्या धान्यातून कमावलेल्या फायद्यातील न्याय्य हिस्सा शेतमजुरांना द्यावा. '

या सर्व कारणांचा सांगोपांग विचार करून न्यायमूर्ती डोंगरे महाशयांनी इं. पि. कोड मधील विविध कलमांद्वारे १७ भिल्लांना विविध मुदतीच्या शिक्षा दिल्या.

गणपत पोलाद भिल्ल फक्त ७ वर्षे !

इतर सोळा भिल्लांस केवळ २ वर्षे ते १ महिन्यापर्यंत शिक्षा व दंड न दिल्यास सहा महिने !

सेशन्स कोर्टात चार महिने केस चालली होती. भिल्लांच्या वतीने अॅड.

पी. जी. कुळकर्णी यांनी काम पाहिले.

या निकालावर मुंबई हायकोर्टात १७ भिल्लांच्या वतीने बॅ. मोहन पुंगलिया व अॅड. जयंत गडकरी यांनी अपील केले. न्या. देशपांडे व न्या. लेंटिन यांच्या बेंचपुढे अपील दाखल होऊन गणपत सोडून इतर १६ भिल्लांना जामीन देण्यात आला. ☐

धुळे सेशन्स कोर्टाचीच जागा. माननीय न्यायमूर्ती डोंगरे, भिल्लांचे निकालपत्र ज्या दिवशी वाचून दाखविले ती म्हणजे ४–५–७३. आरोपी मात्र वजनदार, रुबाबदार. त्यांची नजरेची फेकच अशी की सर्व दुनिया आम्ही विकत घेऊ. भिल्लांच्या जमावातील सुर्त्या जतन्याला बंदुकीच्या गोळीने ठार मारणे व दुसरा भिल्ल बन्या वाण्याच्या खुनाचा प्रयत्न करणे असे आरोप या गुजर लोकांवर होते. हे सर्व गुजर जमिनदार, म्हसावद गावचे. आरोप ३०२ खाली असून जामीन मिळालेला. (गणपतवर ३०७ चा आरोप असून त्याला मात्र जामीन सतत नाकारला होता.)

जमिनदार आरोपींची नावे : बाबु-लाल बगडाबटमल बेडमुथा, दशरथ पाटील, लोटन धनगर, एकनाथ पाटील, मोहन पाटील, पंढरीनाथ सोनार, मंगलू माखन पाटील, बंसी पाटील असे एकूण नऊ आरोपी. दंगल करणे व खून करणे आणि खुनाचा प्रयत्न करणे असे त्यांच्यावर आरोप होते.

या केसमध्ये सरकारी वकील, सूर्त्या जतन्या व बन्या वाणी यांच्या बाजूचा होता. कारण कोणत्याही प्रकारच्या खुनाच्या केसमध्ये सरकार महत्वाचा पक्ष असतो व जीविताचे संरक्षण करणे हे कर्तव्य असल्याने मृत्यू पडलेल्या माणसाची बाजू सरकारी वकील मांडतो.

## सरकारी पक्षाची बाजू

सारांश जवळजवळ वरील भिल्ल केस प्रमाणेच आहे. परंतु सरकारी वकिलाच्या कथनात व भिल्ल केसमधील घटनांत थोडा फरक आहे. पाटीलवाडी-वर कसा 'दरोडा' पडला ते माहिती आहेच. धान्यलुटीच्या आरोपावरून १३ भिल्लांना इ. भवसारांनी डांबून ठेवले होते. त्यांना सोडविण्यासाठी गणपतच्या नेतृत्वाखाली अनेक भिल्ल म्हसावद गावच्या छगन मुरारच्या शेतावर जमले होते, असे आधीच्या भिल्लांच्या केस-मध्ये म्हटले होते. या केसमध्ये सरकारी वकील असे म्हणतात की बन्या वाण्या (जो गोळी लागून जखमी झाला), पवळ्या विलाद्या आणि गणपत पोलाद हे सर्व लक्कडकोटमधील (हे गाव म्हसावदपासून ४–५ मैल अंतरावर आहे.) मंगा खाज्या या इसमाच्या शिंप्याच्या दुकानात बसलेले दुल्या बान्याने पाहिले. ह्या तिन्ही इसमांसमोर दुल्या बन्याने असे सांगितले की म्हसावद गावचे गुजर लोक भिल्लांना मारत आहेत. छगन मुरारच्या शेतात या भिल्लांच्या झोपड्या आहेत. तेथे येऊन भिल्लांना गुजर मारत होते. तर दुल्याने या तिघांना (गणपत वगैरेंना) विनंती

केली की त्याच्या झोपडीतील सामान हलवण्यास मदत करा. त्यांनी मदत करायचे मान्य केले व ते आणि काही भिल्ल मिळून म्हसावदला पोलिसांना रिपोर्ट करावयास निघाले. जेव्हा ते म्हसवदला पोहचले तेव्हा इ. भवसार तोरणमाळ रोडवर उभे असलेले त्यांना दिसले. इ. भवसारना अशी खबर मिळाली होती की काही सशस्त्र भिल्ल म्हसवदच्या रोखाने येत आहेत. कान्हेरी नाल्याजवळ उभ्या असलेल्या भिल्लांच्या जमावास त्यांनी थांबण्यास सांगितले त्यांचे येण्याचे कारण काय असे त्यांनी विचारले. भिल्लांनी सांगितले की आमचे लोक तुम्ही पकडले आहेत ते सोडून द्या. भवसारनी सांगितले की कायदेशीररित्या जे करता येईल ते ते करतील परंतु भिल्लांनी निघून जावे. त्याप्रमाणे भिल्ल निघून गेले व ते सर्व छगन मुरारच्या शेतावर झोपड्यात जाऊ लागले. या सर्व भिल्लांत गणपत प्रोलाद, मंगा, बन्या, पवळ्या, सुर्त्या जतन्या हे सर्व होते. झोपड्यात बायका मुले होती, त्यांच्यापाशी हे सर्व भिल्ल गेले.

याचक्षणी भवसारनी पाहिले की ६०–७० म्हसावद गावकरी (बहुतेक गुजर) कुबेर हायस्कूलच्या पटांगणावर जमले आहेत. आरोपी लोटण धनगर, एकनाथ पाटील, पंढरीनाथ सोनार व बंसी पाटील यांजकडे लाठ्या होत्या. इतर काही गावकऱ्यांजवळ लाठ्या काठ्या होत्या आणि बाबुलाल बेडमुथा, दशरथ पाटील, मोहन मक्कन पाटील यांच्याकडे बंदुका होत्या. इ. भवसार म्हसावद गुजरांजवळ गेले व त्यांनी त्यांना निघून जाण्याची विनंती केली. परंतु त्यांनी इ. भवसारना सांगितले की तुम्ही भिल्लांना मागे हटवा मगच आम्ही जाऊ. त्याप्रमाणे भिल्लांना मागे हटविण्यास भवसार गेले. परंतु भिल्लांचा असा आग्रह पडला की प्रथम म्हसावदच्या लोकांना मागे हटवावे. भवसार पुन्हा म्हसावदच्या गावकऱ्यांकडे गेले पण म्हसवदचे गुजर ऐकेचनात. एव्हाना जमाव वाढू लागला होता.

म्हसावदच्या गावकऱ्यांना समजवण्यास भवसार जातात न जातात तोच दोन्ही जमावांकडून दगडफेक सुरू झाली, घोषणा युद्ध सुरू झाले. म्हसावदचे गावकरी भिल्लांना ठोकले पाहिजे अशा प्रक्षोभक घोषणा देऊ लागले. सरकारी पक्षाचे म्हणणे आहे, की भिल्लांच्या जमावातून काही तीर आले व म्हसावदच्या गावकऱ्यांच्या जमावातून बंदुकीच्या दोन फैरी झडल्या. त्यामुळे सुर्त्या मृत्युमुखी पडला तर बन्या वाण्याच्या नाकाला मोठी जखम झाली. आणि भिल्लांकडील कोणीतरी बंदूक झाडल्याने गुजरांच्या जमावातील मंगलू माखनला खांद्यावर जखम झाली.

नंतर भवसारनी सुर्त्याच्या मृतदेहाचा पंचनामा केला. या पंचनाम्यात मात्र सुर्त्याच्या प्रेताच्या आसपास पडलेल्या दगडांचा अजिबात उल्लेख नाही.

नंतर पुन्हा महत्त्वाची घटना घडली! डॉ. पाटील शहाद्याच्या म्युनिसिपल दवाखान्यात ड्युटीवर असता सुर्त्याचा

मृतदेह मरणोत्तर तपासणीसाठी आणला. जखमांचे वर्णन व मृत्यु बंदुकीच्या गोळीने झाला असे सर्टिफिकेट दिले. त्यानंतर सुर्त्याच्या मृतदेहाचे दफन (पुरण्यात) करण्यात आले. परंतु कोणीतरी तालुका मॅजिस्ट्रेट दिवाकर पडवी यांच्याकडे तक्रार केल्याने तो मृतदेह पुन्हा उकरून काढला व मृतदेह धुळ्याच्या सिव्हील हॉस्पिटलमध्ये पोस्टमार्टमसाठी पाठविला. त्या पोस्ट मार्टममध्ये एक महत्त्वाचा पुरावा सापडला. सुर्त्याच्या पोटात घुसलेली बंदुकीची गोळी ! (ही गोळी शहाद्याच्या डॉ. पाटलांना मिळाली नव्हती ! )

आता चौकशीची सूत्रे इन्स्पेक्टर देशमुखांकडे ३–५–७१ रोजी गेली. म्हसावदचा प्रसंग घडला २–५–७१ रोजी. आरोपींना ३–५–७१ रोजी अटक करण्यात आली.

## न्यायाधीशांचे निकालपत्र

सरकारी पक्षाने एकूण ३० साक्षीदार आणले होते. त्यापैकी पाच पोलिस खात्यातील व दहा भिल्लांपैकी. (बहुतेक भिल्ल आधीच्या धान्य लुटीच्या केसमध्ये गोवले होते.)

गुजरांनी दंगल केल्याचा, खून केल्याचा, बेकायदा जमाव केल्याचा आरोप नाकारला. गुजरांचा असा बचाव होता की भिल्लांनी आधीच धान्यासाठी दरोडा टाकला होता व इन्स्पेक्टर भवसारांच्या सांगण्यावरून भिल्लांना पकडण्यात व लुटलेले धान्य गोळा करायला ते इन्स्पेक्टरना मदत करत होते. सशस्त्र भिल्ल जमावानिशी म्हसावद जवळ आले म्हणून गुजरांना (आरोपी क्र. १ व २ यांना) बंदुकीनीशी जावे लागले. एव्हाना भिल्ल दरोडा घालायला आले आहेत अशी सर्वत्र अफवा पसरली होती. भिल्लांकडून तीर येणे वगैरेला सुरुवात झाली असे गुजरांचे म्हणणे. त्यातच मंगळू माखनला गोळी लागली. भिल्लांचा जमाव अनावर होऊ लागला म्हणून गुजरांनी इन्स्पेक्टर भवसारना गोळीबार करण्यास सांगितले. इन्स्पेक्टर भवसारनी गोळीबार करण्याचे नाकारले म्हणून म्हसावद गावकऱ्यांच्या स्वसंरक्षणार्थ भिल्लांवर गोळीबार गुजरांपैकी आरोपी क्र. १ व २ यांनी केला. मग एकजण मृत्यु पावला. बाकीचे भिल्ल पांगले.

आरोपी क्र. १, २, ७ यांनी बचाव पक्षाचे म्हणून ३८ साक्षीदार आणले होते. गावात तंग वातावरण निर्माण झाले होते हे सिद्ध करण्यास गुजरांनी काही पोलीस व इतर साक्षीदार आणले होते. इन्स्पेक्टर भवसार यांनी अधिक पोलीस कुमक मागविली व आगीचा बंब देखील बोलावला होता हे सिद्ध करण्यास या साक्षीदारांचा उपयोग झाला. साक्षीदारात जगन्नाथ पाटील, नरोत्तम हरी, पन्नालाल करसन आदि लोक होते.

न्यायमूर्ती महाशयांच्या मते :

१ : आरोपींनी बेकायदा जमाव करून भिल्लांना मारण्याचा प्रयत्न केला नाही.

२ : दंगल गावकऱ्यांनी केली नाही.

३ : आरोपी क्र. १, २, आणि ३

यांच्या जवळ बंदुका होत्या.

४ : आरोपी क्र. १ व २ यांनी बंदूकीतून दोन फैरी झाडल्या.

५ : सुर्त्या जतन्याला आरोपी क्र. १ किंवा २ च्या गोळ्या लागल्या असाव्यात परंतु कोणाची गोळी कोणाला लागली हे निश्चित करता येणे कठीण आहे. सुर्त्याचा मृत्यु बंदुकीच्या गोळीने झाला.

६ : बन्या वाण्याला वरील आरोपींपैकी कोणाची तरी गोळी लागली.

७ : बन्या वान्याला जी गोळी लागली त्यामुळे खुनाचा हेतू सिद्ध होतो. त्यामुळे कदाचित त्याचा मृत्यु संभवत होता.

८ : आरोपी क्र. १ व २ यांनी स्वसंरक्षणार्थ व मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी गोळ्या झाडल्या.

९ : स्वसंरक्षणाच्या हक्कांची मर्यादा ओलांडण्याचा प्रश्नच येत नाही.

१० : आरोपी क्र. १ व २ यांच्यापाशी असलेल्या बंदूका बेकायदा उद्देशासाठी वापरल्या गेल्या नाहीत.

११ : आरोपी क्र. १ व २ यांनी इंडियन आर्मस् ॲक्ट खालील कोणत्याही कलमांचा भंग केला नाही.

वरील निष्कर्ष न्यायमूर्ती महाशयांनी केसचा सर्वांगीण विचार करून काढलेले आहेत !

विविध साक्षीदारांच्या साक्षींची छाननी करताना न्यायमूर्तींनी इ. भवसारांवर अविश्वासार्ह साक्ष म्हणून ठपका ठेवला आहे. भवसार व इतर चार पोलिसांनी कोर्टात सांगितले, की म्हसावदचे गावकरी भिल्लांना मारण्याच्या घोषणा देत होते व दगडफेक करीत होते. त्यांच्यापैकी काहीजणांजवळ जाडजूड लाठ्या होत्या. परंतु न्यायमूर्ती महाशय म्हणतात : 'इ. भवसारांजवळ सशस्त्र पोलीस असूनसुद्धा त्यांना म्हसावदचा प्रसंग टाळता आला नाही. त्यांना १-६-७१ रोजी कामावरून सस्पेंड केले आहे. आणि त्यांच्या निष्क्रियतेसंबंधी पोलीस खात्यामार्फत चौकशी चालू आहे. त्यांच्या खात्याने हा प्रसंग टाळावा म्हणून त्यांच्यावर बळाचा वापर न केल्याबद्दल आरोप ठेवला आहे व त्यामुळे भिल्लांनी गावकऱ्यांवर हल्ला केला असा खात्याचा निष्कर्ष आहे.... अशा खात्यातर्फे चाललेल्या चौकशीमुळे त्यांना उपयोगी पडेल असा पुरावा व कृती ते दाखवतील. इतर चार पोलिसांच्या साक्षी, इ. भवसार त्यांचे साहेब असल्याने भवसारांना उपयोगी अशा असणे स्वाभाविकच आहे.'

इन्स्पेक्टर भवसारनी गुजर आरोपींना म्हसावद प्रसंगाच्या दिवशी अटक केली नव्हती. इन्स्पेक्टरांच्या मते काही आरोपी गावात सापडले नव्हते ! न्यायाधीशांनी ह्यावर विश्वास न ठेवता असे म्हटले आहे की आरोपी या प्रसंगानंतर बेपत्ता झाले असा आभास निर्माण करण्यासाठी भवसारांनी त्यांना त्या दिवशी पकडले नाही ! इ. भवसार, इतर पोलीस यांच्या साक्षीवर न्यायाधीशांनी विश्वास ठेवला नाही. तीच गोष्ट गणपत पोलाद आदि भिल्लांच्या

साक्षीबाबत आहे. भिल्ल आरोपी (जे या केसमध्ये साक्षीदार आहेत) त्यांना 'खोटारडे' असे ठरवून त्यांची साक्ष अगदी टाकाऊ आहे असे जज्ज साहेबांचे मत आहे.

सारांश, भिल्लांचा जमाव बेकायदेशीर होता व त्यांचा दंगल करण्याचा उद्देश होता, गणपत किंवा कोणीतरी गोळी झाडून मंगलू माखनला जखमी केले त्यामुळे 'आरोपी क्र. १ व २ ची अशी भावना झाली की म्हसावद गावकऱ्यांच्या जीवाला धोका आहे. त्यामुळे त्यांनी गोळीबार केला तो स्वसंरक्षणासाठी'... 'भवसारनी म्हसावद गावकऱ्यांचे संरक्षण करण्याचा प्रयत्न न करता कोर्टात काही महत्त्वाच्या घटना दडपून टाकण्याचा प्रयत्न केला... जर सरकारी अधिकारी घटनास्थळी हजर असता धोका टाळण्याचा किंवा व्यक्तीचे संरक्षण करण्याचा त्याने प्रयत्न केला नाही तर एखाद्या व्यक्तीला व्यक्तिगत संरक्षण करण्याचा हक्क नाही असे आपण म्हणू शकत नाही.' सबब, गुजर आरोपींनी आत्मसंरक्षणार्थ गोळी झाडली व त्यात सुर्या जतन्या हा भिल्ल मेला.

गुजर आरोपी निर्दोष सुटले. त्यांच्या 'चाहत्यांनी' व 'हितचिंतकांनी' न्याय मिळाल्याच्या आनंदात हारतुरे दिले.

दुसऱ्या केसमधील भिल्ल विषण्ण मुद्रेने पोलिसांच्या पहाऱ्यात विसापूर जेलमध्ये गेले.

दोन्ही निकालपत्रे अतिशय उद्बोधक आहेत. पाटीलवाडीला भिल्ल धान्य घेण्यासाठी 'गर्दी' करून जातात, मग संध्याकाळी पाटीलवाडीला दरोडा पडल्याची पोलीस डायरीत नोंद होते, म्हसावदला दोन्ही जमाव जातात, इ. भवसार शांतता प्रस्थापित करण्यास म्हसावदच्या लोकांची मदत घेतात, भिल्लांच्या जमावातून घोषणा, दगड व गोळ्या येतात, इ. भवसारना गुजर लोक भिल्लांवर गोळीबार करावयास सांगतात, पण इ. भवसार ते नाकारतात, एक महिन्यानी ते सस्पेंड होतात, इ. भवसारना 'पाणी देणाऱ्या' मंगलू माखनवर भिल्लांच्या जमावातून गोळी येते व ती खांद्याच्या मागच्या बाजूस लागते, लाठी-काठी-बंदुका असणाऱ्या म्हसावदच्या जमावाने 'स्वसंरक्षणार्थ' गोळीबार करणे, शंभर भिल्लांना घराघरातून बोलावून पकडणे व सात गुजरांना दुसऱ्या दिवशी पकडणे इ सर्व घटना केवळ न्यायालयातील 'सुरस आणि चमत्कारिक घटना' नसून आज भारतातील सद्यपरिस्थिती दर्शवतात. गुजरांच्या केसमध्ये सरकारी पक्षाने जे साक्षीदार लिस्टमध्ये दिले होते त्यांच्यापैकी बऱ्याचजणांना कोर्टात साक्षीसाठी बोलावलेच नाही. याचा फायदा गुजरांनी उठवून त्याच साक्षीदारांना बचाव पक्षाचे साक्षीदार म्हणून कोर्टात साक्षीस घेतले व आपली बाजू बळकट केली. सरकारी पक्षाच्या खटला लढविण्याच्या पद्धतीवर न्यायमूर्तींनी ताशेरे झाडलेले आहेत. जेथे नोकरशाही, जमिनदार एकत्र येतात तेथे अशी 'महान लोकशाही' राबवली जाते.

या केसवरून मद्रास मधल्या किलवे

न्मणी गावातल्या हरिजन शेतमजुरांना जाळून मारल्याच्या घटनेची आठवण होते. तेथे शेतमजुरांचा जमिनदारांविरूद्ध लढा चालू होता. एके दिवशी जमिनदारांनी ४२ स्त्री-पुरुष मुलांना झोपडीत कोंडून जाळून टाकले. सरकारने खटला भरला. खालच्या कोर्टाने आठ जमिनदारांना शिक्षा ठोठावल्या परंतु मद्रास हायकोर्टात सर्व आरोपी सुटले ! सुटण्याची कारणे हायकोर्टातल्या जज्जनी अशी दिली आहेत, ' बहुतेक सर्व लोक श्रीमंत असून त्यांच्याजवळ प्रचंड प्रमाणात जमीन आहे व गोपालकृष्ण नायडू (जमिनदार) जवळ तर मोटरगाडी आहे. जरी या श्रीमंत लोकांना मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली असलेल्या किसान संघटनेवर सूड उगवायचा असला तरी हे लोक व्यक्तीशः जाऊन, त्यांच्या कोणाही नोकराची मदत न घेता घरे पेटवतील हे संभाव्य दिसत नाही. श्रीमंत लोक आपले हितसंबंध अबाधित ठेवण्यास, इतर भुकेल्या, हताश झालेल्या मजुरांसारखे न वागता सावधगिरीने आपले काम करतील... त्यामुळे श्रीमंत शेतकरी (मिरासदार) स्वतःला पडद्याआड ठेवून दुसऱ्या भाडोत्री गुंडामार्फत काम करून घेतील असाच तर्क योग्य ठरेल. परंतु सरकारी पक्ष म्हणतो की, मिरासदारींनीच स्वतः काम केले व जाळले.'

अजब तर्कशास्त्र !

[ शहादा केसचे भिल्लांचे अपील न्यायालयाच्या आधीन आहे. गुजर लोक सुटले असून अजूनही सरकारने त्या निर्णयाविरूद्ध हायकोर्टात अपील केलेले नाही असे समजते ! ]

● ● ●

---

अण्णा द्रमुक पक्षाचे नेते एम. जी. रामचंद्रन दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील फार मोठी असामी आहे. नुकताच त्यांनी सोव्हिएत युनियनशी संयुक्त चित्रपटनिर्मिती करण्याचा एक करार केला आहे.—पहिल्या चित्रपटात, महात्मा गांधी आणि लेनिन यांच्या सहवासात आलेल्या, त्यांच्या शिकवणुकीने प्रभावीत झालेल्या भारतीय स्वातंत्र्यसैनिकाची कथा सांगण्यात येणार आहे.

' फ्रॉम द गॅंजेस टु द क्रेमलिन ' असे या चित्रपटाचे नाव असून तो एका वर्षात पुरा करायचे ठरले आहे. भारत आणि रशिया या दोन्ही देशात त्याचे चित्रीकरण होणार आहे.

ड्रॉपर्सने सादर केलेले

# नाटककाराच्या शोधात सहा पात्रे

वि. भा. देशपांडे

नाटक आणि जीवन ह्यांच्या सीमारेषा पुसून टाकणारे एक 'नाटक' पिरांदेल्लीच्या प्रतिभेने पाहिले आणि ते 'नाटककाराच्या शोधात सहा पात्रे' या नावांने आविष्कारीत झाले. कोत्या, हळव्या, नीच, सुंदर, ताठर उदात्त आणि धीरगंभीर याचे भोवळ आणणारे रसायन 'वास्तव' या नावाने सर्वसामान्य प्रेक्षकांच्या चांगलेच परिचयाचे असते. त्याच्या आवडीचे कलाकार आपल्या कलाविश्वात या मिश्रणाच्या सुसंबद्ध छटाच उचलतात, एकरूप होऊन पुढे येतात. नाटकाच्या दृकश्राव्य यज्ञात जीवनदर्शनाची काही समीकरणे, काही सहसंबंध सिद्ध होत असतात. तरीसुद्धा नाटक जे रूप घेऊ शकते, ते रूप जीवनाला नसतेच. नाटक प्रत्यक्षात उतरत नाही. 'प्रत्यक्ष' नाटकात घुसू शकत नाही. जीवनातले संवाद अनेकदा परस्परात 'संवाद' घडू शकत नसल्याने निर्माण होत असतात. संवाद करण्याची धडपड चालूच असते. 'प्रत्यक्षा'कडे 'रचना' म्हणून पाहयला सुरूवात केली, की 'प्रत्यक्ष' हास्यास्पद, फुटकळ, उथळ वाटू लागते. जगणाऱ्या माणसांना 'आम्ही हे हे जगलो' एवढेसुद्धा प्रभावीपणे सांगता येत नाही, कारण जगण्यावेगळे झालेले शब्द, धडावेगळ्या शिरासारखे अर्थहीन होतात. त्या शब्दांना हसणाऱ्या, संशयाने टाळणाऱ्या धिःकाराने नाकारणाऱ्या श्रोत्यांना काहीही समजावता येत नाही. शेवटी 'प्रत्यक्ष' हे ठरीव चौकटींनी बद्ध होऊन अखंड प्रवाहित्वाचा शोध घेत अवघडलेले असते आणि या चौकटीतून बेछूटपणे, केव्हाच सुटून जाते. ते धड 'नाटका'तही पकडले जात नाही आणि 'प्रत्यक्षा'तही !

विचारांच्या अशा आवर्तांमध्ये प्रेक्षकाला वाक्यावाक्यागणिक अस्वस्थ करणारे नाटक, पुण्याच्या 'ड्रॉपर्स' या संस्थेने नुकतेच सादर केले. या नाटकाची सुरुवात नाटकाच्या तालमीसाठी जमलेल्या मंडळीने होते. त्यानिमित्ताने नाट्यविषयक काही खुसखुशीत, उपरोधिक, गमतीचा संवाद आपल्याला ऐकायला मिळतो. रंगभूमीच्या वेगवेगळ्या तपशीलाबद्दल मार्मिक अभिप्राय देणाऱ्या या संवादात एकदम सहा पात्रे दाखल होतात. या पात्रांच्या खाजगी पूर्वायुष्यांचा पट बिनदिक्कत, आपणहून त्या नाटकवाल्यांसमोर (आणि आपल्याहीसमोर) उलगडला जातो. ही पात्रे आहेत, त्यांचे जीवन 'नाट्यमय' प्रसंगांनी भरलेले आहे, आणि त्यातला

सर्व तपशील नाटक म्हणूनच त्यांना उभा करावयाचा आहे. हा प्रकार भेदक आकर्षक आहे. पण नाटकवाल्यांच्या गळी उतरायला जड आहे. त्यात तड-जोड आहे. पात्रांची तडजोड स्वीकार-ण्याची तयारी आणि नाटकवाल्यांना पात्रांचे वाटलेले आकर्षण यातून पात्रांचे आणि पात्रांच्या एकूण रूपरेषेवरून नटांनी त्यांना उभे करणे, यातील एक वेगळेच द्वंद्व आपल्यासमोर येते. 'प्रत्यक्षा'चे इतके सूक्ष्म छेद जाणवतात की नकळत आपणही एका नाटककाराच्या शोधाला सुरुवात करतो. पात्रांच्या जीवनाच्या एका टप्प्यावर, नाटक-वाल्यांच्या एका समजुतीच्या अवस्थेत हा शोध चालू ठेवूनच नाटक संपते.

इतके व्यामिश्र स्वरूपाचे, आशयघन असे नाटक 'ड्रॉपर्स'च्या नव्या दमाच्या कलाकारांनी निवडले, यात त्यांच्या सहवासाच्या कौतुकाचा भाग आहेच. पण यातील यशापयशाचा विचार दुय्यम वाटावा, इतकी या प्रयत्नाची आस्था, कलादृष्टी, स्पृहणीय होती. आनंद लागू याचे दिग्दर्शन आणि विबा लागू हिचे मुख्य काम (मुलगी) ही या प्रयोगाची जमेची बाजू आहे. विबा लागूने आपली भूमिका करताना शब्दोच्चारातील सहजता, अभिनयातील बारकावे, कामाची तडफ विलक्षण ताकदीने व्यक्त केली. इतकी की तिचे हे काम दीर्घ-काळ स्मरणीय राहील. बापाचे काम करणारे दिलीप कोल्हटकर यांचा आवाज ताकदीचा आहे. पण त्या आवा-जाला आवश्यक ते परिणामकारक चढ-उतार नाहीत. नाटकातील एका मह-त्वाच्या भूमिकेचे ओझे त्यांनी पेलले इतकेच! पण ते ओझे तीन अंकभर वागवताना त्यांना बरेच कष्ट झालेले दिसत होते. वैजयंती ओक यांच्या चेहऱ्यावरील विशिष्ट भाव (बेअरिंग) संपूर्ण नाटकभर तसाच होता. त्यातून त्यांच्या भूमिकेचा प्रभाव पडू शकला नाही. तीच गोष्ट सुधीर आळेकर यांच्याबाबत घडली. 'नाटकवाली' मंडळी जी होती, ती रंगमंचावर मोकळे-पणाने वावरायचे आहे, अशा दडपणाने वावरत होती. रंगमंचावर प्रेक्षागारातून जाण्यायेण्यातील सहजता ही नाट्य-परिणाम पुसण्याइतकी हलकीफुलकी ठेवण्याचे प्रयोजन नसते. ते या प्रयोगात काहीवेळा घडले. संवादप्रधान नाटकात संवादाच्या फेकीचा पीळ एकदा विस-कटला, की तो मूळ अवस्थेपर्यंत आणणे ही अवघड कामगिरी होऊन बसते. या प्रयोगात त्या गोष्टीचा तिसऱ्या अंकात प्रत्यय आला आणि तो अंक रुक्ष संवादाचाच वाटला. कदाचित त्याचाच एक परिणाम म्हणून काही तरुण (विद्यार्थी) प्रेक्षकांनी तिसऱ्या अंकात आपली 'खास' प्रतिक्रिया व्यक्त कर-ण्याचा प्रयत्न केला. प्रेक्षकांच्या त्या प्रतिक्रियेत फार तथ्य नसले, तरी 'ड्रापर्स'च्या कलाकारांनी काही गोष्टींचा बोध त्यापासून घ्यायला हरकत नाही.

आनंद लागू याच्या दिग्दर्शनाची ही वाटचाल निश्चितच प्रशंसनीय आहे. दिग्दर्शक म्हणून त्याला त्याच्या ताकदीत

हे नाटक नक्कीच पेललेले दिसेल. दोन लेव्हल्सवर त्याने पात्रांकडून करवून घेतलेली काही काम्पोझिशन्स प्रयोगाचा परिणाम वाढवणारी होती. पण त्याचबरोबर 'नाटकवाल्या मंडळीं'कडून पहिला भाग अधिक बंदिस्तपणे बसवून घेणे आवश्यक होते. लहान लहान पात्रांची कामे, एखाद-दुसरे वाक्य जसे मोठा परिणाम घडवू शकते, तसेच गमावूही शकते. त्यादृष्टीने छोटया पात्रांची शब्द बोलण्याची पद्धती, रंगमंचावर वावरण्याची पद्धती अशा काही गोष्टींकडे दिग्दर्शकाने अधिक लक्ष दिले असते, तर पहिल्या भागातला संघ-अभिनयाचा भाग ताकदीने उभा राहिला असता.

गतवर्षी याच संस्थेने हा प्रयोग कर्नाटक हायस्कूलमध्ये केला होता. त्यातले कच्चेपण नव्या प्रयोगात खूपच कमी झालेले आहे. संस्थेची आगामी नाटकाची घोषणा 'वेटिंग फॉर गादो'ची आहे. संस्थेची नाटयनिवडीची, प्रयोग दर्शनाची झेप आणि दिशा सदैव औत्सुक्य निर्माण करणारी आहे, म्हणूनच इतक्या विस्ताराने प्रयोगाचे गुण-दोष दर्शन घडवले! ● ● ●

---

**चित्रपट । सुभाष नाईक**

---

# स्वयंवरम्

## राष्ट्रपती सुवर्णपदक विजेता चित्रपट

**१९७२** सालातील सर्वोत्कृष्ट चित्रपट म्हणून अदूर गोपालकृष्णन यांच्या 'स्वयंवरम्' या मल्याळी चित्रपटाला राष्ट्रपतींचे सुवर्णपदक मिळाले. याच चित्रपटाच्या सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाबद्दल गोपालकृष्णन यांना आणि कृष्णधवल चलत्चित्रणाबद्दल रवि वर्मा यांनाही राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आणि विशेष म्हणजे या चित्रपटाची नायिका केरळची सुप्रसिद्ध अभिनेत्री शारदा हिची सर्वोत्कृष्ट अभिनेत्री म्हणून निवड झाली. राष्ट्रीय पारितोषिक पटकावण्याची शारदाची ही दुसरी वेळ आहे. या आधी 'तुलाभारम्' या चित्रपटातील अभिनयाबद्दल सर्वोत्तम अभिनेत्री म्हणून 'उर्वशी' पारितोषिक मिळाले होते.

'स्वयंवरम्'चे प्रमुख कलावंत आहेत शारदा आणि मधू. दोघेही मल्याळीतील लोकप्रिय कलावंत. असे असले तरी 'स्वयंवरम्' तयार केलाय नव्या जाणिवेचे दिग्दर्शक अदूर गोपालकृष्णन् यांनी: चाकोरीबाहेर जाऊन काहीतरी नवे करून दाखविण्याच्या जिद्दीनं गोपालकृष्णन्नी हा प्रयत्न केला... जाणीवपूर्वक आणि मोठ्या चिकाटीने.

फिल्म इन्स्टिटयूटमधून दिग्दर्शनाचा डिप्लोमा घेऊन ते बाहेर पडले तेच केरळच्या चित्रपटांना पारंपारिकतेच्या चौकटीतून बाहेर काढण्याच्या ईर्ष्येनं. पुण्याहून ते त्रिवेंद्रमला गेले. तिथे बरीच खटपट करून त्यांनी 'चित्रलेखा फिल्म को-ऑपरेटिव्ह' ही सहकारी चित्र-निर्मिती संस्था काढली. सुरुवातीला काही लघुपट निर्माण केले आणि फिल्म फायनान्स कॉर्पोरेशनकडून कर्ज घेऊन 'स्वयंवरम्' हा पहिला चित्रपट दिग्दर्शित केला.

सीता (शारदा) आणि विश्वनाथन् (मधू) दोघेही कॉलेजविद्यार्थी. एक-मेकांवर प्रेम जडते. दोघांच्याही घरच्या विरोधामुळे आणि एकमेकांवरील उत्कट प्रेमामुळे ते दोघेही घर सोडून पळून जातात. वडिलांच्या इच्छेविरुद्ध सीता गरीब विश्वनाथन्‌शी विवाहबद्ध होते. प्रथम दोघे एका चांगल्या हॉटेलात उतरतात. परंतु जवळचे पैसे संपताच शहराबाहेरच्या एका बकाल वस्तीत रहायला येतात. तिथले वातावरणही घाणेरडं. समोरच्या घरात रहाणारी कल्याणी ही खालच्या जातीतली एक विवाहित स्त्री. पण ती नवऱ्याच्या अंगावर पैसे फेकून चक्क व्यभिचार करीत असते.

विश्वनाथन् हा कादंबरीलेखक असतो. आपल्या एका कादंबरीचं हस्त-लिखित तो एका संपादकाकडे पाठवितो. परंतु नोकरी आणि पैशाकरिता वण-वणणाऱ्या विश्वनाथन्‌ला यातही यश येत नाही. संपादकाकडून त्याचं हस्त-लिखितं साभार परत येते. अखेरीस त्याला एका कोचिंग क्लासमध्ये नोकरी मिळते. पगाराच्या दिवशी सीता त्याला सामान आणण्यासाठी यादी देते. परंतु कोचिंग क्लासचा मालक विश्वनाथन्‌ला 'बार'मध्ये घेऊन जातो आणि त्याला खूप दारू पाजतो. हा प्रिन्सिपॉल स्वत: खूप दारू पिणारा आणि तसाच स्त्री-लंपट, दारूच्या नशेत चूर होऊन बऱ्याच उशीरा घरी परतलेल्या आपल्या नवऱ्याला पाहून सीता हतबुद्ध होते. दोघेही उपाशीपोटी एकमेकांच्या मिठीत.

लवकरच विश्वनाथन्‌ची ही नोकरी-ही सुटते. तो पुन्हा बेकार होतो. सीता आई होण्याच्या मार्गावर असते. नाइलाजानं तो एका लाकडाच्या गिरणीत कारकुनी पत्करतो. जगण्या-साठी कशीबशी धडपड चालूच असते. विश्वनाथाचा म्हातारा सहकारी खूप चांगला असतो. पण त्याच्याच जागी आधी काम करणारा तरुण विश्वनाथा-पुढे धरणे धरून बसलेला असतो. म्हातारा सहकारी एकदा मूर्च्छा येऊन कोसळतो. खूप आजारी पडतो आणि त्याची शुश्रूषा करण्यात गुंतलेला विश्वनाथही आजारी पडतो. दर-म्यानच्या काळात सीतेने एका गोऱ्यापान गोड मुलीला जन्म दिलेला असतो. विश्वनाथाचे आजारपण आणि मुलीचे संगोपन यात तिची ओढाताण होऊ लागते. औषधपाण्याला पैसे नाहीत. मुलीच्या दुधालादेखील...शेजारी पाजारी कसेबसे मदत करू लागतात... आणि एकाएकी विश्वनाथ हे जग सोडून

जातो. दुर्दैवी सीतेवर आभाळ कोसळतं. ती भांबावून जाते. आता पुढे काय करायचं? डिपॉझिट ठेवायला हजार रुपये नसल्यानं 'सेल्सगर्ल'ची नोकरी मिळत नाही. तिचे शेजारी तिला वडिलांच्याकडे जाण्याचा सल्ला देतात. पण मानी स्वभावाची सीता तयार होत नाही. विश्वनाथाचा सहकारी तिला आपल्याकडे बोलावतो. पण त्याचा स्वतःचा दरिद्री संसार त्यालाच पेलत नसतो. त्यालाही ती नकार देते.

शेवटच्या दृश्यात सीता आपल्या तान्ह्या मुलीला दूध पाजताना उदासवाण्या मुद्रेनं पाहात असते. आसवंदेखील पापण्यांआडच घोटाळतात. बंद दरवाजाआड ती तशीच...कॅमेरा दरवाज्याच्या अडण्यावरच खिळतो!

वरवर पाहता अगदी साधी सरळ अशी ही कथा....जे काही सांगायचं त्याला तितकंच महत्त्व देऊन अगदी सरळ पद्धतीनं ही कथा मांडली आहे. कथेतून लेखकाला काही विशेष नावीन्यपूर्ण सांगायचं आहे असं वाटत नाही. पण अदूर गोपालकृष्णन्नी चित्रित केलेलं वातावरण—केरळमधील दारिद्र्य, भ्रष्टाचार, अरेरावी यांचं चित्रण—संवादांतून आणि छोट्या छोट्या प्रसंगांमधून सामाजिक परिस्थितीवर केलेलं भाष्य, मोर्चे-राजकीय पुढाऱ्यांची भाषणे यांचा प्रतीकात्मक उपयोग—आणि या साऱ्यांतून व्यक्त होणारी सामाजिक जाणीव हे या चित्रपटाचं खरंखुरं वैशिष्ट्य.

शारदा आणि मधू यांनी आपल्या कुशल अभिनयानं व्यक्तिरेखा साकार केल्या आहेत. व्यक्तिचित्रणात भडकपणा किंवा एकांगीपणा मुळीच नाही. गोपालकृष्णन् यांचा हा पहिला प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे. पण असे असले तरी काही बारीकसारीक दोष राहून गेले आहेतच. ध्वनिलेखन निकृष्ट दर्जाचे. त्यामुळे कित्येकदा रसभंग होतो. त्यामुळे पार्श्वसंगीतही तितकेसे प्रभावी वाटत नाही.

तरीदेखील सर्व दोषांवर मात करणारे चांगले गुण यात आहेतच. सामाजिक आशयाने परिपूर्ण अशी एक साधीसुधी कथा. केरळच्या निसर्गरम्य पार्श्वभूमीवर चित्रित करून—'फॉर्म्युला' चित्रपटांच्यापासून दूर जाऊन काहीतरी नवे देण्याचा हा प्रयत्न—प्रेक्षकांच्या अभिरूचीची दिशा बदलण्याचा एक मनःपूर्वक प्रयत्न—म्हणून 'स्वयंवरम्'चे स्थान निश्चितच वेगळे आहे. ⌑

# अग्निरेखा

## एक डोळा कथानकावर
## एक डोळा 'बॉक्स'वर

अग्निरेखा...कुणाच्या अंधाऱ्या जीवनात प्रकाश पाडणारी तर कुणाच्या तरी सुखी जीवनात ठिणगीच्या रूपानं वणवा पेटवणारी.

अचानक वीजेचा लोळ कोसळून

पडल्यानं होरपळून निघालेल्या झाडाला पुन्हा पोपटी पालवी फुटेल काय ? प्रिय पत्नीच्या अकाली जाण्यानं होरपळणारं सुरेशचं मन. मरतेवेळी तिनं त्याच्याकडून दोन कोवळ्या बालकांकरिता नवी आई आणण्याचं वचन...आणि त्याच्या अशा उध्वस्त मनोवस्थेत.... त्याच्या घरात प्रवेशणारी निर्मला. तीही कितीतरी अभागी...पोटच्या पोराला अनाथालयात सोडून आलेली.

सगळंच कसं अकल्पित. अभावित ! सुरेश तसा सुखी जीवनात रममाण. संसारवेलीवर उमललेली दोन नाजूक फुलं. पण अचानक त्यांची आई निघून जाते. शिकवायला येणाऱ्या शिक्षिकेला काही दिवसांकरिता कुठे बाहेरगावी जायचं असतं म्हणून ती निर्मलेला काही दिवसांकरिता मुलांना शिकवण्यासाठी पाठवते. दोन्ही मुलांना शिकवण्यासाठी पाठवते. दोन्ही मुलांना निर्मलेचा विलक्षण लळा लागतो. तीही त्यांच्यावर आईसारखी माया करते. मुलांना नवी आई मिळाल्याचा आनंद होतो. सुरेशलाही प्रथमदर्शनीच निर्मलेविषयी काहीतरी वाटू लागतं. प्रियपत्नीला दिलेलं वचन पुरं करण्याचं तो ठरवतो. पण इकडे सुरेशची सासू ह्याच्याकरिता आपल्या नात्यातल्या मुली योजीत असते. सुरेश अगदी गोंधळून जातो. दिवसेंदिवस मुलांचा लळा. निर्मलेविषयी त्यांचं प्रेम वाढतच जातं. आता तर मुलं तिच्यापासून दूर रहायलाही कुरकुरतात. थोडयाच दिवसात निर्मलेनं सुरेशचं मन, मुलांचं मन जिंकलेलं आहे. पण सुरेशच्या सासूबाईंना मात्र हे काही आवडत नाही. त्या सुरेशसाठी आपल्या वहिणीच्या दिराची मुलगी पसंत करतात. सुरेशला सतत त्यासंबंधी विचारत राहतात. सुरेश हे सारं टाळू पाहतो पण...त्याचा काही इलाज चालत नाही. निर्मलेविषयी त्याला प्रेम वाटू लागतं. तो तिच्याशी लग्न करण्याची इच्छा व्यक्त करतो. निर्मलेलाही मनातून तसं वाटत असतं. पण भूतकाळ तिला सारखा सतावीत असतो. ती अगदी अगतिक बनते. तिला काहीच सुचेनासे होते. मुलांचा लळा-सुरेशचं प्रेम आणि भूतकाळातील दुर्दैवी घटना यांच्यात तिच्या मनाची घालमेल सुरू होते. ती सुरेशच्या जीवनातून दूर होण्याचं ठरवते पण सुरेशचं प्रेम आणि मुलांची ओढ तिला अडकून ठेवते. शेवटी सुरेशला आपल्या पूर्वायुष्यातील घटना समजाव्यात म्हणून ती त्याला डायरी वाचायला देते. तसं पाहिलं तर पूर्वायुष्याविषयी ब्रही न काढता ती नवं जीवन स्वीकारू शकली असती परंतु तिला–तिच्या मनाला ते पटत नाही.

सुरेश तिने दिलेली डायरी वाचतो. तिच्या पूर्वायुष्यात ती एका श्रीमंत पुरुषाच्या वखवखलेल्या वासनेला बळी पडलेली असते आणि तिनं एका बाळाला जन्मही दिलेला असतो. बलात्काराची ही दुर्दैवी घटना समजूनही सुरेश आपला निर्णय बदलत नाही. समाज काय म्हणेल याची पर्वा करायला तो तयार नसतो. तर निर्मला. 'माझ्या

अभागिनीची सावली तुमच्या जीवनात पडू नये' असं म्हणत त्याला त्याच्या विचारापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करीतच असते... खरं तर मनातून तिलाही सुरेशविषयी ओढ आहे पण तिला मनातून भीतीही वाटते आहे. सुरेशची सासू त्याच्याविरुद्ध असते पण ती निर्मलेला त्याच्या जीवनातून निघून जाण्यासाठी दहा हजार रुपये देऊ करते आणि तिला घालवण्याचा प्रयत्न करते. निर्मला सुरेशच्या जीवनातून निघून जाण्यासाठी मनाचा निश्चय करते. ती दूर एका मंदिरात आश्रयासाठी जाते. पण इकडे चुन्नू आणि मुन्नू आपल्या नव्या आईला शोधण्यासाठी घरातून बाहेर पळून जातात. आता मात्र सुरेशची सासू घाबरते. सुदैवाने मुलं इतर कुठे न भरकटता निर्मला ज्या मंदिरात असते तिथे येतात. निर्मला मुलांविषयी सुरेशला कळवते. सुरेशही तेथे येतो. पण तो मुलांबरोबरच तिलाही परत आपल्या घरी नेण्याकरिता. निर्मला तयार नसते. पण शेवटी मुलांच्या माये-करिता ती एका अटीवर सुरेशबरोबर जाण्यास कबूल होते... ती अट म्हणजे निर्मला मुलांची दाई म्हणून त्याच्या घरी राहील व सुरेशला दुसऱ्या मुलीशी ताबडतोब लग्न करावे लागेल. हा एकच मार्ग तिला दिसत असतो. पण सुरेश मात्र गोंधळात पडतो. त्याचं मन या गोष्टीला तयार होत नाही. अखेरीस हो ना करता करता सुरेश या गोष्टीस तयार होतो.

पण घरी परतल्यानंतर सुरेश मद्याच्या प्याल्यात बुडून जातो. तो बेसुमार पिऊ लागतो. निर्मला त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न करते. 'मी मनानं सदैव तुमचीच आहे' असं पुनः-पुन्हा सांगते. त्याच्या लग्नाची तयारी होते. सुरेशच्या सासूची बहिण आपल्या पुतणीकरिता मोठ्या उत्साहाने लग्नाच्या जय्यत तयारीला लागते. मात्र लग्न मुहूर्ताच्या वेळेला सुरेश मात्र दारूच्या नशेत धुंद असतो. तो सर्वांना अद्वातद्वा बोलतो. मी निर्मलेशिवाय माझ्या मनात कुणालाच स्थान देणार नाही असं बजावून सांगतो. इकडे सुरे-शची सासू मंदिरातील गुरुजींजवळ उपाय विचारावयास जाते आणि तिथे तिचे मनपरिवर्तन होते... ती परत येते तेव्हा निर्मलेला धक्के मारून घराबाहेर काढलेले असते आणि दोघं मुलही निर्मलेपाठोपाठ गेलेली असतात...सुरेश अतिमहासेवनाने बेशुद्ध पडलेला असतो. सुरेशची सासू निर्मलेच्या शोधाकरिता बाहेर पडते...अखेरीस ती आणि दोन्ही मुले सापडतात. सुरेशही शुद्धीत येऊन तिथे येतो. सुरेशच्या सासूला तिची चूक उमजते. शेवटी सुरेश आणि निर्मला एकत्र येतात.

'आगीत उमललेलं फूल उन्हातही कोमेजत नाही' अशी एक तामीळ म्हण आहे. सुरेशच्या जीवनात निर्मलेच्या आगमनानं उठवलेलं वादळ आणि तिच्यामुळेच त्याच्या जीवनात आलेलं चैतन्य! असं काहीसं संमिश्र कथानक... कौटुंबिक नात्यानं पुरेपूर भरलेलं. मानवी स्वभावाचे विविध पैलू उलगडून दाखविणारं.

पण चांगल्या कथानकाचा किंवा कल्पनेचा धंदेवाईक क्लृप्त्या लढवून कसा बट्ट्याबोळ करावा हे या चित्रपटात अकारण घुसडलेल्या नाच गाण्यांनी, मध्यंतरानंतरच्या गडबड गोंधळानं लक्षात यावं. मध्यंतरापर्यंत एक अत्यंत उत्कट भावानुभव आपण घेतो आहोत असं वाटतं. मात्र त्यानंतरच्या भागातील अर्थशून्य दृश्यांनी नाचगाण्यांनी घोर निराशा होते.

पंडित मुखराम शर्मा यांची ही मन हेलावून सोडणारी प्रभावी कथा... स्वर्गीय महेश कौल यांनी दिग्दर्शित केलेली... अत्यंत संथगतीनं चाललेलं कथानक,बऱ्याच वेळेला नको त्या ठिकाणी रंगाळलेलं. रसभंग करणारी गाणी आणि कथानकाच्या गंभीरतेला बाधा आणणारे असरानीचे पांचट विनोद. त्यामुळं प्रभावी कथानक असूनही त्याचा परिणाम न राहता केवळ मनावर उमटतो तो संजीवकुमार आणि शारदा यांच्या अभिजात अभिनयाचा ठसा.

उत्कृष्ट अभिनयाचे राष्ट्रीय पुरस्कार मिळविलेली ही जोडी. 'संजीवकुमार आणि शारदा दोघेही आपापल्या भूमिका खऱ्या अर्थानं जगले आहेत.' विलक्षण संवेदनक्षम आणि प्रभावी अभिनयानं त्यांनी सुरेश आणि निर्मला ह्या व्यक्ति-जिवंत केल्या. शारदाचे भावदर्शी बोलके डोळे खूप काही सांगून जातात. तिचा चेहराही विलक्षण 'मोबाइल' आहे. किंचित उच्चारदोष सोडले तर ती खूपच प्रभावी आहे. संजीवकुमारने तर अभिनयाची कमालच केली आहे. दुर्गा खोटेंना बऱ्याच दिवसांनी एक चांगली भूमिका मिळाली आहे. सुरेशची सासू आपल्या संयमित अभिनयानं उभी केली त्यांनी. इतर कलाकारांपैकी बिंदू, सज्जन, हरिन्द्रनाथ चट्टोपाध्याय ठाकठीक वाटतात.

कल्याणजी–आनंदजी यांच्या संगीताचा प्रभाव मुळीच पडलेला नाही. छायाचित्रण बरे वाटले. हृषिकेश मुखर्जींच्या संकलनाच्या खुणा मात्र निश्चित आढळतात. 'मेलकौल प्रॉडक्शन'चा हा चित्रपट पुरेसं समाधान देऊ शकला नाही हे मात्र मुद्दाम नमूद करावंसं वाटतं. हिंदी चित्रपटांचा तोच तोपणा कधी जाईल कुणास ठाऊक ? एक डोळा कथानकावर तर दुसरा बॉक्सऑफिसवर ठेवून निर्मिलेले हिंदी चित्रपट प्रेक्षकांची अभिरुची कशी बदलू शकणार ?

● ● ●

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649


# तापलेली मुंबई

विधानसभेचा पहिला दिवस. तिथे सीमा प्रश्नाचा ठराव.

त्यानंतर घेराव. घेरावाला प्रतिघेराव. धक्काबुक्की. मारामारी.

गावात कुर्ल्याला धान्य दुकानात लुटालूट.

दुसऱ्या दिवशी विधानसभा. पाच मिनिटात सभा बरखास्त.

संध्याकाळी सचिवालयावर मोर्चा. काँग्रेस आमदारांना मारहाण.

गावात तेल दुकानावर शिवसेना मोर्चे. स्वस्त दरात सक्तीने तेल विक्री. हातात डबे घेऊन लोकांच्या प्रचंड रांगा.

विधानसभेत गोंधळ, विरोधी आमदाराचे सदस्यत्व तीन दिवस रद्द.

सभा पाच मिनिटात बरखास्त.

तेल आंदोलन तात्पुरते स्थगित.

मुंबईत आणि मुंबईच्या विधानसभेत त्या तीन दिवसात काय काय घडले ?

त्याचा हा वृतांत.

**अनिल अवचट**

यापुढील

# माणूस

१५ ऑगस्ट अंकात.